
# श्री साईलीला



एप्रिल १९६६ रामनवमी विशेषांक कि. ७५ पैसे

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

"मानवजन्म हा फार महत्त्वाचा आहे. मानवाला निर्माण करून ईश्वर आनंदसंपन्न झाला. आपण कृतार्थ झालों असेंच त्याला वाटलें असेल. मानव विवेकानें वागूं शकतो, वैराग्य अंगीं बाळगूं शकतो, भूतदयेनें वागूं शकतो, माझे गुणगान करून स्वतःचा उद्धार करून घेऊं शकतो. तो विनाशी असला तरी साधनेच्या बळानें तो अविनाशी होऊं शकतो. तो नराचा नारायण होऊं शकतो. एवढी या नरदेहाची योग्यता आहे."

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ]  एप्रिल १९६६  [ अंक १२ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

दर वर्षाप्रमाणें श्रीरामनवमी महोत्सवानिमित्त 'साईलीला विशेषांक' आमच्या प्रिय वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला मनापासून आनंद होत आहे. सभों-वारच्या परिस्थितींत कालमानानुसार बदल घडून येत आहेत; परंतु जनमनांतील पूर्वीचा उत्साह मात्र आजही कायम आहे. कारण रामनामाची जादूच अशी विलक्षण आहे. रामनवमीची जत्रा म्हटली म्हणजे सर्वांग उत्साहानें पुलकीत होतें.

शिर्डी येथें प्रतिवर्षी जे उत्सव होतात त्या सर्वांत रामजन्मोत्सवाचें महत्त्व कांहीं आगळेंच आहे. जवळपासचे व दूरदूरच्या भागांत राहणारे भक्त या उत्सवाची उत्कंठेनें वाट पहात असतात आणि उत्सवसमयीं शिरडींत येऊन ३।४ दिवस बाबांच्या सान्निध्यांत मोठ्या भक्तिभावानें व आनंदानें खर्च करीत असतात.

या उत्सवांत या वर्षी थोडीशी खटकणारी गोष्ट म्हणजे अन्नधान्याची टंचाई हीच होय. यात्रेनिमित्त शिर्डी क्षेत्रांत हजारों लोकांचा जमाव एकत्र जमा होत असतो. त्यांच्या सुखसोईकडे संस्थान उत्सव कमिटी, जास्तींत जास्त लक्ष पुरविण्याचें आपलें कर्तव्य पार पाडण्यासाठीं परिश्रमपूर्वक झटत असते. अनेकांनीं या उत्सवानिमित्त यावें व उत्सवांतील एकंदर कार्यक्रमाचा व बाबांच्या दर्शनसुखाचा सोहळा मनमुराद लुटावा हीच उत्सवचालकांची सदिच्छा असते. परंतु यंदा सरकारच्या अन्न व भोजनविषक निर्बंधामुळें ते निर्बंध संभाळून जे कांहीं करणें तें करावें लागणार आहे. त्यांतही कोणाची गैरसोय होऊं नये व अन्य तऱ्हेनें का होईना पोटोबाची सोय व्हावी याची शक्य व आटोक्यांत असेल ती व्यवस्था उत्सवचालक केल्याशिवाय राहणार नाहींत याबद्दल भक्तांनीं खात्री बाळगावी. कारण भक्त 'येती घरा। तोचि दिवाळी दसरा' या भावनेनें तेथें सर्व मंडळी वावरत असतात. भक्तांनींही सध्यांचा काळ लक्षांत घेऊन तेथील मंडळीवर वृथा राग न करतां आपापली सोय लावून घेतली पाहिजे आणि त्याच धोरणानें सर्वजण वागतील अशी आम्हांला खात्री वाटते.

शिरडींत रामजन्मोत्सव बाबांच्या हयातींत व त्यांच्या देखरेखीखालीं सुरू झाला. रामनामाचें महत्म्य व जनमनावरील त्या नांवाची पकड यांची पूर्ण जाणीव बाबांना होती. उत्सव सुरु करायला त्यांनीं मोठ्या आनंदानें परवानगी दिली व त्याला कायमचें स्वरूप प्राप्त करून दिलें.

या उत्सवाची सुरुवात कशी व कोणामुळें झाली याची माहिती साईसच्चरित्राच्या सहाव्या अध्यायांत करून देण्यांत आली आहे. बाबांच्या काळीं गोपाळ गुंड नांवाचे जमीन मोजणी खात्यांतील एक अधिकारी होते. त्यांची बाबांवर पराकाष्ठेची श्रद्धा होती. बाबांची भक्ति करण्यांत व त्यांचें चिंतन करण्यांत त्यांना भारी आनंद वाटायचा. त्यांना संततीसुख नव्हतें. त्यामुळें ते थोडे कष्टी असत. परंतु नंतर बाबांच्या कृपेनें त्यांना पुत्रसंतान झालें. त्यांच्या जीवनांतील आनंदाचें पर्व सुरू झालें. आपण आनंदी त्याचप्रमाणें सर्वांनीं आनंदांत असावें; आयुष्यांतील कांहीं क्षण तरी माणसानें आनंदांत घालवावें असें त्यांना वाटत असे.

त्यांच्या मनानें एके दिवशीं घेतलें कीं, शिरडींत जत्रा भरवून आणावी म्हणजे दर वर्षी त्या जत्रेनिमित्त शेंकडों, हजारो लोक एकत्र जमतील. त्यांना ' सहजा सहजी ' बाबांचें दर्शन घडेल. जत्रा म्हणजे आनंदाची पर्वणी. जत्रा म्हणजे नाना प्रकारचीं दुकानें, उत्सव, विविध कार्यक्रम आणि आनंदी आनंद.

होय; जत्रा भरवावी; परंतु ती कोणत्या निमित्तानें ? कांहींतरी कारण पाहिजे. उरूस भरवावा व त्यानिमित्त जत्रा असें ठरलें.

हें एक सत्कार्य होतें; परंतु मार्गांत अडीअडचणी नाहीं आल्या तर तें सत्कार्य कसलें ? जत्रा भरविण्याच्या मार्गांत अडचण उत्पन्न झाली. जत्रेसाठीं जिल्हाधिकाऱ्याची परवानगी घेणें जरूर असतें. जिल्हाधिकारी हे गांव अधिकारी कुळकर्णी यांच्या सल्ल्यानें वागणार. त्या कुळकर्ण्यांनें जत्रा भरविण्यास परवानगी देण्यांत येऊं नये असें आपलें मत दिलें. विरुद्ध कारणें द्यायची झाली तर त्यांना तोटा नसतो. वाटेल तेवढी कारणें पुढें करतां येतात. आरोग्य रक्षण, अन्नपाणी टंचाई, रोगराई, चोऱ्यामाऱ्या अशीं एक ना दोन असंख्य कारणें !

कारणें वाटेल तेवढीं देतां आलीं तरी जेथें—बाबांच्या मनांत आलें तेथें कोणाचें काय चालणार आहे ? सर्व ग्रामस्थांनीं जत्रेची मागणी केली त्यासाठीं जिल्हाधिकाऱ्यांस गांठून त्यांची खात्री पटविली व शेवटीं त्या अधिकाऱ्यास जत्रा भरविण्याची परवानगी द्यावी लागली.

आणि मग रामनवमीच्या दिवशीं शिर्डीत अपरंपार जत्रा प्रतिवर्षी भरूं लागली. भजन पूजन, वाजतगाजत पालखी मिरवणूक, दोन निशाणांची थाटांत मिरवणूक, कथाकीर्तन, भजन गायन वगैरे आनंदांत भर घालणारे विविध कार्यक्रम सतत तीन दिवस शिर्डीत गाजूं लागले. जत्रेस येणाऱ्यांच्या आनंदास पारावार राहिला नाहीं.

ही उत्सवाची प्रथम सुरुवात अशा रीतीनें शके अठराशें तेहत्तीसमध्यें झाली. यंदाचें हें या उत्सवाचें पंचावनावें वर्ष आहे. आरंभीं उरूस भरत असे. त्यानिमित्त

जत्रा भरावयाची. पुढें कृष्ण जागेश्वर भीष्म यांनीं या उरुसास रामनवमी उत्सवाची व त्यानिमित्त विविध कार्यक्रमाची जोड करून दिली.

बाबांची कृपा, त्यांच्या कृपेनें या उत्सवाचें स्वरुप प्रतिवर्षी वाढत आहे व त्याला वाढते व्यापक स्वरुप येत आहे.

या उत्सवाचा आरंभ कसा झाला पहा. बाबा रामजन्माच्या दिवशीं सकाळीं लेंडीला नेहमींप्रमाणें गेले आहेत अशावेळीं सभामंडपांत एक पाळणा बांधण्यांत आला. रामजन्माचें आख्यान लावुन कीर्तनकारानें पाळण्यांत बाळ घालून रामजन्माचा पाळणा म्हणावयाचा, वाद्यें वाजवायची, गुलाल उधळायचा असा सर्व बेत ठरविण्यांत आला होता. सभामंडपांत श्रोत्यांची गर्दी जमा होऊं लागली होती. पेटीवादन सुरू व्हायचें होतें. इतक्यांत बाबा त्या वाटेनें आपल्या निवासस्थानीं गेले; परंतु सभामंडपांत पाळणा बांधला आहे व कांहीं गडबडसडबड चालली आहे हें त्यांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यावेळीं बाबांचे परम भक्त काका महाजनी हे या उत्सवांत गुंतले होते. तेच कीर्तनांत पेटीची साथ करणार होते.

इतक्यांत काकांना बाबांनीं बोलावणें पाठविलें. ते लगबगीनें बाबांकडे गेले.

"काय हो! काय गडबड चालली आहे?" बाबांनीं विचारलें.

"कांहीं नाही! रामजन्माची तयारी चालविली आहे. त्यासाठींच सभामंडपांत मध्यभागी पाळणा बांधला आहे." काका उत्तरले.

"ठीक आहे! प्रभू रामचंद्राच्या जन्माची कथा सांगण्यांत येणार आहे, फार चांगलें, उत्सव सुंदर रीतीनें साजरा करा बरं!" असें बोलून बाबांनीं जवळच हार पडले होते त्यांतील एक घेऊन काकांच्या गळ्यांत घातला व दुसरा हार कीर्तनकार भीष्म यांच्या गळ्यांत घालण्यासाठीं त्यांच्याजवळ दिला.

या रामजन्मोत्सवास बाबांनी सुरुवातीस अशा रीतीने आपला आशीर्वाद दिला. भीष्मबुवांचें कीर्तन रसभरीत झालें. त्यांच्या कीर्तनाचा आनंद सर्वांनी मनसुराद लुटला. दुसऱ्या वर्षी भीष्मबुवा लाभले नाहींत. बाळाबुवा सातारकर यांना पाचारण करण्यांत आलें. तिसऱ्या वर्षीही त्यांचा लाभ शिर्डीकरांस झाला.

आणि त्यानंतर ह. भ. प. दासगणूमहाराज यांचा बाबाशीं भक्त या नात्यानें संबंध जडला. शिर्डी येथील रामजन्मोत्सवाला कायमचें स्वरूप यावें ही होती बाबांची इच्छा. ती त्यांनीं दासगणू महाराज यांच्या करवीं पूर्ण करवून घेतली.

त्यानंतरच्या काळांत या महोत्सवाची कीर्तनसंबंधीं जबाबदारी श्री दासगणू महाराज यांनीं आपणास शक्य होतें तोंवर उत्तम प्रकारें संभाळली. त्यांच्या नंतर त्यांचे सत्शिष्य ह. भ. प. अनंतराव आठवले हे ती जबाबदारी उत्तमप्रकारें व समर्थपणें आजवर संभाळीत आहेत.

असा आहे शिर्डी येथील श्री रामजन्मोत्सवाचा इतिहास व महिमा. दर वर्षी-प्रमाणें बाबांच्या कृपेनें हा महोत्सव यंदाहि अत्यंत उत्साहपूर्वक थाटामाटांत यशस्वी रीतीनें पार पडेल याबद्दल आम्हांला मुळींच शंका वाटत नाहीं.

— संपादक

# ✻ जय जय साईनाथ सद्‌गुरु ! ✻

जय जय साईनाथ सद्‌गुरु
जय जय शिरडीनाथ सद्‌गुरु ॥ ध्रु० ॥

साईचे पुजावे ते चरण
मुखानें ध्यावे साई—नाम
मनीं तें साई—ध्यान या करूं ॥ १ ॥

साई हे भक्तांचे विठ्ठल
शिरडी पंढरपूर क्षेत्र
साईचें कमलचरण या धरूं ॥ २ ॥

साईची विशाल ही माया
धांवते भक्तां ताराया
साईना निशीदिनी या स्मरूं ॥ ३ ॥

—गोविंद केशव पेठकर
( नाशिक )

# रामभक्त हनुमान

**रामभक्त हनुमान म्हणजे सेवाभाव, मांगल्य, पावित्र्य व उच्च चारित्र्य या सर्वांची परमपावनमूर्ति. त्याचें चारित्र्य व देवभक्ति अलौकिक होती. रामायणांत रामचंद्राइतकेंच रामभक्त हनुमंताचें महात्म्य आहे.**

—संपादक

वाल्मीकिरामायणांत हनुमानाचें चित्रण कशा प्रकारचें आहे ? हनुमानाचें चरित्र-चित्रण श्रेष्ठ, ज्येष्ठ आणि अपूर्व आहे. रामायणांत त्याचें स्थान फारच मोठें आहे. राम आणि हनुमान यांची जोडी अविभाज्य आहे. ज्याप्रमाणें रामानें स्वतःच्या प्रयत्नानें, शक्तीनें, सामर्थ्यानें आणि दैवी गुणांमुळें देवत्व मिळविलें आणि आज त्याची उपासना केली जाते, तीच गोष्ट हनुमानाविषयींही आहे. रामाच्या परिवारांतली एकच व्यक्ति आहे कीं, जिचें स्वतंत्र मंदिर आहे—आणि ती व्यक्ति म्हणजे हनुमान. रामाप्रमाणें हनुमानाचें सुद्धां मंदिर आहे. रामाच्या मंदिरांत हनुमान नक्की असेल, परंतु त्याची स्वतंत्र उपासनाही केली जाते; अशा तऱ्हेची अलौकिकता हनुमानाचे ठिकाणीं होती.

राम आणि हनुमान यांचा संबंध किष्किंधाकांडापासून येतो. नंतर रामायणाची समाप्ति होईपर्यंत त्याला भरतीच येत राहिलेली आहे. राम आणि हनुमान यांचा संबंध किंवा "तुझ्यावर ( रावणावर ) कोणता अपकार केलेला आहे कीं, ज्यामुळें तें त्याची धर्मपत्नी घेऊन आला आहेस ! रामासारख्या समर्थ व्यक्तीशीं विरोध करणें हे राष्ट्रघातकी विचार आहेत. रामासारख्या व्यक्तीशीं विरोध करण्यांत लंकेचें आत्यंतिक अकल्याण आहे." अशा तऱ्हेचें त्यानें खूप सांगितलें, परंतु उन्मत्त मंत्री आणि इंद्रजितासारख्या गर्विष्ठ लोकांच्या पुढें त्याचें कांहीही चाललें नाहीं.

अशा तऱ्हेनें लंकेच्या हितासाठीं त्यानें अनेक प्रयत्न केले, मानापमानाचासुद्धां कधीं विचार केला नाहीं, परंतु त्याचें जेव्हां कांहींच चाललें नाहीं, त्या वेळीं लंकेंत राहाणाऱ्या लोकांच्या कल्याणासाठीं तो रामाला भेटायला गेला. त्याला हे माहीत होतें कीं, राम राज्यलोभी नाहीं. त्याला तर सीताच हवी आहे. त्यानें स्वतःच्या चारित्र्याची शुद्धता सिद्ध करून दाखविली आहे. वालीला मारून राज्य सुग्रीवाला दिलें होतें. स्वतःची

अयोध्येतील गादी सोडून राम आलेलाच आहे. आणि किष्किधाही त्यानें सुग्रीवाला दिली. रामाजवळ राज्यलोभ नव्हता. त्यामुळें राक्षसराष्ट्राचें रामाच्या मदतीनें कल्याण होणार आहे. असा पूर्ण विचार करूनच बिभीषण रामाला येऊन मिळतो.

आणि युद्ध जर दोन राष्ट्रांमध्यें झालें असतें, तर जातिद्रोह, राष्ट्रद्रोह वगैरे झाले असते. परंतु हें तर मानवता आणि पशुता यांच्यामधलें युद्ध होतें. म्हणून मानव्यवादी बिभीषण राजधानीची प्रतिष्ठा टिकविण्यासाठीं रामाच्या पक्षाला येऊन मिळाला होता. मानवानें मानवाचा पक्ष घेऊन युद्ध केलें यांत राष्ट्रद्रोह कसा काय झाला? लंकावासी लोकांचे कल्याण आणि राजगादीची प्रतिष्ठा टिकविणाऱ्या मानव्यवादी कुलाभिमानी बिभीषणाला याशिवाय दुसरा रस्ताच नव्हता. त्याला स्वजनद्रोही, जातिद्रोही, राष्ट्रद्रोही असें कसें म्हणतां येईल? म्हणून ही प्रार्थना आहे कीं, त्याच्यावरील आक्षेपांचा पूर्ण विचार करूनच त्याच्याविषयीं चिकित्सक लोकांनीं आपलीं मतें बनवावी.

शासनसंस्था कशासाठीं निर्माण झाली याकरितां ग्रीक तत्त्ववेत्त्यांपासून मार्क्सपर्यंतचे सर्व लोक एकच उत्तर देतात कीं, 'अन्यायाचें परिमार्जन होण्यासाठीं, न्याय टिकविण्यासाठीं आणि मानवता निर्माण करण्यासाठीं राजसत्ता आवश्यक आहे.' ज्या ठिकाणीं रावणानें हीं तीनही सूत्रें धुडकावून लावून राजनिष्ठेला आग लावली, त्या ठिकाणीं राजद्रोहाची गोष्ट बिभीषणाकरितां कां यावी? अशा प्रकारची शासनसंस्था असेल त्या ठिकाणीं मानवतावादी नेत्यांवर अशा तऱ्हेचे आक्षेप करतांच येणार नाहींत. मानवतावादी भव्य महापुरुष म्हणजे बिभीषण, अशा तऱ्हेचें रामायणांत वर्णन आहे. सतत रक्ताचें पाणी होईल असे प्रयत्न करून रावणाला समजावण्याचे प्रयत्न केले होते, म्हणून त्याला राज्यलोभी किंवा स्वार्थी म्हणूं नका.

दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, आजचें चिकित्सक जग बिभीषणाला 'Third Class Character' म्हणून समजत आहे. परंतु वाल्मीकिरामायणांत मात्र शंकेला स्थानच नाहीं. हनुमान रामायणांत शेवटपर्यंत इतका वाढलेला आहे कीं, आजही हजारों वर्षें झालीं तरी रामाबरोबर हनुमान आहेच. जनसमुदायाच्या हृदयांत रामाइतकेंच आदराचें स्थान हनुमानाला सुद्धां मिळालें आहे. उत्तर कांडांत—

> शौर्यं दाक्ष्यं बलं धैर्यं प्राज्ञता नयसाधनम् ॥
> विक्रमश्च प्रभावश्च हनूमति कृतालयः ॥

इत्यादि श्लोकांनी हनुमानाचें वर्णन केलेलें आहे. प्राज्ञ, धीर, वीर, राजनीतिनिपुण वगैरे विशेषणांनीं राम त्याला संबोधीत असे, यावरूनच त्याची श्रेष्ठ योग्यता आपण कल्पनेनें जाणूं शकतों.

हनुमान सीतेचा शोध करून परत येतो त्या वेळीं राम म्हणतो कीं, " हे हनुमाना, तुझे माझ्यावर अगणित उपकार झालेले आहेत–" एकैकस्योपकारस्य प्राणान् दास्यामि ते कपे ! " असें बोलून राम म्हणतो, " तुला काय देऊं ? या जगांत तुला देण्यासारखी एकही गोष्ट नाहीं. कांहींच नाहीं. तुला फक्त एक आलिंगनच देतों. हनुमाना ! तूं उपकार म्हणत असशील तर उपकार, प्रेम म्हणत असशील तर प्रेम, तें इतकें आहे त्यासाठीं माझा एक एक प्राण काढून तुला दिला तरी सुद्धां तो कमीच पडणार; कारण तुझें माझ्यावरचें प्रेम पंचप्राणांपेक्षांही विशेष आहे. दुसरें कांहीं देऊन तुझ्या प्रेमाची मी किंमत कां करूं ? तुझ्या प्रेमाची गणना करतां येईल काय ? मला ही गोष्ट शक्यच नाहीं. "

उपकाराची फेड प्रत्युपकारानें करावयाची असते. संकटांत मदत केलेल्याला संकटांत मदत करावयाची असते. परंतु आपल्यावर ज्यानें उपकार केले किंवा संकटांत मदत केली, त्याच्यावर संकट यावें अशी अमंगळ कल्पनाच कां करावी ? ज्याच्यावर प्रेम आहे, तो संकटांत सांपडावा ही कल्पनाच सहन होत नाहीं. आणि मारुतीवर संकट कोठून येणार ! म्हणून रामानें त्याला काहींएक न देतां आणि प्रत्युपकार करीन हीं भावना न ठेवतां त्याला केवळ आलिंगन दिलें. यावरून रामाच्या अतःकरणांत त्याला केवढें स्थान होतें तें ध्यानांत येतें. उत्तरकांडांत रामानें त्याला 'पुरुषोत्तम' ही पदवी दिली आहे. लोकांना शंका आहे की, " तो नर होता कीं वानर ? " पण मी म्हणतों कीं, " या दोहोंपेक्षांही श्रेष्ठ तो पुरुषोत्तम होता." सामान्य चान्सलर किंवा व्हाईस चान्सलर यांनी दिलेली ही पदवी नव्हती; तर हीं ईश्वरानें दिलेली पदवी होती, आणि त्यामुळेंच आज सुद्धां हजारों वर्षांनंतर हनुमानाचें लोक पुरुषोत्तम म्हणून स्मरण करीत आहेत.

हजारों वर्षांपासून ज्यांची सेवा–पूजा सुरू आहे, असे दोनच राजे झाले कीं, ज्यांना हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या लोकांनीं आपल्या हृदयसिंहासनावर भक्तिपूर्वक बसविलें आहे. दुसरे राजे तर काळाच्या हिशेबानें पांच दहा मिनिटांत नाहींसे झालेले आहेत. ते दोन म्हणजे 'राम आणि कृष्ण !' राम आणि कृष्ण हे दोनच राजे असे आहेत कीं, ज्यांनी लोकांच्या हृदयावर साम्राज्य मिळविलें आहे कीं, जे काम लोकांना मनानेंही करतां येणार नाहीं.

" यो हि भृत्यो नियुक्तः सन् भर्त्रा कर्मणि दुष्करे ।
कुर्यात् तदनुरागेण तमाहुः पुरुषोत्तमम् ॥ "

असें म्हणून रामानें त्याला पुरुषोत्तम पदवी दिली आहे. धन्य हनुमान् कीं जो वानर असून सुद्धां ज्याला प्रभूनें स्वमुखानें पुरुषोत्तम पदवी दिली आणि स्वतःच्या जवळ स्थान दिलें !

हनुमानावर रामाचेंच प्रेम होतें असें नाहीं, सीतेचें पण हनुमानावर तेवढेंच प्रेम

होतें. पतीचा निरोप आणणाऱ्यावर प्रेम असणारच. सामान्य स्त्रीसुद्धां प्रेमपत्र आणणाऱ्या पोस्टमनला बक्षीस देते. ज्या वेळीं रामानें सर्वांना बक्षिसें वांटलीं, आणि हनुमानाचा क्रम आला, त्यावेळीं रामाला विचार पडला. सीता गळ्यांतल्या अमूल्य नवरत्नांच्या हाराकडे पाहाते आणि रामही समोर पहातो. नंतर सीता गळ्यांतला हार म्हणजे हृदयप्रेमाचा हार हनुमानाला देते. कारण त्यानेंच लंकेंत सर्वांच्या अगोदर पतीचा संदेश आणला होता आणि जीवितदान केलें होतें. अशा तऱ्हेनें राम आणि सीता या दोघांच्या प्रेमाला पात्र झालेली महान् व्यक्ति म्हणजे हनुमान.

अंजनी आणि केसरी यांना वायुदेवाच्या कृपेनें झालेला पुत्र म्हणजे हनुमान. तो जन्माला आला त्या वेळीं त्यानें सकाळचें वर आलेलें सूर्यबिंब पाहिलें व त्याला पकडण्यासाठीं उडी मारली. कवि आणि लेखक यांनीं यासंबंधीं अनेक रूपकें केलीं आहेत. कांहीं असें म्हणतात कीं—

फळ समजून सहजस्वभावाप्रमाणें हनुमानानें उडी मारली. परंतु भारवीनें किरातार्जुनीय काव्यांत अगदीं योग्यच वर्णन केलें आहे कीं,—

> ‘किमपेक्ष्य फलं पयोधरान् ध्वनतः प्रार्थयते मृगाधिपः।
> प्रकृतिः खलु सा महीयसां सहते नान्यसमुन्नतिं यया ॥’

मेघांचा गडगडाट ऐकून सिंह गुहेच्या बाहेर येतो आणि आकाशाकडे नजर टाकतो व म्हणतो, ‘माझ्यापेक्षा मोठा कोण आहे!’ मोठे लोक स्वभावतःच शौर्यवान आणि कर्तृत्ववान असतात. हनुमानानें सुद्धां त्यामुळेंच सूर्यबिंब पाहिल्याबरोबर उडी मारली होती.

यावर एक पौराणिक कथा आहे. हनुमानानें उडी मारली त्या वेळीं सूर्याला वांचविण्यासाठीं इंद्रानें वज्र मारलें, त्यामुळें हनुमान मूर्च्छित झाला. यामुळें वायुदेव रागावला आणि नंतर मग काय विचारतां! अन्नपाण्याशिवाय चालेल, परंतु वायूशिवाय कुठें चालतें का! नंतर इंद्रानें वायुदेवाची समजूत घातली आणि हनुमानाला शक्ति दिली सूर्यानें स्वतःच्या अंशाचें तेज दिलें, त्यामुळें तो प्रखर बुद्धिमान झाला. यम, वरुण वगैरे प्रत्येक देवांनी याला कांहींना कांहीं तरी दिलेलें आहे. अशा तऱ्हेनें सर्वांपासून दिव्य गोष्टी मिळवून शक्तिसंपन्न आणि बुद्धिसंपन्न झालेली व्यक्ति म्हणजे हनुमान. ‘अभयं सत्त्वसंशुद्धिः’ अभय, तेज, बुद्धि वगैरे सर्वच दैवी गुण त्याला मिळाले. मग काय विचारावें! लहानपणापासून त्याला कोणाचीही भीति नव्हती. शारीरिक, मानसिक, त्याचप्रमाणें त्याला बौद्धिक सामर्थ्य मिळालें, म्हणून तो लहानपणापासूनच गंमत म्हणून ऋषींना सुद्धां त्रास देऊं लागला. त्यांच्या आश्रमांत जाऊन त्यांना सतावूं लागला. ऋषींना वाटलें कीं, याच्यावर अंकुश ठेवायला हवा. एकादा सामान्य मुलगा सुद्धां घर डोक्यावर घेतो, तर या असामान्याची गोष्टच कुठें! ऋषींनीं सांगितलें कीं, ‘तूं अशक्त राहशील, तुझ्या

शक्तीची तुला विस्मृति होईल—दुसऱ्यांना तुझ्या शक्तीची आठवण करावी लागेल,' यामुळें हनुमानाला आत्मविस्मृति झाली होती. ( Failure of memory ). हा शाप हनुमानावर अंकुश ठेवण्याकरितांच दिलेला होता. त्याच्यामागें कांहीं दुष्ट हेतु नव्हता. शापामुळेंच त्याला समुद्र उल्लघून जातांना सांगावें लागलें कीं, " तुझ्या ठिकाणीं अशा अशा तऱ्हेची शक्ति आहे." उत्तरकांडांत त्याचें वर्णन आहे. तो बलशाली आणि बुद्धिसंपन्न होता. त्याला मानसशास्त्र, राजनीति, साहित्य, तत्त्वज्ञान वगैरे शास्त्रांचें खूपच ज्ञान होतें. त्याला ११ वा व्याकरणकार आणि रुद्राचा अवतार मानतात.

**'मनोजवं मारुततुल्यवेगं, जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।**
**वातात्मजं वानरयूथमुख्यं, श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥'**

हें त्याचें थोडक्यांत वर्णन आहे. त्याच्या ठिकाणीं जबरदस्त विद्वत्ता होती. 'बुद्धिमतां वरिष्ठम्' तो होता. सामान्यपणें शरीरसामर्थ्य असलेल्या व्यक्तींच्या ठिकाणीं अकल कमीच असते—असें म्हणतात, परंतु हें मारुतीविषयीं खोटें आहे.

शक्तीशाली हनुमान बुद्धीनें वरिष्ठ होता. त्याच्याठिकाणीं वक्तृत्वशक्ति अमोघ होती. परंतु त्याला ओळखायला बारा वर्षें तप करावें लागेल ! आपल्याला फक्त बोलता येतें, परंतु हनुमानाच्या वक्तृत्वशक्तींतील ज्ञाननिष्ठ वक्तृत्वप्रवाह आणि सरलता असतांना सुद्धां तिच्यांत अर्थगंभीर भाषाप्रवाह वहात नाहीं असें ऐकणाराला वाटतें.

**शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः ।**
**वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥**

सुग्रीवाच्या सांगण्यावरून हनुमान ऋष्यमूक पर्वतावर रामाला भेटायला गेला होता. त्यावेळीं तो काय बोलला होता हें वाचा. त्याची वक्तृत्वशक्ति आणि विचार ऐकून मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्र सुद्धां चकित झाले होते. त्यांनीं लक्ष्मणाकडे पाहून म्हटलें, " ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद या तीन वेदांत सतत अवगाहन करणारा, व्याकरणाचें प्रगाढ ज्ञान असलेला, व्यवहार आणि नीतिशास्त्र यांचें पूर्ण ज्ञान असलेलाच अशा तऱ्हेचें ज्ञानप्रचुर आणि उत्कृष्ट कोटिक्रमयुक्त भाषण करूं शकतो. अशा तऱ्हेचें स्पष्ट, स्वच्छ, निर्भीड, ज्ञानप्रचुर आणि विचारी भाषण करणाराचें अध्ययन किती असेल ! केवढा अभ्यास असेल !" प्रमाणपत्र कोण देत आहे तें पहा. मर्यादापुरुषोत्तम राम हनुमानाला विद्वान् म्हणून प्रमाणपत्र देत आहे. ज्ञानी पूर्ण विचार करूनच प्रमाणपत्र देतात; आणि आपण तर ज्याच्या भाषणांतला एक शब्द सुद्धां समजत नाहीं त्याला पूर्ण विद्वान् म्हणतों !

माझी आजी कीं जिला मीं अगदीं चांगल्या तऱ्हेनें पाहिलें आहे ती एक दिवस माझ्या वडिलांना सांगायला लागली कीं, त्या अमक्या पंडितांचें एक प्रवचन ऐकून तर ये, ते अतिशय विद्वान् आहेत.

वडील म्हणाले, "पण तूं आज गेली होतीस, तूं काय ऐकलेंस तें तर सांगना ?"

आजी म्हणाली, "एक तास ऐकून आल्यें, परंतु एक अक्षरही समजलें नाहीं. म्हणूनच मी म्हणतें कीं ते अतिशय विद्वान् आहेत."

अशा तऱ्हेनें सामान्य मनुष्यसुद्धां ताबडतोब प्रमाणपत्र देतो. हनुमान सामवेद आणि उपनिषद् उत्कृष्ट तऱ्हेनें जाणत होता. हनुमानाची वाणी हृदयंगम आहे. हनुमानानें नीतिशास्त्राचें आलोडन आणि सारासार विवेकपूर्वक तत्त्वज्ञानाचा अभ्यास उत्कृष्ट रीतीनें केलेला होता. वाल्मीकि त्याचें खूपच वर्णन करीत आहेत. वाल्मीकींनीं या ठिकाणीं खूपच कमाल केली आहे. परंतु वाल्मीकींनीं कुठें कमाल केली नाहीं !

वानरश्रेष्ठांमध्यें त्याचें स्थान कोणतें होतें ? त्याचें स्थान असामान्य होतें. त्याला उत्कृष्ट मान होता. हनुमान आणि सुग्रीव यांची मैत्री अग्नि आणि वायु यासारखी होती. हनुमानाला सुग्रीवानें विजनवासांत सुद्धां सोडलें नाही, त्यामुळें राज्य मिळतांच हनुमानाला किष्किंधेचा प्रधानमंत्री केलें. राज्याचा मुख्य मंत्री म्हणून त्यानें खूपच मोठी कामगिरी केली आहे. सामर्थ्य, प्रखर बुद्धि आणि चारित्र्य यामुळें त्यानें वानरराज्यांत स्वतःचें स्थान निर्माण केलें होतें. लोकोत्तर चारित्र्य आणि बुद्धिमत्ता यामुळेंच वानरराज सुग्रीवालासुद्धां दोन शब्द हनुमानच सांगूं शकत असे. वालीवधानंतर तारेचें सांत्वन करण्यासाठीं हनुमानालाच पाठविण्यांत आलें होतें. नाजुकांत नाजूक काम आणि कठोरांत कठोर कामसुद्धां हनुमान यशस्वी तऱ्हेनें पार पाडीत असे.

बुद्धि आणि शक्ति यांनीं संपन्न असलेल्या वालीच्या वधानंतर अंगदानें शत्रुत्व करण्याचें नक्की केलें होतें. अंगद ही असामान्य शक्ति असलेली व्यक्ति होती. त्यानें स्वतंत्र राज्य स्थापण्याचें ठरविलें होतें. त्याला समजवील अशी कोणीही व्यक्ति नव्हती आणि राज्याचे दोन भाग पाडण्याचा प्रसंग आला होता. त्यावेळीं हनुमान अंगदाला समजावण्यासाठीं गेला होता. त्याचे कोटिक्रम किष्किंधाकांडांत वाचा. स्वतःची अक्कल आणि मुत्सद्देगिरी यामुळें अंगदाला त्यानें असें समजावलें कीं, राज्याचे दोन भाग तर झाले नाहींतच आणि राष्ट्रावरील आपत्तीही दूर करून जी राजगादी फोडायला अंगद तयार झाला होता, तिचाच एकनिष्ठ सेवक झाला. एकटा अंगद सुग्रीवाला भारी पडला असता. अशा तऱ्हेनें जो अंगद गादी फोडायला तयार झाला होता, त्याचे विचार बदलविण्याचें सामर्थ्य हनुमानाच्या बुद्धिप्रतिभेंत होतें. अशाच तऱ्हेच्या व्यक्ति रामाचे सेवक होऊं शकतात. आज आपण असें म्हणतों कीं, "आम्ही तर हनुमानासारखे रामाचे दास आहोंत." परंतु हनुमानाचे ठिकाणीं अलौकिक बुद्धि, विद्वत्ता, ऋजुता, निष्कपटता आणि असामान्य चारित्र्य होतें. आपल्यामध्यें त्यांतला एकतरी गुण आहे का ? परंतु, 'राम, राम ' असें बोलून हनुमानासारखे भक्त आपण होणार नाहीं. हनुमानासारखे चारित्र्यशील, तेजस्वी, बुद्धिमान् आणि पराक्रमी व्हाल तरच रामाचे दास समजा.

त्याची मुत्सद्देगिरी आणि विद्वत्ता यांवर रामाचासुद्धां विश्वास होता. बिभीषण-शत्रुराज्याचा मंत्री आणि रावणाचा भाऊ—रामाकडे आलेला असतो. तो कोणत्या हेतूनें आलेला आहे, त्याला स्वपक्षांत घ्यावा किंवा नाहीं? त्यासाठीं रामानें सल्ला विचारतां सुग्रीवापासून प्रत्येकानें अशा आणीबाणीच्यावेळी बिभीषणाचा स्वीकार करायला नकार दिला. सर्वांचें ऐकल्यावर रामानें हनुमानाला विचारलें कीं, तुझें मत सांग. रामाचा त्याच्यावर विश्वास होता. हनुमानानें तात्काळ उत्तर दिलें कीं, "एतावत्तु पुरस्कृत्य विद्यते तस्य संग्रहः।" असें सांगून "त्याचा संग्रह करा" असें तावडतोब आपलें मत व्यक्त केलें. चेहऱ्यावरून निष्कपटता निश्चित करणें ही साधीसुधी गोष्ट नाहीं. हनुमानाचा मानसशास्त्राचा सखोल अभ्यास होता. "आपल्या पक्षांत घाला घ्या" असें म्हणतांच रामानें बिभीषणाचा तावडतोब स्वीकार केला. राम कांहीं भोळा नव्हता कीं जो दुसऱ्याचें म्हणणें तात्काळ कबूल करील. परंतु त्यानें हनुमानाचें म्हणणें मान्य केलें. कारण कीं असामान्याला असामान्याची पारख होऊं शकते.

सीतासंशोधनाचें कार्य रामानें जितक्या विश्वासानें त्याच्यावर सोंपविलें होतें, तितक्याच विश्वासानें त्यानें तें कार्य पार पाडलें होते. सुंदरकांड हनुमानाच्या लीलांनींच भरलेलें आहे. प्रत्येक कांडाला सार्थ नांवें दिलेलीं आहेत. उदा० बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, युद्धकांड, उत्तरकांड इत्यादि नांवांना स्वतंत्र अर्थ आहे. परंतु या कांडाचें नांव सुंदरकांड असें कां बरें ठेवलें? ज्या कांडांत हनुमानाच्याच लीला आहेत त्याचें नांव सुंदरकांड ठेवलें आहे. याचा अर्थ असा आहे कीं, भगवद्भक्ताची लीला ईश्वराला आणि तपःस्वाध्यायनिरत ऋषींना सुंदर वाटतें, म्हणूनच त्याचें नांव सुंदरकांड ठेवलें आहे. रामाला भक्ताचें काम सुंदर वाटलें, कर्तृत्वशक्ति सुंदर दिसली, त्याची लीला, चांचपळ, बुद्धिमत्ता वगैरे सर्व गोष्टी सुंदर वाटल्या म्हणून वाल्मीकींनी त्याचें नांव सुंदरकांड ठेवलें. ज्याचें परमेश्वर चिंतन करतो अशा महापुरुषांपैकीं तो एक आहे. माणसें तर त्याचें चिंतन करणारच.

समुद्राचें उल्लंघन करायला निघाला, त्यावेळीं त्याची कर्मयोग, बुद्धिप्रलोभन आणि भीति—अशी तीन प्रकारची परीक्षा झाली होती. नागमाता सुरिका म्हणते कीं, "तूं माझें खाद्य आहेस." हनुमानानें तिला बोलतां बोलतां स्वतःच्या बुद्धीनें चकविलें. मैनाक पर्वत सुंदर, सर्व उपभोगांनीं युक्त असें स्थान धारण करून कर्तव्यतत्पर हनुमानाला म्हणतो कीं—"या सुंदर ठिकाणीं तूं विश्रांति घे आणि नंतर जा." हनुमानानें त्या प्रलोभनाला लाथ मारली आणि त्याला नमस्कार करून कार्याच्या मध्यें न येण्यासाठीं विनंति केली व पुढें गेला. लंकेंत गेल्याबरोबर तिथें सिंहिका उभी होती. मी एकटा आहें, ही भीति हनुमानाला वाटत नसे. धाडसीपणानें ती भीति त्यानें

भ्रावविली होती ! 'अभयम्' गुण तर दैवी संपत्तींत निर्माण झालेल्या व्यक्तीचे ठिकाणीं असणें हें अगदीं स्वाभाविकच आहे.

लंकेंत सर्व ठिकाणीं शोधतो. परंतु कोठेंही सीतेचा पत्ता लागेना. शेवटीं अशोक वनांत येतो आणि तेथें कारुण्यमूर्ति सीता कीं जिचें वाल्मीकींनी अद्वितीय चित्रण केलें आहे तिला पाहतो. वाल्मीकींचें हें कारुण्यवर्णन अमर आहे. तशाप्रकारचें शाब्दिक कारुण्यवर्णन अन्य ठिकाणीं क्वचितच पाहायला मिळेल. व्यक्तीशीं तादात्म्य झाल्या-शिवाय त्याची गंभीरता ध्यानांत येणार नाहीं. हनुमान त्या ठिकाणीं उभा राहतो. त्यावेळीं रावण तिला दमदाटी करीत उभा असतो. त्याचा छळवाद, त्रास यांना कंटाळून सीता आत्मघात करायला तयार झालेली असते. हनुमान बुद्धिमान होता, तो सांगितल्याप्रमाणें बोलणारा जांवई नव्हता.

एका जांवयांना श्वशुरगृहीं जायचें असतें. त्यांची आई त्यांना असें शिकवून ठेवते कीं, श्वशुरांनीं कांहीं विचारलें तर कांहीं वेळां होय आणि कांहीं वेळां नाहीं असें सांगायचें.

जांवईबुवा श्वशुरगृहीं आले. एकदमच जांवईबुवा आले म्हणून साहजिकच श्वशुरांना काळजी वाटली आणि विचारलें, "एकटेच आलेत का ?"

जांवईबुवा—"होय."

श्वशुर—"घरचीं सर्व माणसें खुशाल आहेत ना ?"

जांवईबुवा—"नाहीं."

श्वशुर—"कोणी आजारी वगैरे आहे का ?"

जांवईबुवा—"होय."

श्वशुर—"आमच्या व्याह्यांना कांहीं झालें आहे का ?"

जांवईबुवा—"नाहीं."

श्वशुरांची काळजी वाढली. अधीर होऊन विचारलें, "आमच्या मुलीला तर कांहीं झालें नाहीं ना ?" परंतु जांवईबुवांच्या अनुक्रमाप्रमाणें उत्तर 'होय' असें येत होतें. म्हणून—

श्वशुर म्हणतात—"मग तुम्हीं आम्हांला बोलावायला कां आलां आहांत ? ठीक आहे, आम्हीं येतों."

जांवईबुवा म्हणतात—"नाहीं."

श्वशुरांच्या मनांत चिंता उत्पन्न झाली व त्यांनीं विचारलें, "मुलगी मरून तर नाहींना गेली ?"

आणि जांवईबुवा म्हणतात, "होय."

हनुमानाजवळ स्वतंत्र बुद्धि आणि प्रज्ञाशक्ति होती. त्यावेळीं त्यानें पूर्ण विचार केला. "जर सीता आत्मघात करून मेली तर रामायण खलास. जर गोड वाणीनें बोलायला लागलों तर सीतेला असें वाटेल कीं रावणच दुसरें रूप धारण करून आलेला आहे म्हणून आरडाओरडा करील व सर्व राक्षसी एकत्र होतील व मला परत जावें लागेल. जर बोललों नाहीं तर सीता आतांच आत्मघात करून मरेल." अशा तऱ्हेच्या आणीबाणीच्या प्रसंगीं "बुद्धिमतां वरिष्ठम्" हनुमानानें बुद्धि चालविली. त्याने मानसशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास केला होता. झाडापाठीमागें उभा राहून इक्ष्वाकु कुलाचें वर्णन त्यानें सुरू केलें. रघु, अज, दशरथ इत्यादींचें वर्णन काव्यमधुर शब्दांनीं हनुमान करतो. सीता हें ऐकून आत्मघात करायची थांबते. तिला असें वाटतें कीं, 'ह्या महापुरुषांच्या निकट सहवासांत असलेला आणि ज्यानें अयोध्या पाहिलेली आहे असा कोणी इथें आहे.' अशा प्रकारची हनुमानानें मानसिक भूमिका तयार केली—व सीतेच्या हृदयांत विश्वास निर्माण केला.

मुलगा विहिरीवर उभा असेल व त्याला जागृत करण्यासाठीं आई जर ओरडा करील तर मुलगा विहिरींत पडणार. या ठिकाणीं मानसशास्त्राच्या अभ्यासाची आवश्यकता आहे. नंतर सीता उत्सुकतेनें आजुबाजूला पाहायला लागले; त्यावेळीं पुढें येऊन हनुमान उभा राहिला आणि नम्रपणानें मस्तक नमवून म्हणाला; "मी रामाचा दूत आहे, मला घाबरूं नकोस." आणि नंतर तो सर्व सांगतो.

रामाजवळ ज्यावेळीं तो जातो, त्यावेळीं "सीता दृष्टा मया राम" असें नाहीं म्हणाला तर 'दृष्टा सीता मया राम।' असें म्हणाला. कारण कीं 'सीता' अगोदर म्हणून नंतर 'दृष्टा' असें म्हटलें असतें तर दरम्यान रामाला शंका आली असती कीं सीता सांपडली असेल कीं नाहीं. त्यामुळें रामाचे औत्सुक्य ध्यानांत घेऊन हनुमानानें अगोदर 'दृष्टा' असे शब्द उच्चारले. संशोधन दृष्टीनें रामायण वाचाल तरच ध्यानांत येईल कीं, या गोष्टी हनुमानाचा मानसशास्त्राचा (Psychology) खोल अभ्यास दर्शवीत आहेत.

लंकादहन ही वानरांची मर्कटलीला नव्हती; तर तें राजकारणविशारद माणसानें पूर्ण विचारांती केलेलें कृत्य होतें. लंकादहनांत पूर्ण राजनीति (Politics) आहे. हें न समजणाऱ्याला रामायणाचें रहस्य कळत नाहीं असें समजावें. लंकादहन करून हनुमानानें युद्धाचें अर्धे काम पुरें केलें होतें—अर्धी लढाई त्यावेळीं हनुमानानें जिंकली होती. लंकादहन करून त्यानें लंकेतील राक्षस प्रजेचा आत्मप्रत्यय नाहींसा करून टाकला. प्रजेचा स्वतःवर असलेला सामर्थ्याचा विश्वास नाहींसा केला, असें मारण्याचें काम हनुमानानें केलें होतें. या गोष्टीचा एवढा अचूक परिणाम झाला कीं, प्रजेचें गेलेलें चैतन्य शेवटपर्यंत परत आलें नाहीं. सर्व घाबरून गेले होते; सर्व Collapse झाले

होते. त्याप्रमाणें क्रिकेटमध्यें 'एक गेला म्हणजे मी पण जाणार' ही वृत्ति आली कीं 'मी खेळेन, मी फटके मारीन', ही वृत्ति गेली म्हणूनच समजावी. त्याप्रमाणें हा मानसिक परिणाम आहे. ( Psychological effect ) आमचा पराभव होणार असा मानसिक आघात झाला कीं तत्काल–आत्मप्रत्यय जाणार आणि लौकर Collapse होणार. अशा तऱ्हेनें राक्षस प्रजा मनानें पराजित झाली होती.

"V for victory" हा मूर्खपणा नव्हे; Victory through defeat इत्यादि सूत्रांनीं जें काम केलें आहे, तें आत्मप्रत्ययाच्या सामर्थ्याची प्रतीति करून देतें. आम्ही 'Victory' साठींच जन्माला आलों आहोंत. अशा तऱ्हेचा आत्मप्रत्यय असेल तर निर्बळ सुद्धां काम करूं शकतील. शालिवाहनानें मातीचें सैन्य उभें केलें आणि मातीसारख्या माणसांत चैतन्य निर्माण केलें. हनुमानानें लंकेतल्या प्रजेचें चैतन्य नष्ट केलें. त्याचें हें कार्य राजनीति आणि मानसशास्त्र यांचा सखोल अभ्यास दर्शवितें.

हनुमान रामाचा पूर्ण भक्त होता, तो प्रत्युत्पन्नमति होता. रामाचा हनुमानावर पूर्ण विश्वास होता. रावण मेल्यानंतर सीतेला ही बातमी सांगण्याठीं हनुमानाला पाठवितो; कारण कीं एकदम आनंदाची बातमी कळली तर कदाचित् Heartfail व्हायचा. अयोध्येंस पोंचल्यानंतर भरताच्या चेहेऱ्यावर रामाच्या येण्यामुळें विकार निर्माण होतात कीं नाहीं हें पाहण्यासाठीं सुद्धां हनुमानाला पाठवतो. अर्थात् अशा तऱ्हेच्या नाजुक प्रसंगीं महत्वाची कामगिरी पूर्ण बुद्धि लावून हनुमानच करूं शकेल. अशा तऱ्हेनें हनुमानाविषयीं रामाच्या अंतःकरणांत केवढा विश्वास होता हें दृष्टोत्पत्तीस येते.

हनुमानाचें पावित्र्य आणि शील यांविषयीं कोण काय बोलू शकणार? शील आणि चारित्र्य यांच्या बाबतींत ज्याच्या पायापाशीं देखील उभें राहण्याची ज्याची ताकद नाहीं असे लोक ऐतिहासिक दृष्टीनें अभिमान मनांत बाळगून ज्यावेळीं हनुमानाच्या जीवनावर चिखल उडवितात त्यावेळीं एक प्रकारची सात्विक चीड येते आणि या लोकांच्या मूर्खपणाविषयीं हसूं येतें! त्याच्या पावित्र्याचें रामायणांत अतिशय सुंदर वर्णन आहे. हनुमान लंकेंत रात्रीं सीतेचा सर्व ठिकाणीं शोध करतो. शेवटीं अंतःपुरांत सुंदर स्त्रियांच्या समुदायामध्यें तपास करण्यासाठीं जातो. तेथें अस्ताव्यस्त स्त्रियांना पाहातो. परंतु त्याला विश्वास होता कीं, 'माझ्या मनांत जरा सुद्धां विकृति निर्माण होणार नाहीं. ईश्वराचें काम करण्यासाठीं वाटेल त्या ठिकाणीं जावें लागलें तरी माझें मन विकाररहितच असणार' असें तो म्हणतो.

"कामं दृष्टा मया सर्वा विश्वस्ता रावणस्त्रियः।
न तु मे मनसा किंचित् वैकृत्यमुपपद्यते॥"

शरीर पाप करीत नाहीं पण मन पाप करतें, तें मनच किती शुद्ध होतें! आणि

स्वतःच्या अंतःकरणाविषयीं केवढा विश्वास ! त्या नैष्ठिक ब्रह्मचारी हनुमानाला अनंत प्रणाम !

अतिशय कर्तृत्ववान्, मुत्सद्दी, व्याकरणकार, मानसशास्त्राचा पूर्ण अभ्यास अशा हनुमानाचे बालपणसुद्धां वाल्मीकींनीं दाखविलें आहे. मंदोदरीला पाहातो, त्यावेळीं इतकी सुंदर सीताच असली पाहिजे असा विचार करून विचारी, व्याकरणाचा अभ्यासक नव्हे, परंतु व्याकरणकर्ता बुद्धिशाली हनुमान अतिशय आनंदित होऊन त्या आनंदाच्या भरांत तो शेपटी वर करून नाचायला लागतो ! किती दिव्य बालभावानें तो राहात असला पाहिजे ! हें बालभावाचें वाल्मीकींनीं केलेलें वर्णन वाचतांना आपल्याला आश्चर्य वाटतें. केवळ निष्पाप अंतःकरणाचीं माणसेंच अशा तऱ्हेच्या बालभावाचा उपभोग घेऊं शकतात. आपण सुद्धां उडी मारून बालपणाची आठवण केली पाहिजे. नेहमीं सुतकी चेहरा करून कां बसतां ? ईश्वराचे बच्चे आहांत ना ! कोणलाही बालभावाचें वर्णन अतिशय आवडतें.

ज्याप्रमाणें शक्तिसंपन्न आणि कर्तृत्ववान हनुमानाचा बालभाव दाखविला आहे, त्याचप्रमाणें त्याचा उत्कृष्ट दासभाव दाखविला आहे. राम हनुमानाला विचारतो की, तुला काय हवें ? त्यावेळीं, "मला माझी तुमच्यावर असलेली जी प्रेमभक्ति ती कमी होऊं नये, आणि रामाशिवाय दुसरा कोणताही भाव निर्माण होऊं नये—हेंच पाहिजे," असें उत्तर दिलें. त्यानें मुक्ति किंवा स्वर्ग मागितला नाहीं. रामानें शरयूमध्यें जलसमाधि घेतली. त्यानंतर हनुमान किष्किंधेमध्यें परत येतो. राम त्याला वैकुंठांत घेऊन गेला नाहीं, तर इथें ठेवून गेला आहे. तो छाती फाडून दाखवतो तरी सुद्धां रामच आहे. "जोंपर्यंत रामकथा आहे तोंपर्यंत अनुमान अमरच आहे." रामाची कथा ज्या ठिकाणीं चालणार त्या ठिकाणीं मारुतिरायाची कथा चालणारच. अशा तऱ्हेच्या,

**कुलं पवित्रं जननी कृतार्था वसुन्धरा पुण्यवती च येन ।**
**अपारसंसारसमुद्रमध्ये लीनं परे ब्रह्मणि यस्य चेतः ॥**

त्यानें आपलें संपूर्ण कुल पवित्र केलें, आईला प्रसुतिवेदनांचें दुःख विसरायला लावलें, अशा प्रकारच्या मुलांच्या आईलाच आई म्हटलें जातें. असा एकादा मुलगा असला तरी आईला स्वर्ग मिळेल; केवळ दहा मुलें होण्यांत काय आहे ? "भारं वहति गर्दभी" ! ईश्वराला ज्याची गरज भासली, ईश्वर ज्याला आपला म्हणतो, त्याची आई कृतार्थच होणार. धन्य तो हनुमान ! धन्य ती अंजनी, कीं जिच्या पोटीं तो जन्माला आला ! अशा तऱ्हेनें एक कर्तृत्ववान, मुत्सद्दी, पवित्र बालभाव असलेला, उत्कृष्ट दास्य भक्ति करणारा भक्त, ज्ञानी या सर्वांचें साकार रूप म्हणजे हनुमान होता. रामदास स्वामींनीं दास मारुति आणि वीर मारुति अशा दोन मूर्तींची स्थापना केली आहे— एकांत हनुमानानें ईश्वराचे चरण धरले आहेत आणि दुसरी लंकादहन केलें त्या प्रसंगाची कथा आहे.

एका मुलाला विचारलें कीं तुला कोण आवडतो ? दास मारुति कीं वीर मारुति ? मुलानें उत्तर दिलें कीं, 'दास मारुति.' जो दास होऊं शकेल तोच वीर होऊं शकेल. हनुमानाचें शौर्य दास्यभावांत आहे. दास मारुति व्हाल तर वीर मारुति व्हाल. रामाला जिंकण्यांतच शौर्य आहे. जो रामाला जिंकील तो रावणाला जिंकणारच. दास मारुतीनें रामाला जिंकल्याचें वर्णन आहे. रामाला जिंकण्यांतच मोठेपणा आहे–त्याच्यांतच कांहीं वैशिष्ट्य आहे. राम स्वतःशिवाय एक पाऊलही टाकणार नाहीं अशा तऱ्हेनें स्वतःच्या जीवनाची उत्कृष्ट आवश्यकता ( Supreme necessity ) हनुमानानें निर्माण केली होती. रामायणांतून हनुमान काढा, सुंदरकांड काढा आणि नंतर रामायण वाचा; रामायणांत अ रामायणाचा रंग निघून जाईल. मुलाचें उत्तर बरोबर आहे. रामाला जिंकण्यांतच बुद्धि आणि शक्ति यांचें खरें कार्य आहे. रामाला जिंकल्यानंतर रावणाला जिंकण्यांत कांहीं अर्थच नाहीं. त्यामुळें हनुमानानें रामाला जिंकलें यांत त्याचें कर्तृत्व, मोठेपणा दिसतो. त्यामुळेंच हनुमानाच्या जीवनाचें वैशिष्ट्य म्हणजे ईश्वराविषयी त्याचा दास्यभाव.

पराक्रमाचें मूळ, बुद्धीचा पाया आणि अकलेची सुरवात ईश्वराच्या दास्यभावापासून होते. हनुमानाचें एवढें महत्त्व त्याच्या दास्यभावामुळेंच आहे. परंतु चारित्र्य, ज्ञान, पावित्र्य, निर्भयता इत्यादि गोष्टीशिवाय दास्यभाव येत नाहीं. एक दिवस आपण असा आणू कीं, 'माझें वर्णन झाल्याशिवाय ईश्वराचें वर्णन होणार नाहीं,' हा विचार मारुतिमंदिरांत जातांना मनांत आला पाहिजे. त्यामधून जितकें लुटाल तितकें कमीच आहे. परंतु आज आपण दोन पैशाच्या तेलांत आणि एक आण्याच्या माळेंत हनुमानाची किंमत करून टाकली आहे. "शनिवारीं हें अर्पण करून शेंदुराचा टिळा लावण्यांत आपली सर्व भक्ति येते.'

शूर वीर नसेल तर त्याचा भाव कोण विचारणार ? हनुमान मांगल्य, पावित्र्य आणि चारित्र्य यांची आदर्शमूर्ति होता. त्याच्या अलौकिक चारित्र्याची कमाल आहे. त्याचा बालभाव वाचल्यावर खोलो बंद करून उडी मारावी असें वाटतें. त्याचा आत्यंतिक दास्यभाव आहे त्यामुळें रामचरित्रांत मारुतिरायच मुख्य आहे. त्याच्या चरित्राला वंदन केल्यानंतरच रामचरित्र यईल; नाहीं तर तो गुन्हा होईल.

राम हा हिमालयासारखा उत्तुंग आहे, त्याचें वर्णन करतांना हृदयाचा थरकांप होत आहे; परंतु हनुमानानंतर त्याचेंच वर्णन योग्य आहे.



# प्रार्थनेचें महत्व

लेखक — एक मुमुक्षु

प्रार्थनेला केव्हां व कशी सुरवात झाली ह्याचा विचार करतां असें दिसून येतें कीं, मानवजातीच्या बाल्यावस्थेंत मनुष्याला जेव्हां असा अनुभव आला कीं, ह्या जगामध्यें अशी कांहीं शक्ति आहे कीं, आपण कितीहि ज्ञानी व बलवान् असलों तरी ती आपले बेत हाणून पाडते, आपल्या शरीरावर व जीवितावर ताबा चालविते. ही शक्ति अत्यंत प्रबळ असून भयंकर आहे. तेव्हां तो ह्या शक्तीला वश करून घेण्याचा प्रयत्न करूं लागला. त्यानें तिला हांका मारण्यास, तिची विनवणी करण्यास, तिची स्तुति करण्यास सुरवात केली. पुढें तिला वश करण्यासाठीं तिची तो पूजा करूं लागला. तिला सुगंधी द्रव्यें अर्पण करावीं, आपल्याला आवडणाऱ्या वस्तु तिलाहि आवडत असणारच अशा कल्पनेनें तिला नैवेद्य दाखवावा, तिची आरती करावी, इत्यादि प्रकारांना सुरवात झाली. अर्थातच हे सर्व प्रकार त्या शक्तीच्या आपल्या कल्पनेप्रमाणें मूर्ति करून त्यांपुढें होऊं लागले. ह्याप्रमाणें मूर्तिपूजेला सुरवात झाली. ह्या पूजेचें प्रथमांग प्रार्थना होतें. ही पूजा सुरू होण्याचें कारण देवाच्या असामान्य शक्तीविषयीं किंवा चातुर्याविषयीं प्रेम नसून भीति हें होतें. तरीपण असल्या प्रार्थनेमुळें जें कार्य व्हावयाला पाहिजे तें अंशतः झालेंच. मनुष्याच्या रागापेक्षां देवाचा राग मोठा आहे, मनुष्याच्या प्रेमापेक्षां व मैत्रीपेक्षां देवाची मैत्री अधिक हितकर आहे, मानवी साहाय्यापेक्षां देवाची मदत श्रेष्ठ आहे ह्याची जाणीव मनुष्याच्या ठिकाणीं झाली असल्याची ही प्राथमिक प्रार्थना द्योतक होय. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ह्या प्रार्थनेच्या व पूजेच्या द्वारें मनुष्याचें व देवाचें अधिकाधिक सान्निध्य झालें हा अत्यंत महत्त्वाचा सुपरिणाम घडून आला.

यावरून आपल्याला स्पष्टपणें दिसून येतें कीं, प्रार्थना ही फार पुरातन आहे. प्रार्थना, कुराण, बायबल व वेद ह्यांच्याहि आधींची आहे. आपण डोळ्यांनीं अनेक वस्तु पहातों, पण डोळ्यांनीं वस्तूंचें जेवढें ज्ञान होतें तेवढें आपल्याला शब्दांच्या द्वारें बोलून किंवा लिहून व्यक्त करतां येत नाहीं. त्याचप्रमाणें प्राथमिक मनुष्याच्या अंतःकरणाला ज्या गोष्टींचा अनुभव आला त्या सर्व गोष्टी शब्दांद्वारें स्पष्ट करून दाखविणें त्याला शक्य नव्हतें. तेव्हां त्याची प्रार्थना केवळ अंतःकरणानेंच होत असावी. पुढें


भावेंत त्याची प्रगति झाली त्या मानानें तो गद्य व नंतर सुस्वर पद्यांत प्रार्थना करूं लागला.

परंतु प्रार्थना म्हणजे काय ह्या महत्त्वाच्या प्रश्नाचा आपण विचार केला पाहिजे. पुष्कळांच्या मतें प्रार्थना करणें म्हणजे भिक्षुकाची वृत्ति होय. प्रार्थना करणें म्हणजे मागणें, याचना करणें! गरिबानें श्रीमंतापाशीं मागावें; दुर्बलानें बलवानापाशीं मागावें. देव प्रेम, पावित्र्य, शांति इत्यादिकांचा सांठा आहे, तेव्हां ह्या सर्व गोष्टी मनुष्यानें त्याच्याजवळ मागाव्या! पण प्रार्थनेची ही कल्पना अगदीं प्राथमिक स्थितींतल्या माणसाला शोभण्यासारखी आहे. प्रार्थना म्हणजे याचकवृत्ति नव्हे. ती ह्यापेक्षां श्रेष्ठ आहे. आपण क्षणभर अशी कल्पना करूं कीं, देव म्हणजे चिन्मय विद्युत् आहे. आपलें मानवी अंतःकरण म्हणजे ही विद्युत् सांठविण्याचें ठिकाण आहे. एका ठिकाणाहून विद्युत् दुसरीकडे नेण्याला ज्याप्रमाणें तारा किंवा अन्य मध्य लागतो. त्याप्रमाणें ही चिन्मय विद्युत आपल्या अंतःकरणांत आणून सांठविण्याचें प्रार्थना हें केवळ साधन आहे. बाह्य हवेचा दाब शरीरवर्धनाला अवश्य असतो त्याप्रमाणें आध्यात्मिक वाढीला ह्या विजेची अत्यंत आवश्यकता आहे. ही वीज जर अंतःकरणाच्या ठिकाणीं नसेल व तिचा दाब जर अविरत असणार नाहीं तर आपली आध्यात्मिक वाढ व्हावी तशी होणार नाहीं. म्हणून प्रार्थनेची अत्यंत आवश्यकता आहे. ह्यासाठींच सेंट पॉल सारख्यांनीं 'अविरत प्रार्थना करा' असें आपल्या अनुयायांना सांगितलें आहे. परमेश्वराचा आपल्याला रात्रंदिवस छंद लागावा ही मयूरकवीची प्रार्थना ह्यासाठींच आहे. तेव्हां प्रार्थना करणें म्हणजे भीक मागणें व ती देवानें आपल्याला घालणें असा अर्थ नसून सदोदित ईश्वराच्या सान्निध्यांत रहाणें, नेहमी त्याचा अनुभव घेणें होय; हाच प्रार्थनेचा श्रेष्ठ अर्थ होय.

आपण जी प्रार्थना करतों तिला उत्तर मिळतें कीं नाहीं, देव प्रार्थनेला पावतो कीं नाहीं? हा प्रश्न करणें गैर होय; तो अस्थानीं आहे, असेंहि आपल्याला वाटण्याचा संभव आहे. अनेक वेळां आपल्या प्रार्थना व्यर्थ जातात असें आपल्याला वाटतें. आपण ज्या गोष्टी प्रार्थनेच्या द्वारें देवापाशीं मागतों त्या आपल्याला मिळत नाहींत. अशा वेळीं प्रार्थना करणें फुकट आहे असेंहि वाटण्याचा संभव असतो. परमेश्वरानें स्वतःच घालून दिलेले सृष्टीचे नियम तो स्वतःच बाजूस सारून आमची प्रार्थना सफल करील ही अपेक्षा चुकीची आहे. पुष्कळ वेळां प्रार्थनेला देव पावतो ह्याची मजेचीं उदाहरणे देण्यांत येतात व साध्या भोळ्या माणसांना तीं खरींहि वाटतात. एखाद्या अनाथ बालगृहामध्यें खाण्याला कांहीं नाहीं,

अशा वेळीं प्रार्थना केल्याबरोबर अन्नाची तरतूद होणें, प्रार्थनेमुळें रोग बरे होणें, प्रार्थनेमुळें सैन्यांना यश येणें, इत्यादि प्रार्थनापावनाचे दाखले जे देण्यांत येतात ते खरोखरच तसे नसून फुलाबोलाला गांठ पडणें होय, दुसरें कांहीं नाहीं. पॉलनें आपल्याला होत असलेला त्रास ( शारीरिक ) नाहींसा व्हावा म्हणून देवाची आग्रहानें त्रिवार प्रार्थना केली, पण त्याचा रोग नष्ट झाला नाही. परंतु तो रोग कायम राहूनहि, त्यामुळें होत असलेला त्रास सहन करूनहि आपलें कार्य करीत रहाण्याचें सामर्थ्य आपल्याला देतो, ह्याचाच अर्थ प्रार्थनेला पावणें किंवा प्रार्थना मान्य करणें होय.

शेवटीं एका मुद्याचा विचार करून आपण आटोपतें घेऊं. प्रार्थनेच्या द्वारें देवाजवळ काय मागावें ? जगिक गोष्टी, जगिक सुखें, मान, यश, कीर्ति इत्यादि देवापाशीं केव्हांहि मागू नये असें पुष्कळांचें म्हणणें आहे. ज्यामुळें आध्यात्मिक उन्नति किंवा वाढ होणें शक्य आहे अशा पारमार्थिक लाभासाठीं देवाची प्रार्थना करावी. भौतिक व आध्यात्मिक जगें देवाचीच आहेत म्हणून दोन्हीहि जगांतील योग्य लाभासाठीं प्रार्थना करणें योग्य होईल. आमच्या इकडच्या साधुसंतांनीं नेहमींच भौतिक लाभ तुच्छ मानून ते प्राप्त होण्यासाठीं प्रार्थना केलेल्या नाहींत. तुकारामानें तर परमेश्वराचा संग जोडून, त्यानें "अन्न वस्त्र चिंता नाहीं या पोटाची । वारिली देहाची थोर पीडा ॥" अशी स्थिती प्राप्त करून दिल्याबद्दल त्याचे धन्यवाद गाइले आहेत. अशी उच्च स्थिति आपणा सर्वांना सर्वच काळीं प्राप्त होणें शक्य नसतें. संसारिक ताप झाला असतां, असह्य अशा शारिरिक वेदना झाल्या असतां त्या नष्ट व्हाव्या म्हणून देवाची प्रार्थना करणें व त्याची अनन्यभावें करुणा भाकणें ह्या गोष्टी सहजगत्या आपल्याकडून होतात व त्यांत कांहीहि वावगें नाहीं. ईश्वरी नियमांना बाध येईल अशा गोष्टी प्रार्थनेच्या द्वारें मागणें अयोग्य होय, व आपली जसजशी ज्ञानवृद्धि होते तसतशा त्या आपण मागतहि नाहीं. वेदकालीन व उपनिषदकालीन प्रार्थना ह्यांतील फरक लक्षांत घेतां ह्या म्हणण्याची सत्यता दिसून येते. प्रार्थनेसंबंधीं ज्या एका गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे ती ही कीं, आपल्या हृदयाची शुद्धि असावी. प्रामाणिकपणानें, मनापासून केलेल्या प्रार्थनेला देव नेहमीं पावतो.



# सीतामाईवरील गोड गीत

( हें मोरोपंतांनीं आपले यजमान बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या घरीं असतां त्यांच्या घरच्या सुना–मुलींना झोंपाळ्यावर बसून गाण्यासाठीं म्हणून रचलें होतें. )

यज्ञासाठीं भूमि, नांगरितां धन्या । सांपडली कन्या, सीतादेवी ॥ १ ॥
जनकांची पुत्री, दुजी ना दुर्मिळा । ती भार्या उर्मिळा लक्ष्मणाची ॥ २ ॥
जनकाचा बंधू होता एकनिष्ठ । वय नें कनिष्ठ श्रेष्ठ गुणें ॥ ३ ॥
तेणें भरताशी मांडवी दुहिता । दिली जी सुहिता, दोहीं कुळीं ॥ ४ ॥
शत्रुघ्नाला दिली, दुजी श्रुतकीर्ती । जीची गाती कीर्ती पतिव्रता ॥ ५ ॥
चवघी बहिणी, भाग्यें झाल्या जावा । त्यांच्या गीतीं गावा सुसंवाद ॥ ६ ॥
वनवासवृत्त सीतेसी पुसती । प्रेमें त्या सुसती तिघी जणी ॥ ७ ॥
चित्रकूटाहुनी, पादुका घेऊनी । वियोग देऊनी तुम्ही आलां ॥ ८ ॥
आम्हीही तेथूनी तशींच निघालों । वनांत रिघालों तिघे जणें ॥ ९ ॥
लक्ष्मण भावोजी मागें पुढें स्वामी । मज आहें धामीं ऐसें वाटे ॥ १० ॥
अत्रीच्या आश्रमीं नेलें मज वाटे । माहेरचि वाटे खरेंखुरें ॥ ११ ॥
अनसूया सती करी वेणीफणी । आनंदाची धणी दिली मज ॥ १२ ॥
तेथें शूर्पणखा भार्या व्हाया आली । तिला माझी भ्याली चित्तवृत्ती ॥ १३ ॥
भावोजींनीं तीचा कर्णनासाछेद । केला कीं ते वेदशास्त्रार्थज्ञ ॥ १४ ॥
तीचा भाऊ खर होऊनियां क्रुद्ध । करावया युद्ध आला बाई ॥ १५ ॥
चवदा सहस्र राक्षस पापिष्ट । रणीं केले पिष्ट स्वामींनीं ते ॥ १६ ॥
तिनें प्राणरक्षें मुख मळविलें । वृत्त कळविलें रावणासी ॥ १७ ॥
छळाचा उपाय मनीं आठवीला । दुष्टें पाठवीला मायामृग ॥ १८ ॥
कपटी राक्षस जाणोनियां प्राण । घ्यावयासी बाण मोकलीला ॥ १९ ॥
तो बाण लागतां हृदय विदारी । दुष्ट हांक मारी स्वामीवाणी ॥ २० ॥
हा सीते ! हा बंधो ! लक्ष्मणा ! ये धावें । अंतकाळीं पावें भेटावया ॥ २१ ॥
मज वाटे माझ्या स्वामींचीच हांक । शिरे कंप धाक हृदयांत ॥ २२ ॥
मी म्हणें भावोजी, धांवा रक्षा प्राण । हे घ्या चापबाण उठा वेगीं ॥ २३ ॥
भावोजी म्हणती राक्षसाची माया । कोण रामराया पाहों शके ॥ २४ ॥
न वदावें तेंचि बोलिलें मी कोपें । चित्त शब्दरोपें विदारीलें ॥ २५ ॥
वांच्छितोसि दुष्टा, अग्रजाचा घात । माझ्या अंगा हात लावावया ॥ २६ ॥
माझ्या दृष्टीपुढें नको राहूं जाच । नरकींचा जाच मूर्त तूंचि ॥ २७ ॥

ऐशी बाई माझी ऐकतांचि वाणी । डोळां आलें पाणी भावोजींच्या ।। २८ ॥
वाटेंत धनुष्य ओढोनियां रेघ । गेले दयामेघ स्वामींकडे ।। २९ ॥
तों आला रावण होवोनी संन्यासी । न कळे अन्यासी छद्म त्याचें ।। ३० ॥
भिक्षा द्याया गेलें रेघेच्या बाहेर । सासर माहेर बुडवाया ।। ३१ ॥
रेघेच्या बाहेरी, जसा दिला पाय । झाला महाकाय दशमुख ।। ३२ ॥
जसा हरिणीतें हरितो लांडगा । तसा तो दांडगा हरी मातें ।। ३३ ॥
हा राम ! लक्ष्मण ! ऐसी हांक माजी । जटायु मामाजी आयकती ।। ३४ ॥
सखे दशरथ मामाजींचे आप्त । सोडवाया प्राप्त झाले दैवें ।। ३५ ॥
जातींचे ते गृध्र, वृद्ध मोठे शूर । रथ केला चूर रावणाचा ।। ३६ ॥
अन्यायें रावण छेदी त्याचे पक्ष । मज वाटे लक्ष बंधुघात ।। ३७ ॥
मूर्च्छित मामाजी पडले भूवरी । स्कंधीं वाहे अरी, मला बाई ।। ३८ ॥
नेऊनियां ठेवी अशोकवनांत । न शोक मनांत माये माझ्या ।। ३९ ॥
सहस्र राक्षसी करिती रक्षण । चिंतातीत क्षण न सांपडे ।। ४० ॥
दिव्यान्नाचें ताट ये मजजवळ । भक्षीं मी कवळ एक दोन ।। ४१ ॥
फिरले घेऊनी मारीच्याचे प्राण । दिव्य धनुर्बाणपाणी मार्गें ।। ४२ ॥
मार्गीं लक्ष्मणजी करिती वन्दन । श्रीरघुनंदनचरणांतें ।। ४३ ॥
म्हणती वत्सा, त्वां कां आज्ञा मोडिली । एकली सोडिली कां ती वनीं ।। ४४ ॥
भावोजींनीं सर्व वृत्त कळविलें । मुख मळविलें अश्रुपातें ।। ४५ ॥
केला आधीं फार शोध मग शोक । धन जातां लोक करी जैसा ।। ४६ ॥
शोधितां वनांत मामाजी पाहिले । धरूनि राहिले कंठीं प्राण ।। ४७ ॥
पुसती बापाजी झाली हे कां गती । मामाजी सांगती अर्धशब्दें ।। ४८ ॥
स्वामीपाशीं माझें सांगतां हरण । पावले मरण शोकभरें ।। ४९ ॥
मामाजींची सांग संपादिली क्रिया । त्या काळीं हे प्रिया नाठविली ।। ५० ॥
आलिंगिल्या वल्ली वियोगें भ्रमले । शोधीतां श्रमले रात्रंदिवस ।। ५१ ॥
वनीं कबंधानें केला होता घात । चार कोस हात लांब त्याचे ।। ५२ ॥
सुग्रीवासी भेटी ऋष्यमूकीं झाली । त्याची दृष्टी वाली पाहतांची ।। ५३ ॥
सुग्रीव वानर सूर्याचा तनय । ज्या स्वप्नीं अनय नाहीं ठावा ।। ५४ ॥
बंधूची स्त्री वाली बलात्कारें भोगी । सुग्रीव तो जोगी केला होता ।। ५५ ॥
एके बाणें वाली स्वामींनीं मारिला । सुग्रीव तारिला संकटांत ।। ५६ ॥
माझी वार्ता कोणा न कळे किमपी । पाठविले कपी शोधावया ।। ५७ ॥
श्रीरामाची भार्या सोडवितां मेला । जटायु तो गेला सद्गतीसी ।। ५८ ॥
शत गांवें बाई मारुती उडाला । पुण्यें न बुडाला सागरांत ।। ५९ ॥
पुरीं शोधी होय सशोक मनांत । अशोकवनांत मग आला ।। ६० ॥
हळूच मारुती सद्गुणसमुद्रा । वर्णी मग मुद्रा मज दावी ।। ६१ ॥

मज म्हणे चाल, बैस माझे स्कंधीं । तूं दुर्गा, मी नंदी दास तुझा ॥ ६२ ॥
तेव्हां मी बोलिलें नेशील बा खरें । परी नव्हे बरें, असें जाणें ॥ ६३ ॥
युद्धीं मारितील या मेल्यासी स्वामी । तेव्हां सुख बा मी दाखवीन ॥ ६४ ॥
मग तें अशोक–वन कपी मोडी । राक्षसांचें झोडी बळें सैन्य ॥ ६५ ॥
रावणें वानर मानूनियां तुच्छ । पेटविलें पुच्छ जाळावया ॥ ६६ ॥
पुच्छ पेटतांचि हनुमंत उडे । लंकेमध्यें हुडे वाडे जाळी ॥ ६७ ॥
विश्वासोनि मज जाय स्वामीकडे । पायांवरी पडे हनुमंत ॥ ६८ ॥
सेतुपंथें सिंधु लंघुनियां आले । वार्तामृतें घाले कर्ण माझे ॥ ६९ ॥
दूत पाठविला दुर्जनभंगद । तेजस्वी अंगद वालीपुत्र ॥ ७० ॥
मारिले प्रधान रावणाचे पोर । त्यांत बळी थोर इंद्रजीत ॥ ७१ ॥
रावणाचा भ्राता कुंभकर्ण काळ । तेणें कपी माळ धरियेला ॥ ७२ ॥
बहिणीची तैसी, त्याची करी गती । स्वयें कपिपती सुटोनियां ॥ ७३ ॥
इंद्रासी असह्य इंद्रजित परी । मारीला तो अरी भावोजींनीं ॥ ७४ ॥
मारीला प्रभूंनीं सहपरिवार । उतरीला भार धरणीचा ॥ ७५ ॥
शिबिकेंत मज घालोनि आणीलें । देह त्यां न्हाणीलें अग्निकुंडीं ॥ ७६ ॥
त्या काळीं देवांनीं केली पुष्पवृष्टी । आनंदानें सृष्टी कोंदाटली ॥ ७७ ॥
आले दशरथ मामाजी विमानीं । धन्य जीवीं मानीं आपणां मी ॥ ७८ ॥
दाविली किष्किंधा भेटविली तारा । सुग्रीवाची दारा, जाऊबाई ॥ ७९ ॥
संतती संपत्ती वाढे होय हीत । प्रेमें गातां गीत श्रीरामाचें ॥ ८० ॥
श्रीरामातें ध्यावें श्रीरामातें गावें । श्रीरामातें भावें आठवावें ॥ ८१ ॥




श्रेष्ठ प्रतीची

जी. बी. फाऊंटनपन

इंक नेहमीं वापरा.

जी. बी. विचारे आणि कं.,

लायब्ररी रोड, दादर–मुंबई २८.

# वाल्मिकी महामुनी

लेखक : आर. व्ही. कामत, बी. ए. बी. टी.

रामनाम आज अमर आहे. रामायण हा भारताचा प्राण आहे. हे रामायण राम जन्माला येण्याचे हजारों वर्षे अगोदर लिहून आपल्या भविष्यवाणीनें व लेखणीनें रामनाम रामजन्माचें अगोदरच जर कोणी अमर केलें असेल तर तें महर्षि आदि कवी वाल्मिकानें होय. या कवीचें नांव वाल्मिकी. वाल्मिकी हें नांव कां पडलें ? वाल्मिकी या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे मुंगीचें वारूळ. मुंग्यांचें वारूळ हें जमिनीमध्यें तयार केलेल्या मातीचें असतें व तें मधमाशांनी तयार केलेल्या मधाच्या पोळ्यासारखें दिसतें.

वाल्मिकीच्या जन्माबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या जातात. कोणी म्हणतात, एक मल्लाह किंवा भिल्ल आदिवासी जातीची एक स्त्री होती, व तिला एका मातीच्या वारुळावर ठेवलेलें एक मूल जंगलामध्यें काम करीत असतां आढळलें. वारुळावर मिळालेलें मूल अशा अर्थी तिनें या मुलाचें नांव वाल्मिकी असें ठेविलें. घरीं घेऊन आली व तिनें त्याचें पालनपोषण करून त्यास वाढविलें.

दुसरें असें म्हणतात कीं, हा ऋषि तप करीत असतां त्याचे अंगावर मुंग्यांनीं वारुळाचे घर केलें. तरी त्यानें आपल्या तपाचा भंग होऊं दिला नाहीं. त्याला कशाचीही दाद नव्हती इतका तो तपश्चर्येत दंग होऊन गेला होता व पुढें त्याला त्या तपश्चर्येचें फळ म्हणून हें महाकाव्य लिहिण्याची शक्ति मिळाली. असा हा वारूळ अंगावर वाढविणारा म्हणून त्यास महर्षिवाल्मिकी हे नांव पडले.

तें कांहीं असो. परंतु एक गोष्ट खरी कीं, वाल्मिक हा एक महर्षी होता. त्याचे कुळ–जन्म–गोत्र ह्याबद्दल निश्चित अशी कांहीं माहिती मिळत नाहीं. त्याचप्रमाणें त्याचा जन्म किती वर्षांपूर्वी झाला हेंही निश्चितपणें सांगतां येत नाहीं. एवढें खरें कीं, त्याचा जन्म फार पुरातन काळीं म्हणजे इ. स. पूर्वी हजारों वर्षे व राम जन्मास येण्याच्या अगोदर हजारों वर्षांपूर्वी त्याचा जन्म झाला ही गोष्ट निश्चित. पण जन्माबद्दल जास्त चर्चा हवीच कशाला; कारण ऋषीचें

कूळ व नदीचें मूळ शोधूं नये म्हणतात. एका सुप्रसिद्ध महाकवीनें म्हटलें आहे- दैवायतम् कुलेजन्म । मदायत्तंच पौरुषं "जन्मा येणें दैवाहातीं, करणी जग हांसवी, अर्थंची गाणें कुलथोरवी."

वाल्मिकीचें लहानपणाचें नांव रत्नाकर असें होतें. लहानपणापासून खोटें बोलणें, लहान लहान वस्तू लांबविणें, चेष्टा करणें यांत तो पटाईत होता; व कोणीच कांहीं न सांगितल्यामुळें तर तो एक मोठा सराईत दरोडेखोर बनला. वाटमारी हाच एक त्यानें उपजीविकेचा धंदा बनविला. तो एका जंगलामध्यें तो राहात असे. व जो कोणी वाटसरू वाट चुकून आला असेल त्याला पकडावयाचें व त्याचेजवळ जें कांहीं असेल तें लुटून खावयाचें व त्यांनीं देण्याचें नाकारलें तर त्याला ठार मारावयाचें हा एकच एक त्यानें आपला नवीन व्यवसाय बनविला. या वाटमारी धंद्यावरच तो आपल्या एवढ्या मोठ्या कुटुंबाचें उदर भरण्याचें कार्य चालवीत असे.

बरेच दिवसपर्यंत प्रवाशास लुटण्याचें त्याचें हें कार्य सतत चालू होतें. एके दिवशीं असाच एक साधू त्या जंगलामधून चालला होता. रत्नाकर पण त्या दिवशीं शिकार शोधून शोधून थकला होता. दिवसभर वणवण भटकून देखिल रत्नाकरला एकहि प्रवासी लुटावयास मिळालेला नव्हता. एवढ्यांत हा प्रवासी साधू रत्नाकराचे नजरेस आला. रत्नाकरला फार आनंद झाला. त्यानें आपलें जाळें त्या साधूवर टाकलें. त्याला पकडलें व नेहमीच्या रिवाजाप्रमाणें त्या साधूस सवाल केला. "महाराज, बोला! आपणापाशीं जी कांहीं धनदौलत व इतर मिळकत असेल ती या ठिकाणी टाका आणि मोकळे व्हा, नाहीं तर माझ्याशीं—म्हणजे आपल्या प्राणाशीं गांठ आहे. समजले!" साधू शांतच होता व त्याने शांतपणें लुटारू रत्नाकरास प्रश्न विचारला, "अरे हे लुटारू" हें तूं सर्व कशाकरितां बरें चालविलें आहेस! प्रवाशांस लुटून मारून त्यांची शिकार कां करतोस बरें!

रत्नाकर : तें तुला काय करावयाचें आहे! हा माझा धंदा आहे. तूं मला कोण विचारणार! मी कांहीं तुझ्यासारखा नंगा भिकमाग्या साधू नाहीं. मला मुलेंबाळें कुटुंब आहे, आणि मी विचारतों कीं, तूं मला विचारणारा कोण! जें कांहीं गांठीं असेल तें दे आणि चालता हो. नाहींतर प्राणास मुकशील. बोल, काय हवें तुला तें—

साधू : अरे, तूं हें मानवहत्येचें पाप कां बरें करतोस! दुसऱ्याचे तळतळाट कां बरें घेतोस!

रत्नाकर : मी पाप नाहीं करीत. मी माझी बायको, पोरेंबाळें यांचे जीव जगवीत असतो. गृहस्थाश्रमी म्हणून मुलांबाळांना पोसणें हा माझा धर्म आहे. तें माझें एक कर्तव्य आहे.

साधू : हें ठीक आहे. आपल्या पत्नीला, मुलांबाळांना पोसण्याकरितां तूं हें पाप करीत आहेस व तूं केलेल्या लूटमारीवर तुझीं मुलेंबाळें चैन करीत आहेत. मी तुला आतां एकच विनंती करतो कीं, जरा तूं आपल्या घरीं जा व तुझ्या श्रमावर जगणाऱ्या व तूं केलेल्या पापावर व पापांनीं जमवलेल्या संपत्तीवर चैन करणारी मुलें बाळें व पत्नी कुटुंबीयांना विचार कीं, जसे तुम्ही माझे संपत्तीत भाग घेतां तसें माझ्या पापांत भागीदार व्हाल काय?

रत्नाकर : हें बरें आहे. म्हणजे मी घरीं गेलो कीं तुम्ही एथून चालते व्हाल व माझी शिकार पण जाईल.

साधू : अरे तसे नव्हे रे, मी एथून एक रेसभरही हालव नाहीं, तूं जाऊन विचारून तर ये. एवढा विश्वास नसेल तर मीही तुझ्या घरापर्यंत येतो. मी बाहेर उभा राहतो व तूं विचारून आल्यावर तूं आमची शिकार कर.

बरें, असें म्हणून—ते सर्व रत्नाकरचे घरापर्यंत गेले. स्वतः साधू महाराज, बाहेरच उभे राहिले व रत्नाकर घरीं गेला. रत्नाकरनें घरांत गेल्यावर बायको मुलेंबाळें ह्यांना जवळ बोलावून पुढील प्रश्न केले—

**रत्नाकर** : हें पहा, मी तुम्हाला येथें सर्वांना कां बोलावले आहे हें माहीत आहे काय?

सर्वांनी विचारलें : कां? आम्हांला काय माहीत?

रत्नाकर : मग ऐका आतां मी काय सांगतों तें आणि मग उत्तर द्या. माझ्या प्रश्नाचें. आजपर्यंत मी तुम्हांला केवळ पोसलें नाहीं तर चैनींत जीवन जगवूं दिलें. मुलांना उंची उंची कपडे व चांगली खाणी दिलीं. तुम्हां सर्वांना कोणत्याही प्रकारची उणीव भासूं नये याकरितां मी परिश्रम केले. हें सर्व वैभव कोठून आणलें व कसें मिळविलें याचा विचार तुम्हीं कधीं केला आहे काय?

सर्वजण : नाहीं! आम्हांला जरूर काय?

रत्नाकर : मग पुढें ऐका! मी यापैकीं कोणतीही गोष्ट सन्मार्गानें किंवा श्रम करून मिळविलेली नाहीं. हा सर्व पैसाअडका, सोने, नाणे हें मी सर्व रस्त्यावर हजारों वाटसरूंची लूटमार करून किंवा ठार मारून मिळविलेली आहे. त्यामुळें मीं माझ्यावर हजारों पापांचे डोंगर उभारले आहेत.

सर्वजण : बरें मग? आपलें म्हणणे तरी काय आहे?

रत्नाकर : सांगतो ऐका. हें सर्व पापांचे डोंगर मला मरणानंतर फेडावे लागतील. चित्रगुप्त माझ्या पापांची यादी करील; तर आपण माझ्या पापांच्या हिश्याचें भागीदार व्हाल काय? ज्याप्रमाणें आपण माझ्या पैशावर व वैभवावर चैन चालविलीत व वैभवाचे जसे वांटेकरी झालांत तसे माझ्या पापांचे वाटेकरी व्हाल किंवा नाहीं!

सर्वजण : वा ! काय प्रश्न विचारतां. आज तुम्हीं आम्हाला काय ही बडबड लावली आहेत. आम्हाला तुम्हीं काय म्हणतां तेच कळत नाहीं.

मुलें : आई, बाबा आज असें काय ग बडबडतात ?

बायको : आज जरा काम बिघडलेलें दिसते (नवऱ्याकडे पाहून) हें पाहा, मी तुम्हांला एकदां शेवटचें स्पष्ट सांगत ते ऐका. तुम्ही काय म्हणता तेंच आम्हांला कळत नाहीं. तुम्हीं काय करतां, कसे मिळवतां याचा विचार करण्याकरितां आम्ही नाहीं. तुम्ही मिळवून आणल्यानंतर त्यांची योग्य विल्हेवाट कशी लावयाची एवढेंच आम्हांला समजते. पापपुण्य हे आम्हांला कांहीं कळत नाहीं. तुमच्या पापांत आम्हांला भागीदार होण्याचे काय कारण आणि आजच काय हें खूळ तुमचे डोक्यांत शिरलें आहे. कोण भेटला कीं काय रस्त्यांत गुरुबिरु ! रोज कसे देवासारखे वागत होतात. भेटला कीं काय एकादा जोगड्या ?

रत्नाकर : बरें, आज मला जीवनाचा खरा अर्थ कळला. आज माझे डोळे उघडले. किती मूर्खासारखा वागत आलों मी आतांपर्यंत. पाणी समजून मी संसाररूपी मृगजळामागें धांवत गेलों. जो पाप करील तो त्याचें फळ भोगील हें सत्य आहे. माझीच चूक झाली. ज्यांना मी माझे समजत होतो ते माझे नव्हत. ते माझ्या वैभवाचे व पैशाचे आहेत. खरा माझा मीच. ज्याचा तो हेंच खरें. बाकी सर्व देखावा. संकट-काळीं कोणी कोणाचें नाहीं. असो. आज ह्या साधूनें माझे खरे डोळे उघडले. त्यांनाच विचारावें यांतून कोणता मार्ग माझ्या पापांचे क्षालन होण्याकरितां केलेल्या पापांचे निर्मूलन होऊन मी चांगला सदाचारी होईन; असे विचार त्याच्या मनांत आल्यावर तो त्या साधूला विचारण्याकरितां त्यांच्याकडे आला.

रत्नाकर विचारतो—गुरुदेव, मला आजपर्यंत केलेल्या पापाचा पश्चात्ताप झाला आहे. व मला खऱ्या शाश्वत सुखाचें समाधान कशांत आहे याचें मार्गदर्शन आपणा-कडून होईल अशी आशा आहे व ते आपण पुरवूं शकाल अशी माझी खात्री आहे.

साधु : अरे त्यांत अवघड असें काय आहे आणि त्यांत मेहेरबानी ती कसली. जीवनांत आडवाटेला गेलेल्याला, मोहाला बळी पडणाऱ्याला मार्ग दाखविणें हें तर प्रत्येक साधूचें कर्तव्य असतें व त्याकरितांच संतलोकांचा जन्म असतो. हें जगाच्या अंतापर्यंत चालत राहणार. कारण मनुष्यस्वभावाचा कल हा अधर्माकडेच असतो. याकरितांच सज्जनांचा जन्म असतो. नाहीं तर जगाचा कारभार सुरळीत चालूं शकणार नाहीं. या साधुलोकांच्या तपोबलावरच जगाची धारणा होत असते. फक्त आपल्या जीवनांत त्यांची गांठ पडणें हा एक महाभाग्याचा सुदीनच म्हटला पाहिजे. अशी एकदांच वेळ येते.

ज्याअर्थी तूं मला हा प्रश्न विचारीत आहेस व तुला पूर्व जीवनाचा पश्चात्ताप झाला आहे असे म्हणतोस त्याअर्थी खरोखरच आतां तुझा कायापालट होऊन

जीवन बदलण्याचाच हा योग आलेला आहे; तेव्हां आतां मी तुला थोडकाच अगदीं साधा व सोपा उपाय सांगतो, तो ऐक. तो उपाय म्हणजे एके ठिकाणीं बसून सतत "राम" नामाचा जप करणें हाच होय. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं रामनामाशिवाय कांहीं दिसतां कामा नये व तोंडून रामनामाशिवाय दुसरा शब्द येत कामा नये. तेव्हां आतांच बोल 'राम', 'राम' असा जप माझ्या देखत हा मंत्र म्हणण्यास सुरवात कर पाहूं.

रत्नाकर : रामनाम उच्चारण्याचा प्रयत्न करतो, पण मरा, मरा, असे शब्द येतात. तेव्हां साधु म्हणतो, तसे नव्हे. पुन्हा म्हण राम राम–पुन्हा प्रयत्न करतो पण 'मरा मरा' 'हेच शब्द येतात.' निराश होतो व बोलतो महाराज मला 'राम राम' हे शब्द बोलता येत नाहींत, काय करूं बरें.

साधू : असूं दे. मनामध्यें 'राम राम' असे म्हणावयाचें नक्की ठरव मग पहिल्यानें जरी 'मरा मरा' शब्द आले, तरी कांहीं दिवसांनीं रामराम असे शब्द आपोआप येतील. पण कांहीं झालें तरी निश्चय सोडूं नको व तप सोडूं नकोस. बरें मी जातो. असें म्हणून साधुमहाराज निघून गेले व रत्नाकरानें आपले तप चालू ठेविलें होते. असें करतां करतां एक दिवस असा उजाडला कीं, त्याचे तोंडून आपोआपच 'राम राम' असे शब्द येऊं लागले व रत्नाकराला गुरुकृपेनें व ईश्वरप्रसादानें मी कोण आहे. याची जाणीव होऊन ज्ञानप्राप्ती होऊं लागली. रत्नाकर आस्ते आस्ते रामभजनीं लागूं लागला. पुढें मोठा पंडित होऊन रामायणाचा निर्माता बनला व राम जन्मास येण्याच्या अगोदरच रामायण तयार केले, त्यांतच या कवीचें श्रेष्ठत्व दिसून येतें. असा दरोडेखोरांतून शब्दकार कविश्रेष्ठ आपल्या तेजोवाणींतून निर्माण करणारा महान तपस्वी कोण बरें !

पुष्कळांची अशी समजूत आहे. वाल्याला भेटलेला हा साधु दुसरा तिसरा कोणी नसून स्वतः नारदमुनी होते. नारदमुनींचें ईश्वराची आराधना करणें व लोकांना त्याचें महत्त्व पटवून देणें हेंच जीवनकार्य होते. जो मनुष्य पापी आहे त्याला सन्मार्गाला लावण्याचे काम हे मुनीलोक करीत असतात. रत्नाकराला जीवनमुक्त करण्यासाठींच केवळ नारदमुनी तेथें स्वतः आलेले होते व त्यांनीं ईश्वराचें स्वरूप काय आहे याची संपूर्ण ओळख करून दिली. त्यामुळें रत्नाकर हा कृतार्थ झाला.

रत्नाकराचें मन विचाराकडे लागलें. आजपर्यंत आपण संपत्ति मिळविली त्यावर सर्वांनीं चैन केली, पण अखेरचे वेळेस जो तो मागें पाऊल घेऊं लागला. सर्वजण मला सोडून जाऊं लागले. जग हें दिल्याघेतल्याचेंच. 'शेजेची कामीण सोडून जाई' हें तुकाराममहाराज म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. नुसता मी साधा प्रश्न विचारण्याबरोबर प्रत्येकानें आपलें अंग झटकलें. मग प्रत्यक्ष वेळ आली तर हे काय करतील बरें. असो. आतां आपण एकट्यानेंच यांतून आपला ईश्वर भेटीचा मार्ग काढूं या. त्याप्रमाणें आपण आपलें पाप आपल्या वागणुकीनें पूर्ण कृतीनें तयार

**केलें तसाच आपण आपल्या कल्याणाचा पुण्यमार्ग शोधून काढूं व जीवनक्रम कंठू. एकटेच या कल्याणकारी मार्गाची वाटचाल करूं या !**

असें म्हणून रामनाम उच्चारीत सबंध जंगलभर रत्नाकर वणवण फिरत राहिला. पण रामनाम कांहीं नीटपणे त्याचे तोंडून होईना. जे शिकलेले, केवळ व्यवहारी शिक्षणाचा मार्ग चोखाळलेले आहेत व ज्यांना आपल्या शिक्षणाचा व बुद्धीचा उपयोग केवळ स्वतःच्या स्वार्थाकरितां, व चैनीकरितां व लौकिक सुखाकरतां खर्च करावासा वाटतो, असेच लोक एके ठिकाणीं गृहस्थाश्रमी होऊन, घनदारा, मुलेंबाळें यांच्या सहवासांत सुखानें कालभ्रमण करीत असतात. परंतु ज्यांना ईश्वरा चिंतनाचें व परमेश्वराच्या भेटीचें, अंतीम मोक्षाचें वेड लागलें आहे. ते लोक त्याचे दर्शनाकरितां, त्याच्या प्रेमानें वेडे होऊन इकडे तिकडे ईश्वर चिंतन करीत फिरत राहतात. रामनामाचा जप करणें व साधू लोकांची संगती धरणें हेच केवळ त्यांचें ध्येय ठरते व त्याकरितां वाटेल ते करावयाचे, जिवाची पर्वा करावयाची नाहीं हाच त्यांचा जीवननिश्चय असतो. ह्याप्रमाणें ठरवून एक दिवस असाच जंगलामधून फिरत असतां त्याला एक जोराची टोकर लागली व डोळयापुढें काळोखी येऊन जमिनीवर पडला ! त्याला तिरमिरी आली. इतक्यांत अचानकपणें आपणास कोणीतरी हात देऊन उठवीत आहे व म्हणत आहे कीं, "अरे, असा इतक्यांतच निराश काय होतोस ! असा भटकतोस काय ? रामनामाचे ध्यान करीत एके ठिकाणीं बसून तपश्चर्या कर कीं राम आपोआपच तुला प्रसन्न होईल व देवदर्शन घडेल !" असा भास झाला. रत्नाकराला या आकाशवाणीनें बराच धीर आला व त्यानें तसा वागण्याचा निश्चय केला. घनदाट अरण्यांत एकांत व प्रशांत अशा स्थळी मोठ्या आम्रवृक्षाच्या घनदाट छायेंत एक मोठाथोरला सपाट पत्थर शोधून काढून त्यावर सिंहासन मांडून तो ईश्वराधना करीत बसला. "रामनाम" जपण्यास त्यानें सुरवात केली.

हें ठिकाण इतकें भयाण व शांत होते की, जिवंत मनुष्य जाणें तेथें अशक्यच. केवळ हिंस्र पशूंचाच वावर तेथें तुम्हांस कोण विचारतो ? अशा भयाण पण एकांतात कोणी कांहीं त्रास देणार नाहीं, मनुष्यप्राण्याचें दर्शन होणार नाहीं अशा ठिकाणीं या रत्नाकरानें तपश्चर्येस सुरवात केली. रामनामाशिवाय दुसरा जप करावयाचा नाहीं असा निश्चय केला.

**ऊग्र तपश्चर्या**

तपश्चर्या करतां करतां अनेक दिवस गेले. रत्नाकरानें खाणेंपिणें सर्व कांहीं बंद केलें. उपोषण व शरीराचे हाल करून रामनामाचें ध्यान करावयाचें असा त्यानें विचार केला. हवेशिवाय जगतां येणें अशक्यच आहे. म्हणून त्यानें केवळ नाममात्र श्वासोच्छ्वास चालू ठेविला होता. डोळे असून अंधळा होण्याचें त्यानें ठरविलें. कोणाशीं भाषण नाहीं किंवा शरीराची बिलकुल हालचाल नाहीं. झालें. त्याच्या ह्या कडक तपश्चर्येचा जिकडे तिकडे बोलबाला सुरू झाला. तो एक चर्चेचा विषयच झाला. जो तो म्हणूं

लागला—एके काळचा हा बडा बदमाष डाकू आज मोठ्या कडक तपश्चर्येत देवाच्या आराधनेंत गुंग झाला आहे. अरे काय म्हणावें याला ! काय काळाचा महिमा आहे ! पहा तर ! जो तो रत्नाकराला धन्यवाद देऊन मनःपूर्वक त्याची स्तुती करूं लागला. कित्येक तर कौतुकानें त्याच्याकडे पाहात. आश्चर्यानें थक्क होत असत. हे आहे तरी काय ! आणि हें झालें कसें !


दिवसें दिवस रत्नाकराच्या तपश्चर्येचें स्वरूप अधिक कडक व उग्र होऊं लागले. त्याचें शरीर सुकत चालले. दाढी वाढूं लागली. केस वाढूं लागले. चेहऱ्यावरची मर्दमुखी व तेज नाहीसे होत चाललें. त्याच्या चेहऱ्याकडे पहावेना. श्वासोच्छ्वास चालू आहे कीं बंद हेंही कळेना. शरीराची घडपड पण दिसेना. लोक त्याला एक महात्मा समजूं लागले. लोक म्हणावयास लागले कीं वाल्मिकीनें प्राण पणास लावून तपश्चर्येस सुरवात केलेली दिसते. याला प्राणाचीही पर्वा नाहीं. इतका हा ईश्वराधनेंत तल्लीन झालेला दिसतो. आतां मरणें कीं जगणें हें केवळ त्याच्याच इच्छेवर अवलंबून आहे. तपश्चर्येला किंवा आराधनेस लागलेला मनुष्य हा जिवंत असून मेलल्या स्थितीत असतो. याप्रमाणें झोपलेल्या मनुष्यास कोणत्याही गोष्टीचें भान नसते—तो खाणे, पिणें, ऐकणें, देखणें सर्व इन्द्रीयांच्या क्रिया विसरून जातो. त्याप्रमाणें तपस्वी हा असतो. खरा मुनी ध्यानस्त ऋषी हा जिवंतपणी मेलेला दिसतो. पण त्याचें आत्मज्ञान जागृत होत असते व अन्तर्दृष्टी तेजस्वी होत जाते. त्याचे अन्तःचक्षू विश्वा पलीकडे पाहूं लागतात.

म्हणून मोठे लोक ध्यान करीत बसतात. ते ह्या असह्य अशा काळज्या वेदनांच्या जगाला; शोकमय संसाराला विसरून जात असतात. भगवान, देव यांचे आराधन करून मनाला शांती व एकाग्रता प्राप्त करून घेत असतात. संसार व ऐहिक **शारीरिक सुखें यांचा त्याग करून प्राणपणास लावून ईश्वराची आराधना करणें यासच प्राणायाम योग असें नांव दिलेलें आहे.** प्राणायाम योग आचरणारा हा योगी पुरुष असतो. तो कधीच मरण पावत नाहीं. जो जो तो आपले प्राणायाम योगाचें कडक व्रत वाढवीत जाईल, तों तों त्याचें आयुष्य वाढत जाऊन आणि कर्तव्य तेजस्वी होत जाते. जे ते लोक वाल्मीकीचे दर्शनास येऊं लागले. तेव्हां एकदांच त्यानें लोकांना कळविलें, लोक हो, विनाकारण शोक करूं नका ! मी तप, ईश्वराराधनेंत गुंग असून मला ईश्वराचे दर्शनाची अत्यंत उत्सुकता लागलेली आहे. माझे आराधनेंत अडथळा करूं नका. एवढीच माझी विनंती आहे !

जसजसें अन्न आटत चालले, आहार कमी होत चालला तसतसे रत्नाकराचें (वाल्मीकीचें) शरीर पण कमी कमी होऊं लागलें. वाळत चाललें व सुकत चाललें; ते इतके कीं श्वासोच्छ्वासाखेरीज त्यांचे अस्तित्वच कळेना. शरीराची निगा घेणारे पण कोणी शिल्लक नव्हते व जंगलांत दुर्लक्ष केल्यामुळें आस्ते आस्ते त्यांच्या शरीरावर


मुंग्यांनी व कीटकांनी आपापली घरटी घालावयास सुरुवात केली होती. ज्याप्रमाणें एकाद्या जुनाट झाडांवर लहान लहान घरटी, मातीची वारुळें व मधमाशांची पोळी असावीत व तो वृक्ष ज्याप्रमाणें दिसावा त्याप्रमाणें वाल्मीकी ऋषी आतां दिसू लागले. पुष्कळ वर्षें गेली, अनंत काळ लोटला. वाल्मीकीचा सर्व देह वारुळानी झाकूं लागला. नाकाखेरीज सबंध देह दिसेनासा झाला.

आणि मग देवाला वाटलें कीं, आतां आणखी अंत किती पहायचा, देव प्रसन्न झाले व तो पापी परंतु तपश्चर्येनें व रामनामानें पावन झालेला पुण्यपुरुष ख्यातनाम वाल्मिकी झाला व जगातील अमर असें महाकाव्य—**रामायण** रचता झाला.




## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स**
बापू [illegible] स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर

# आजच्या युगाचें दैवत ?

लेखक : द. शं. टिपणीस

**भागवत धर्मांचें ध्येय, पहाण्याचा दृष्टीकोन या गोष्टी मागील दोन लेखांकांतील विवेचनावरून सर्वसाधारणपणें ध्यानीं आल्या असतील. त्यावेळच्या परिस्थितीस अनुरूप होईल अशाप्रकारें भागवत पुराणांतर्गत भागवत धर्मांचा एकनाथांनीं आपल्या एकनाथी भागवतांत जो विस्तार केला आहे, त्याचा विचार या लेखांत करून पुढील लेखांत हाच भागवतधर्म बदलत्या काळास जमेल व लोकांना पटेल व त्यांना आचरतां येईल, अशा स्वरूपांत साईबाबांनीं कसा विशद केला आहे याचा विचार करूं.**

धर्म म्हणून ज्याला आपण म्हणतों, ज्यांत आपण जन्मास आलों व ज्याचें आपण पठन करतों असें समजतों त्या धर्मांचा आपल्या जीवनांत कशासाठीं कधींच उपयोग करूं नये या संबंधीं एकनाथाच्या विचारांचा प्रथम विस्तार करूं.

**धर्मांचा सहकार चांगल्यासाठीं**

कोणताही हीन हेतु मनांत धरून धर्माचरण करूं नये. एकाद्याला हाणून पाडण्यासाठीं, त्याचा घात करण्यासाठीं, वा एकाद्या कार्यांचा विनाश करण्यासाठीं दैवताला प्रसन्न करून स्वठायीं एकादें सामर्थ्य उत्पन्न करणें व त्याचा हलक्या हेतूनें वा वाईट कामासाठीं उपयोग करणें भागवत धर्मांत बसत नाहीं. धर्मांचें सहाय्य घेऊन वाईटाची तरफदारी करूं नये. ज्या धर्माचरणानें लोकहित वा व्यक्तिहित साधणार नाहीं असा धर्म त्याज्य समजावा. धर्म हा कांहीं धंदा नाहीं कीं व्यापार नाहीं. यामुळें पोट भरण्यासाठीं त्याचा उपयोग कधींही करूं नये. नाथांचें हें सांगणें आजच्या काळीं तर विशेष कसोशीनें पाळणें जरूर आहे. शुद्ध हिंदुधर्माचें व त्यातील सत्य तत्त्वांचें विडंबन व विकृत स्वरूप आज जिकडे तिकडे आपण पहात आहोंत. त्याचें कारण उपजीविकेचें साधन म्हणून धर्मांचा जो उपयोग केला जातो तें आहे. धर्मपेशांही

माणसाला पैसा आज अधिक प्रिय झाला आहे. ज्या योगें पैसा मिळेल व स्वार्थ साधेल अशा तऱ्हेच्या रूढींचें व शास्त्राचें लोकांकडून पालन व्हावें असा प्रचार व्यवस्थित रीतीनें गेलीं अनेक शतकें चालू आहे. शिकलेसवरलेले पंडितही आपल्या फायद्यापुरता धर्माचरणाचा मार्ग लोकांपुढें ठेवीत असतात. याचा घातुक परिणाम हा होतो कीं, जनता खरा धर्म व सत्यतत्त्व याबद्दल अंधारात राहते. स्वार्थासाठीं केलेलें धर्माचरण व चार पैसे मिळावेत म्हणून भिकाऱ्यांनीं देवभक्तीचा केलेला देखावा दोन्हीं सारखीच. श्रीमंत देवळांत देवाचें होणारे कौतुक व एखाद्या निर्धन देवळाची झालेली अनास्था हें दोन्ही पाहिल्यास धर्माबद्दल आमची खरी भावना काय हें कळून येईल. एका देवळांत पैसा मंत्रघोष करतो तर दुसऱ्या देवळांत त्याच्या अभावामुळें धुळीचा अभिषेक होतो. एवढे असूनहि देव सर्वत्र आहे असें आम्ही तोंडानें म्हणतच असतो ही आमची आमच्या धर्माबद्दल दृष्टि, अशी दृष्टी भागवत धर्माला वावडी आहे. उठल्या सुटल्या धर्माला नावें ठेवणारेहि वेळ आली तर आपल्या फायद्यापुरता धर्माचा आधार घेतात.

## स्वार्थासाठीं धर्माचरण नको

एका कम्युनिष्टानें आपला मुद्दा किती बिनतोड आहे हें श्रोत्यांना पटावें म्हणून गीतेंतला एक श्लोक सादर केलेला आम्ही ऐकला आहे. धर्म हें थोतांड, अफू आहे, ढोंग आहे असें म्हणणारे लोक जेव्हां गीतेला प्रेमानें हृदयाशीं धरतात तेव्हां ती गोष्ट शिवाजीला प्रेमानें मिठी मारणाऱ्या अफजुलखानाच्या मिठीइतकीच किंबहुना त्याहून जास्त घातुक असते. अशा गोष्टीमुळें धर्माचें शुद्ध स्वरूप विकृत होतें. कीर्तीच्या कच्छपी गेलेले कित्येक कवि अमुक धर्माचरणामुळें कीर्ति मिळेल, मान मिळेल, लोक आपला आदर करतील हें हेरून तशा तऱ्हेचें धर्माचरण करीत असतात. आपल्या स्वार्थाला पोषक असें अर्थ धर्मांतून काढून त्याप्रमाणें विपरीत धर्माचरण केल्यानें अध्यात्म दृष्ट्या काडीचाहि फायदा तर होत नाहींच; उलट समाजाला फसविल्याचें व उन विरोधी कार्य केल्यामुळें अंतीं कल्याणच होत असते. कशा प्रकारें आपल्या धर्मांत चाललेला ढोंगीपणा, दांभिकपणा, स्वार्थीपणा व दुसऱ्यांना हीन ठरवून त्याच्यावर आपला वरचष्मा ठेवण्याची वृत्ति पाहून आपल्यांतील अनेकांनीं अन्य धर्मांत प्रवेश केला आहे. आमच्यांतील हजारों अस्पृश्य (नाथाच्या भागवत धर्मांत या शब्दाला स्थान नाहीं मग आचाराला कोठून ?) अन्य धर्मांत प्रवेश करतात हें हिंदुधर्मीयांना लाछनास्पद तर आहेच, पण आपल्या विकृत धर्माचें द्योतक आहे. सासुच्या छळाला कंटाळून सुनेनें घर सोडण्यासारखेंच हें आहे. म्हणून विकृत व विपरीत धर्माचरण न करता शुद्ध धर्म आचरावा हें नाथांनीं सांगितले आहे. नाथाच्या या सांगण्याकडे आम्ही गेलीं कांहीं शतकें दुर्लक्ष करीत आलों याचा परिणाम परधर्मप्रवेश, नास्तिकता व धर्माबद्दल अनादर आमच्यांत बळावले. धर्म शुद्ध पाहिजे असें नाथ सांगतात.

शुद्ध धर्म म्हणजे कोणता धर्म? आजच्या आपल्या धर्मात शुद्ध भाग कोणता व अशुद्ध कोणता? आजच्या धार्मिक गोंधळांत, मतांच्या गलबल्यांत व बुद्धिभेद करणाऱ्या हवेंत हें समजावें तरी कसें असें सहाजिकच कोणीहि विचारील. या प्रश्नांचें उत्तर म्हणजे एकनाथी भागवत. शुद्ध धर्म म्हणजे कोणता धर्म व त्यावेळच्या कालास योग्य होईल असा तो कसा आचरणांत आणावा याचें मार्गदर्शन करण्यासाठीं एकनाथांनीं एकनाथी भागवत लिहिलें.

## धर्माचा उद्देश

ऋताची उपासना करणारा, ऋत जागविणारा तो शुद्ध धर्म होय. या विश्वाला उजळणारा प्रकाश, त्याला धारण करणारी शक्ति व तत्त्व जागविणें म्हणजे त्याचें कार्य करणें हा धर्माचा उद्देश आहे. ज्या धर्माच्या आचरणानें व्यक्ति व व्यक्तिबरोबरच समाजाची, राष्ट्राची व विश्वाची उन्नति होते, तो प्रगत होतो तो शुद्ध धर्म. धर्माचरणानें व्यक्तीची उन्नति तर झालीच पाहिजे; एवढेंच नव्हे तर ती व्यक्ति ज्या समाजांत, राष्ट्रांत वा विश्वांत आहे त्या समाजाची, राष्ट्राची व विश्वाचीही उन्नति झाली पाहिजे. एखादी व्यक्ती उच्च पातळीवर गेल्यानें समाज वा राष्ट्रही उंचावेल असें नाहीं. व्यक्तीच्या अभ्युदयासाठीं समाज व राष्ट्राची उपेक्षा होतां कामा नये. दुसरें असें कीं, व्यक्ति मिळून समाज होतो, समाज मिळून राष्ट्र होतें व राष्ट्रें मिळून मानवी विश्व होतें. यामुळें केवळ समाज व राष्ट्र यांची उन्नति व्यक्तीच्या उपेक्षेनें होणार नाहीं. समाजांतील अधिकाधिक व्यक्ति संस्कृतीनें, आचारविचारानें जसजसे उंचावत जातील तसतसा समाजही उंचावेल व पर्यायानें सर्व विश्व उंचावेल. तांदुळांतील प्रत्येक दाणा सकस स्वच्छ व विकृतरहित असला तर त्या तांदुळाची मोठी रासही त्याच दर्जाची असते. यामुळें व्यष्टी व समष्टी या दोघांची एकसमयावच्छेदेंकरून वाढ, कल्याण, प्रगति जो साधील तो शुद्ध धर्म होय. प्रगति हें एकाद्या राष्ट्राचें वा समाजाचें ध्येय असलें तरी तें साध्य होण्यासाठीं त्याला आपल्यांतील घटकांची वैयक्तिक प्रगति व कल्याण अशा प्रकारचें घडवून आणलें पाहिजे कीं, जेणेकरून व्यक्ति, समाज व राष्ट्र सर्वांचेंही हित साधेल. व्यक्तीची उपेक्षा केल्यास राष्ट्राची वा समाजाची खरी व टिकाऊ प्रगति साध्य होणार नाहीं. एकाद्या अवाढव्य यंत्रांतील यंत्रणा जें कांहीं कार्य करीत असते तें केवळ त्यांतील भव्य चक्रामुळें वा अन्य भागांमुळें नसून त्या चक्रांना व्यवस्थित कार्य करतां यावें म्हणून त्यांच्याशीं निगडीत असलेले नटस् व बोल्टसही त्याला कारणीभूत असतात. सर्वसाधारण दृष्टीला विन मोलाचें व बिन महत्त्वाचें दिसणारे हे नटस् व बोल्टस् अव्यवस्थित असले वा आपली जागा सोडून गेले तर अविभव्य अशी यंत्रणा सुद्धां बंद पडेल. एकाद्या राष्ट्रांत पांच-दहा श्रेष्ठ पुरुष असल्यानें सर्व काम भागलें असें होणार नाहीं. अशा श्रेष्ठ पुरुषांनीं जरी कार्य केलें तरी तें पुढें सतत चालू राहण्यासाठीं राष्ट्रांतील वैयक्तिक दर्जाही श्रेष्ठ असावा लागतो. म्हणूनच प्रगति करूं इच्छिणारीं राष्ट्रें व्यक्तीच्या शिक्ष-

गाकडे कसोशीनें लक्ष पुरवीत असतात. जी गोष्ट समाज वा राष्ट्र यांना लागू आहे तीच धर्मालाही लागू आहे. भागवत धर्मानें ही गोष्ट ध्यानीं घेतली आहे. ऋताची उपासना, विश्वशांति, लोककल्याण व समाजहित ही भागवत धर्माची उद्दिष्टें असली तरी व्यक्तीच्या कल्याणाकडे त्यानें लक्ष दिलें आहे. केवळ पांचदहा साधुसंतांची समाजांत भर घालणें हें कांहीं धर्माचें ध्येय नव्हे. व्यक्तीचा आध्यात्मिक विचार करून त्याला विश्वशक्तीचा, ऋताचा अनुभव मिळवून देणें व तद्द्वारा समाजाचें व विश्वाचें कल्याण साधणें, त्यांचा अभ्युदय करणें हें धर्माचें कार्य आहे. व्यक्तीगत विकासाच्या कार्यामुळें आपोआप साधुसंत व श्रेष्ठ विभूति उत्पन्न होत राहतील. त्यासाठी धर्मानें मुद्दाम आटापीट करण्याचें कारण नाहीं, नव्हे तें धर्माचें कार्य नाहीं. व्यष्टी समष्टीची एकाच वेळीं प्रगति साधणारा जो धर्म तो शुद्ध धर्म होय. हा दृष्टिकोन भागवत धर्मानें ठेवला आहे. समष्टी धर्म हें भागवत धर्माचें साध्य आहे व व्यष्टी धर्म हें साधन आहे. ही साधनें उत्तम, व्यवस्थित व प्रगतिकारक करण्याकडे भागवत धर्मानें विशेष लक्ष दिलें आहे. समष्टीला पोषक अशी प्रगति ज्यायोगें व्यष्टीला करून घेतां येईल असा मार्ग भागवत धर्मानें आंखला आहे.

## नाथांची भक्तिभावाची कल्पना

व्यष्टी व समष्टी दोघांचाही विकास साधणें हा भागवत धर्माच्या ऋत उपासनेंतील महत्त्वाचा भाग आहे. यामुळें भक्तीला व्यक्तिविकासाचें साधन म्हणून नाथांनीं विशेष स्थान दिलें आहे. नाथांची भक्ति ही रूढ अर्थानें भक्ति म्हणून जें कांहीं आपण समजतो तशी नाहीं. देवाची पूजाअर्चा करणें, नामसंकीर्तन करणें, उपासतापास करणें म्हणजे भक्ति असें सर्वसाधारणपणें समजलें जातें. परंतु नाथांच्या भक्तींत यापेक्षां अधिक उन्नतर गोष्टी येतात. पूजाअर्चा केल्यानें वा चार सण पाळण्यानें नाथांची भक्ति पूर्ण होत नाहीं व केवळ त्याचा पुरस्कार नाथांनीं केला नाहीं. ज्या भक्तीच्या योगें व्यक्तिगत विकास होईल, चित्त शुद्ध होईल व भक्त सद्गुणी होईल अशा भक्तीचा नाथांनीं पुरस्कार केलेला आहे. भक्ति ही शक्ती आहे. ती सामर्थ्यशाली आहे. ती सर्वत्र आहे. तिची वाढ करून तिच्या सामर्थ्याच्या साह्यानें अंतर्गत विकास व्यक्तीनें साधला पाहिजे. भक्ति ही भक्तीनें वाढते. तिचा वापर जसजसा करावा तसतशी ती अधिक वाढीस लागते. भक्ति ही परमेश्वराची शक्ति आहे. भक्ति कशास म्हणावें याचें स्पष्टीकरण नाथांनीं केलें आहे—

> सहज माझी जे प्रकाशस्थिति : ते भक्ति बोलिजे
> संवित्ती बोलिजे वेदांती : शैवी शक्ति बोलिजे
> बौद्ध जिनेश नेमिनाथ : जोगी म्हणती आदिनाथ
> भैरव खंडेराव गाणपत्य : अव्यक्त म्हणती एकेपे

ऐशी जें का प्रकाशस्थिति : त्या नांव बोलिजे भक्ति
तेणें प्रकाशें त्रिजगतीं : उत्पत्ति स्थिति लय भासे

( एकनाथाचा भागवत धर्म पान २९६ )

अशा प्रकारें परमेश्वराची जी सहज प्रकाश स्थिति ती भक्ती असें नाथांनी भक्तीचें एक लक्षण दिलें आहे. परमेश्वरापासून सहज निर्माण झालेला हा प्रकाश सर्वत्र आहे तो सर्वत्र पाहणें, तशी दृष्टी होणें म्हणजे भक्ती निर्माण होणें. सर्व विश्वाकडे पाहण्याची ही जी विशिष्ट भावना ती भक्ती म्हणून एकनाथ सांगतात—

सर्वभूतीं भगवद्भावो : या नांव मुख्य भक्ती पहावो ॥

'जे जे भेटे भूत त्या मानी भगवंत' असा भक्तियोग ज्ञानेश्वरांनीही सांगितला आहे. भक्तिकडे पहाण्याची ही विशाल दृष्टी नाथांची होती. ती प्राप्त होण्याला, सर्वभूतीं परमेश्वर पहाण्यास चित्तशुद्धी होणें जरूर आहे व त्यासाठीं अहंकार व विकार यांना पायबंद घालणें अगत्याचें आहे.

### भक्तीनें काय साध्य होतें ?

भागवत धर्माप्रमाणें भक्ति करावयाची म्हणजे या सर्व गोष्टींकडे लक्ष देणें जरूर आहे. तशा तऱ्हेनें तें दिल्यास भक्ताची वैयक्तिक प्रगती तर होईलच, पण त्याच्या हातून शुद्ध व निःस्वार्थी समाजकल्याणही होईल. यामुळें भक्ति हें केवळ परमेश्वरप्राप्तीचें साधन आहे असें नव्हे तर भक्तिमुळें भक्ताच्या अंतरंगांत क्रांति होऊन तेथ सात्विकतेचें अधिराज्य होतें. सात्वीकतेमुळें धर्मप्रवृत्ती होऊन तिच्यामुळें भजन होतें. भजनामुळें ज्ञान प्रकाशतें. व ज्ञानामुळें सर्वभूतीं भगवद् भाव निर्माण होतो. हा भाव निर्माण झाला की संकुचितपणा नाहींसा होतो. मी तूं भेद मावळतो व विश्वचि माझें घर अशी वृत्ति होऊन सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणासाठीं तो कार्य करतो. सर्व आपले आहेत ही भावना निर्माण झाली की आपल्याप्रमाणें इतरांचेंही कल्याण करण्यासाठीं झटून त्यांना मदत व मार्गदर्शन तो करीत असतो. आपण व इतर निराळे असें त्याला भासत नाहीं. इतरांची सुखदुःखें तीं आपलींच सुखदुःखें असें त्याला वाटतें. दुसऱ्याला बसलेल्या फटक्याच्या वेदना याच्या शरीराला होतात. अंतःकरण लोण्यासारखें मऊ इतकें की दुसऱ्याच्या जरशा तापानें तें वितळून डोळ्यांवाटे बाहेर पडतें. तो व प्राणिजात यांच्यामध्यें भक्तीनें निर्माण केलेल्या ईश्वरी प्रेमाच्या सूक्ष्म व संदेशवाही तारामुळें तो प्राणीमात्राशी एकरूप झालेला असतो. आपलेपणाचे पोटीं भेदाभेद नसतो तर तो परकेपणाच्या पोटीं असतो. अ ला ब जोपर्यंत परका आहे तोपर्यंत बकडे लक्ष देत नाहीं. त्याच्या कल्याणाची काळजी वाहत नाहीं. पण समजा ब हा अचा जावई झाला तर त्यांच्यात आपलेपणा उत्पन्न होईल व तोच ब त्याचे अला पुत्रवत वाटून त्याच्या कल्याणाची काळजी अ घेईल. त्याच्या सुखदुःखांस सहभागी होईल. त्याच्या अडीअडचणी दूर करण्यासाठीं हरएक प्रकारचे सहाय्य

देईल. सर्वभूतीं परमेश्वर भाव निर्माण झालेल्या भक्ताला सर्व विश्वचीच जांत्रयप्रमाणें पुत्रवत वाटून तो सर्वच्या हितासाठीं झटत असतो. अशा प्रकारचे भक्त निर्माण व्हावेत हा एकनाथी भागवत धर्माचा प्रयत्न आहे.

## निष्ठेचें सामर्थ्य

भक्तीला निष्ठेचें अधिष्ठ न पाहिजे. निष्ठेशिवाय भक्ति फळास येणार नाहीं कीं, तिचें सामर्थ्य वाढणार नाहीं. निष्ठा ही कार्यप्रवीण करणारी एक जबर शक्ति आहे. निष्ठेशिवाय कार्य न हीं कीं पराक्रम नाहीं. निष्ठा आंधळी असतां उपयोगी नाहीं. ती डोळस पाहिजे. भक्ति कशाप्रकारें करावी, कां करावी, तिच्यापासून फायदे कोणते, तिचें फलद्रूप काय याचें ज्ञान भक्तास पाहिजे. हें ज्ञान असतें तर निष्ठा अंतःकरणात मुरते, चित्तांत बाणते व ती आचाराच्या रूपानें प्रगट होते. जोंपर्यंत अंतर्गत निष्ठा उलटी फिरून आचाराच्या रूपानें व्यवहारांत प्रगट झाली नाहीं तोंपर्यंत खरी निष्ठा निर्माण झाली नाहीं व तिला ज्ञानाचें अधिष्ठान मिळालें नाहीं असें होईल. कोणा एकाद्या भक्ताची आपल्या देवतावर किंवा सद्गुरुवर कितपत निष्ठा आहे हें त्या भक्ताची निष्ठा आचारांत कोठें व कितपत प्रगट होते यावरून अजमावता येते.. खोलींतील दिव्याचा प्रकाश दार खिडक्यांवाटे बाहेर प्रकाशला नाहीं तर एकतर खोलींत प्रकाश नाहीं किंवा दारें खिडक्या बंद करून अगर अन्य मार्गांनें तो मुद्दाम लपवून ठेवला आहे असें होईल. अतःकरणांतील निष्ठेचा प्रकाश इंद्रियद्वारा कृतिरूपानें आचारांत प्रगट झाला नाहीं तर एकतर अंधार आहे किंवा इंद्रियें बंद करून तो प्रकाश मुद्दाम कोंडून ठेवला आहे असें समजावें. परंतु सर्वभूतीं भगवद्भाव असलेला भक्त असें करूं शकत नाहीं कारण ह्या भावाची प्रचिती बाह्यजगांत रोजच्या व्यवहारांत घ्यावयाची असते. हा भाव भक्ताच्या ठिकाणीं उत्पन्न झाला पाहिजे; एवढेंच नव्हे तर त्याचा बाह्यजगांत वापरहि झाला पाहिजे. तसें न झालें तर भागवत धर्माचें मूळ उपासना हें जें ध्येय त्याला बाध येईल. यामुळें निष्ठा वा भक्ति हिचा प्रकाश केवळ आपल्या जवळ न ठेवतां तिचा प्रकाश सर्व विश्वाला दिला पाहिजे. ही गोष्ट सहज झाली पाहिजे. कोणत्याही हेतूनें वा स्वार्थामुळें होता कामा नये. अंतर्गत भक्ति बाहेर पडून सर्व विश्वांत भरून राहिली पाहिजे. ज्या देवताची आपण भक्ति करतो तें देवत आपण उपासना करतो. त्या मूर्तींतच केवळ नसून तें सर्व प्राणिमात्रांत आहे असा भाव भक्ताच्या ठिकाणी झाला पाहिजे. सर्व प्राणिमात्रांत त्याला देव दिसला पाहिजे, तसा तो दिसला कीं भक्त देवाच्या सेवेप्रमाणें त्यांचीही सेवा करायला धावेल व ही गोष्ट हेतुविरहीत सहज घडून येईल. या कामीं भजनात्मक भक्तीचा विशेष उपयोग होतो, भजनात्मक भक्तानें व्यक्तीचा विकास होतो; हळूहळू अनेक दोषांचा परिहार होऊन चित्त शुद्ध होते. आचारशुद्ध होतो यामुळें हळूहळू त्याला सर्वत्र परमेश्वर आहे असें भासूं लागतें. म्हणून नाथांनीं भजनात्मक भक्तीवर त्याचप्रमाणें हरिकीर्तनावर विशेष भर दिला आहे. ज्ञान प्राप्त होण्यास भक्तीची

जरूरी आहे. भक्ति कर्मांचें ज्ञान हें फळ आहे या फलाच्या बीजांतून पुन्हां भक्तिवृक्ष निर्माण होतात व त्यांना पुन्हां ज्ञानफळे येतात. भक्तिमुळें ज्ञान होते व ज्ञानामुळें भक्ति वाढीस लागते, भक्तिविरहीत मिळविलेल्या ज्ञानामुळें पतन भय असतें.

## नाथांच्या भक्तीचें सर्वव्यापी स्वरूप

नाथाची भक्ति केवळ भजनात रंगत नाहीं कीं देवावर प्रेम करून संतुष्ट रहात नाहीं. तर ती भक्ताच्या बाहेर पडून सर्व विश्वाला गवसणी घालण्यास निघते. नाथांच्या भक्तीचें वर्तुळ इतकें विशाल आहे कीं, त्यांत सर्व विश्व प्राणिमात्र येतात. आपण देवाच्या प्रेमात दंग होणें व विश्वाकडे ढुंकूनहि न पहाणें हें नाथांच्या भक्तीला आवडत नाहीं. विश्वाच्या अणुरेणूंतहि तिला परमेश्वर दिसत असतो. त्यांत तिला ऋतदर्शन होत असते. व्यक्ति, समाज व विश्व यांत तिला भेद वाटत नाहीं. एकाच ऋताचे हे निरनिराळे आविष्कार आहेत असें ती समजतें. यामुळें व्यष्टीप्रमाणें समष्टीचें हित-कल्याण करण्यास ती धडपडत असते. ती समाजांत वावरते, राष्ट्रांत खेळते व विश्वांत संचारते. भक्ताला स्वतःचा स्व न राहिल्यामुळें समाज, राष्ट्र व विश्व हा त्याचा स्व बनलेला असतो. नाथांचा भक्त ईश्वरी प्रेमात डुलत राहणारा जगाच्या दृष्टीनें निष्क्रीय नसून समाज व राष्ट्रांत फिरून सतत कार्यरत राहणारा असतो. भागवत धर्मांतील भक्तिमुळें जे संत महंत निर्माण होतील ते केवळ स्वतःच्या उच्च पातळीवर स्थिरावून न राहतां समाजाच्या पातळीवर येऊन जग कल्याणासाठीं अखिल मानव जातीसाठीं स्वामी विवेकानंदाप्रमाणें विश्वभर संचार करणारे व अहोरात्र मानवाच्या कल्याणासाठीं झटून कार्य करणारे असतील. अखिल जगाचें कल्याण करणें ही ऋत उपासना व ती ज्या भक्तीनें होईल ती भागवत धर्मांतर्गत भक्ती असे नाथांचें सांगणें आहे. यास्तव त्यांनीं भक्तीला निष्कामकर्मयोगाचें अधिष्ठान दिलें आहे. निष्कामकर्म-योग हीच भक्ती व हीच खरी देव पुजा. निष्कामकर्मयोगानें देवाची जरी साधीसुधी पुजा बांधली तर ती समाजाचें कल्याण साधूं शकते. निष्कामकर्मयोगानें केलेल्या स्वकर्तव्याला नाथांनी फार महत्वाचे स्थान दिलें आहे. भक्तानें स्वकर्तव्य टाळलेलें नाथांना आवडत नाहीं. देवाच्या नांवानें स्वकर्तव्याला मुरड घालणें म्हणजे देव न ओळखणें. ज्यानें देव ओळखला त्याला देव स्वकर्तव्यातही दिसतो. म्हणून स्वकर्तव्यें अनासक्तियोगानें करण्यावर, निष्कामकर्मयोगावर नाथांनीं विशेष भर दिला आहे. अध्यात्माप्रमाणें थोर समाजहीतही आहे. भक्तीनें परिपूर्ण झालेली विशाल व उदार दृष्टीची व्यक्ती निष्कामकर्मयोगानें जेव्हा कार्य करूं लागते तेव्हांच राष्ट्राचें वा विश्वाचें खरें कल्याण होत असतें. अशी व्यक्ती स्थितप्रज्ञ असूनही समाजांत वावरत असतें. तिचें कार्य पुर्ण निःस्वार्थी असतें, कारण देवाची सेवा ऋताची उपासना ती निष्काम-कर्मयोगानें करीत असतो.

## खरी भक्ति कोणती ?

निष्कामकर्मयोगाचें आचरण ही खरी भक्ति, तीं श्रेष्ठ देवपूजा असें नाथ

मानतात. निष्कामकर्मयोगाला नाथांनीं भक्तिमध्यें फार महत्त्वाचें स्थान दिलें आहे याला आणखीही कारणें आहेत. भागवत धर्मांच्या भक्तिचा उद्देश व्यक्तिविकासाबरोबर समाजविकासही साधणें हा असल्यामुळें या उद्देशाला अडथळा करणारे जें जें कांहीं त्याला काटशह देण्यासाठीं निष्कामकर्मयोगाचा उपयोग होत असतो. म्हणून नाथांना या योगाचें फार महत्त्व वाटलें. प्रपंच व परमार्थ यांची जशी सांगड भागवत धर्मानें घातली आहे तशीच सांगड निष्कामकर्मयोगावर अधिष्ठीत असलेल्या भक्तिमुळें व्यक्ति व समाज यांची घातली आहे कार्याचा नाश करणारे व जगांत वाईटाची निर्मिती करणारे अहंकार व विकार यांचा नायनाट करण्यास निष्कामकर्मयोग उपयोगी होतो. फलाची इच्छा धरून कार्य करणाऱ्याला कार्यापेक्षां मिळणाऱ्या फलाचें अधिक महत्त्व असतें. व अधिकाधीक कार्यापेक्षां कमींत कमी कार्यांत अधिकाधिक फळ कसें पदरांत पडेल याचीच खटपट तो अधिक करीत असतो. यामुळें दुर्गुण वाढीस लागतात. खोटेपणा, लबाडी, लाचलुचपत, खोटे मुखवटे, यांचा सुळसुळाट होतो. निष्काम कर्मयोगानें केलेल्या कार्यांत मग ते सामाजिक असो, राष्ट्रीय असो कीं धार्मिक असो वरील प्रकारच्या कोणत्याही गोष्टीस थारा मिळत नसल्यामुळें होणारें कार्य खऱ्या अर्थानें कल्याणदायी होते. अशा निष्कामयोगाला धर्मांइतकेंच समाज व राष्ट्रकार्यांत स्थान आहे व तें जेथें असतें तेथेंच केलेल्या योजना खऱ्या अर्थाने पार पडतात. अशा प्रकारें व्यक्तीबरोबर समाज राष्ट्रकल्याण साधणारा हा योग असल्यामुळें व ही गोष्ट भागवत धर्माच्या भक्त उपासनेशीं सुसंगत असल्यामुळें नाथांनीं आपली भक्ती त्यावर अधिष्ठीत केलेली आहे. स्वकर्तव्यें ही प्राप्त परिस्थितीचा ईश्वरी योजनेचा एक भाग असें समजून निष्ठेनें तीं करीत राहिल्यास त्याचा व्यक्तीच्या मनावर चांगला परिणाम होतो. त्यानें निश्चय पक्का होऊन आत्मश्रद्धा वाढते व त्यामुळें आत्मविकास होतो.

## कर्मांचा खेळ

प्रत्येक कृतीला चांगलें वा वाईट फल हें असतेच. केलेली कृति फलाच्या रुपानें साकार होऊन तें फल कृतीच्या रुपानें कर्त्यांकडे परत येतें. शिवाय आपण जी कृति करतो तिचें दुसऱ्यावर परिणाम होतात व दुसऱ्याच्या कृतीचें परिणाम आपल्यावर होतात. अशा प्रकारे हा कर्मांचा खेळ अव्याहत चालू असतो. देवाण घेवाण कर्मांमुळें फल व फलामुळें कर्म असे दुवे असलेला हा साखळीचा गुंतागुंतीचा खेळ आहे. कर्मनियतीचा हा खेळ व त्याचें परिणाम लक्षांत घेतल्यास निष्काम कर्मयोगाचें महत्त्व अधिक वाढते. कर्मांचा हा 'बुमरंग' खेळ फारच गुंतागुंतीचा आहे. कर्मांचा खेळ समजणें मानवी बुद्धिच्या पलीकडे असले तरी अस्पष्ट कां होईना पण थोडी फार कल्पना येण्यासाठीं एका उदाहरणानें तो स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. त्यांत निदान एवढा तरी फायदा होईल कीं आपण चांगली कृति कां करावी व त्यासाठीं कशाचा आधार घ्यावा हें समजून येईल. आपण असें समजू कीं एकमेकांशीं व्यवहार

करणाऱ्या अवकड या चार व्यक्ति आहेत. अशें एखादी कृति केली तर तिचें फल
अला मिळेल पण त्याबरोबर अश्या कृतीचा परिणाम बकडवर होऊन उलट त्यांच्या-
कडून प्रतिकृति होईल व तिचे फल बकडना मिळेल. एवढेंच नव्हे तर एकमेकांच्या
अचाअस उत्तर म्हणून अवकडवरून पुन्हा कृति होईल. मध्या कृतिचा परिणाम अकड-
वर, कचा परिणाम अवडवर डचा परिणाम अवक वर पुन्हा त्यांची क्रिया, प्रतिक्रिया
फले, प्रतिफले यांची त्याचप्रमाणांत वाढ होईल व कर्मफलाचें एक जाळें
विणलें जाईल. लक्षावधी लोकच्या संबंधामुळें हें जाळें किती मोठें गुंतागुंतीचें
होईल याची आपण केवळ कल्पना व तीही अस्पष्ट करूं शकतो.
पुन्हा यांत आले गेले यांची कर्मफलें अधिक वजा होतील ती निराळी आकडे
संपतील पण कर्मफलांचा घातांकांत चालणारा गुणाकार व त्यामुळें उत्पन्न होणारी
असंख्य सुखदुःखें जोपर्यंत या गुणाकाराला निष्काम कर्मयोगाला येणाऱ्या पण शून्य
किंमत असणाऱ्या फलकानें गुणलें जाणार नाहीं तोंपर्यंत संपणार नाहींत. कारण शून्यानें
गुणलें गेल्यावरच गुणाकार शून्य येऊन निष्काम कर्म करणाऱ्यापुरतीं त्याची सर्व फलें
शून्यांत विलीन होतील. अबकडचीं कृत्यें चांगलीं असलीं तर चांगलीं फलें व प्रतिफलें
मिळतील नाहींतर उलट होईल बोध हा की आपण चांगली कृति केली तर चांगली
फळें मिळतीलच पण त्याचबरोबर चांगल्याचा फैलाव समाजांत व राष्ट्रांत होईल.
कर्मांच्या खेळाच्या जोडीला विचारांच्या तरंगाचा खेळ चालू असतो. मनाच्या महा-
सागरांत निर्माण होणाऱ्या लाटा इतरांच्या मानसिक लाटांवर आदळत असतात व
त्यांच्यांत वाद प्रतिवाद वा प्रतिकार चालू असतो. एकमेकांच्या विचारांच्या लाटा
एकमेकांवर परिणाम करीत असतात. शिवाय "मनांतील गुप्त शक्ति स्वतःशीं सदृश असे
तरंग बाहेरून गोळा करतात व अधिक शक्तिमान होऊन प्रगट होतात." (विवेकानंद)
या सर्व अस्पष्ट विवेचनावरून आपण निदान एवढी गोष्ट समजूं शकतों कीं समाज
व राष्ट्रहितासाठीं आपण आपलें कर्म व मनांतील विचार प्रवाह शुद्ध ठेवले पाहिजेत.
अनासक्तीयोगा खेरीज शुद्ध आचार व विचार असणें कठीण असल्यामुळें शुद्धाचर-
णाच्या दृष्टीनें, व्यक्ति समाज यांच्या कल्याणाच्या दृष्टीनें निष्काम कर्मयोगाचें स्थान
महत्वाचें व अग्रत्याचें असल्यामुळें नाथांनीं भक्तिला निष्कामकर्म योगावर अधिष्ठित
केलें आहे. निष्कामकर्म योगाविरहित भक्तीनें केलेली उपासना ही खरी भक्त उपासना
नव्हे की देवपूजा नव्हे.

## परमार्थाइतकेंच प्रपंचाला महत्व

निष्कामकर्म योगाचा एवढा मोठेपणा मान्य केल्यावर साहजिकच व्यवहार व
प्रपंच याला महत्व येतें. निष्काम कर्म योगाखेरीज भागवत धर्मांतील भक्ति पूर्णत्वास
पोहोंचू शकत नाहीं. व निष्काम कर्म योगाचें आचरण प्रपंच केल्यानेंच होऊं शकतें.
सोडल्यानें नव्हे म्हणून परमार्थाइतकेंच प्रपंचाला नाथांनीं महत्व दिलें आहे. नाथांनीं
कर्मांपासून निवृत्तिचा नव्हे तर निवृत्त कर्मांचा उपदेश केला आहे. आत्मज्ञान करून

मोक्षासाठी प्रपंच सोडून देण्याची जरूरी नाही. प्रपंच व परमार्थ यांचा एकमेकांचे पूरक म्हणून उपयोग करून घेतां येतो. व तसा तो भागवतधर्मीय भक्तानें करून घ्यावा असें नाथ सांगतात. कर्मबंधनातून मुक्त होण्यास कर्म त्याग हा उपाय नाहीं. कारण कर्में जन्मतात असल्यामुळें तें सर्वस्वी सोडतां येत नाहीं. कर्म बंधनातून मुक्त होण्याचा सुलभ उपाय म्हणजे निष्काम कर्म योग, कर्मानेच कर्म बंधन तोडले पाहिजे. भक्ताने प्रपंच खुशाल करावा पण निष्काम कर्म योगाचें आचरण ठेववें. प्रत्येक कार्याच्या मागे हरिनामाचें पार्श्वसंगीत असावें. मी ईश्वराचें कार्य करतो आहे ही भावना असावी. कर्म सोडल्यानें कुटुंबाचें हाल झाले तर तो धर्म न होता अधर्म होईल कारण ऋत विरुद्ध ही गोष्ट आहे. परमार्थ व प्रपंच नाथांनीं भिन्न मानले नाहींत तर जनता जनार्दनाप्रमाणें ते एक रूप मानले आहेत. काळोखामुळें चंद्राला जशी शोभा येते तशी प्रपंचामुळें परमार्थाला येते व चंद्रामुळें या दोहोंमुळें जशी आकाशाला शोभा येते तशी प्रपंच युक्त परमार्थामुळें अध्यात्माला शोभा येते. आत्मोद्धार व विश्वोद्धार यासाठीं कर्माची आवश्यकता आहे ही गोष्ट श्रीकृष्णानें उद्धवास केलेल्या उपदेशांत स्पष्ट आहे. "तुला मी ज्ञान दिले. त्या ज्ञानानें तूं लोकांचा उद्धार केला पाहिजेस कारण स्वताचा उद्धार करून घेऊन इतरांचा उद्धार करण्यांतच ज्ञानाचें सार्थक आहे."

## देवाचें खरें भजन

ऋत हें सर्वत्र आहे. हें विश्व ऋताची आभि वृद्धी आहे. ऋत चिच्छक्ती परमेश्वर आणि मायेच्या रूपानें या विश्वात वावरत आहे. मानव हें त्यानें श्रेष्ठ प्रतीचें रूप आहे. या रूपानें जगकल्याणाचें कार्यक्रम करीत असतें. भागवत भक्ताला जनीजनार्दन दिसला पाहिजे. प्रपंच परमार्थाप्रमाणें जन व जनार्दन हें एकरूप आहेत. यापैकीं कोणीहि एकटा असूं शकत नाहीं. देवाची वस्ती देवळांत नाही कीं स्वर्गांत नाहीं, प्राण्यांच्या हृदयांत आहे. हृदय मंदिरे ही खरी देव मंदिरे आहेत. त्यांतल्या देवाची भक्ती ही खरी देवभक्ति, यामुळें मानवाची सेवा ही उत्कृष्ट देवपूजा आहे, भक्ति आहे दिन दुबळ्यांच्या, आडल्यानाडल्यांच्या, अपंगाच्या सेवेचे पारडे दुसऱ्या पारड्यांत कितीहि दानधर्म, व्रत उपवास, पूजादी भक्ति टाकली तरी वर जाणार नाहीं. सेवेचें सामर्थ्यंच असें आहे कीं त्यामुळें ब्रह्मांडाच्या राजालाहि हूं चूं न करता विटेवर तिष्ठत उभे रहावें लागतें. देवळांतल्या देवाच्या केलेल्या सेवेपेक्षां मानवाची केलेली सेवा देवाला अधिक प्रिय आहे. गोरगरिबांसाठी कष्ट करतो, दिनदुबळ्यासाठीं राबतो, आडल्यानाडल्यासाठीं श्रम करतो तो देवाला अधिक आवडतो, कारण जनीजनार्दन तो पहात असतो. ज्याला जनीं जनार्दन ओळखूं आला त्याला स्थिर देवापेक्षां चालते बोलते देव अधिक जवळचे वाटतात. जनीजनार्दन दिसला कीं दया क्षमा शांति परोपकार हे आलेच. नारायणाची वस्ती समाजांत आहे, तो समाजांत वावरत असतो. समाजांत मिसळून हसतो खेळतो त्यांच्या हालअपेष्टांशीं समरस होतो. म्हणून नराचें

कल्याण करणें हें नारायणाचें खरें भजन आहे. निष्काम कर्मयोगानें स्वरूपें करून समाज, राष्ट्र, व विश्वकल्याण साधणाऱ्या भागवत धर्माचा उपदेश नाथांनीं केला आहे. नारायण नर झाला आहे व या नराची सेवा करून नरानें नारायणरूप धारण केलें पाहिजे.

## आजच्या युगाचें दैवत

नर-नारायण हें आजच्या युगाचें दैवत आहे. म्हणून नाथांनीं आपल्या भागवत धर्मांत समाज कल्याण, लोककल्याण, दीनदुबळयांची सेवा याला वरचें स्थान दिलें आहे. नर व नारायण हें सेवेच्या प्रेमधाग्यानें एकत्र आले कीं नर नारायण होतो. नर नारायणाच्या एकीमुळें साडीमाडी राहत नाहीं। मग तूं अवघा रायची होसी। मी-तूं, गरीब-श्रीमंत, श्रेष्ठ-कनिष्ठ वगैरे भेद नरनारायणाला मान्य नाहींत. समता हा नारायण धर्म आहे. यामुळें भागवत धर्मानें समतेला मानलें आहे. नारायण हा व्यक्ति व समाज या दोघांच्या अभिवृद्धिसाठीं आहे. ऋत हें स्वतः नारायणच असल्यामुळें ऋताची उपासना करणारा व्यष्टी व समष्टीचा एकाच वेळीं अभ्युदय साधूं शकेल अशा प्रकारची आंखणी भागवत धर्मानें केली आहे. त्याचा विस्तार तत्कालीन समाजाला समजेल अशा रीतीनें एकनाथानीं आपल्या एकनाथी भागवतांत केला आहे. भागवत धर्माची मुख्य तत्वें ज्यांत ग्रथीत केली आहेत असें ढोर नांवाचें भारूड एकनाथांनीं लिहिलें आहे. ते देऊन हा लेख पुरा करूं.

### ढोर

" ये खपें आलें धरा गाये राया हो : आले धरात तरी ढवळा धराः
ढवळा धराल तरी मासा धराल तरी बांदी धराः
बांदी धराल तरी जाते धराः जाते धराया कारणें मेंढा धराः
मेंढा धरायाकारणें बेटकुळी धारः ही अवघीं धराया कारणेंः
अवश्य धरावे म्हणः धराल तरी जीवे भावें धराः
तेणेंचि म्हणें अर्धोदय कराः अगा सज्जन जनहो ॥

१ आल म्हणजे मनुष्यदेही आयुष्य आलें तें.
२ ढवळा म्हणजे जो निजधर्म चोखट-भागवतीं वा स्थापिलाः
३ मासा म्हणजे मनो मासा
४ बांदी म्हणजे इच्छा बांदी
५ जाते म्हणजे जे आयुष्य जातें तें

६ मेंढा म्हणजे काळ

७ बेटकुळी म्हणजे शेजेची बेटकुळी अर्थात स्त्री

८ ग्रहण म्हणजे गुरु ग्रहण

याचा थोडक्यांत अर्थ असा की मनुष्य देहाचें सार्थक करावयाचें असेल तर भागवत धर्माचें आचारण करा. त्या साठीं मन, इच्छा आणि विषयवासना नियंत्रांत ठेवा. मनुष्यदेह नश्वर आहे हें ध्यानीं ठेवून काळाची झडप येण्यापुर्वी गुरुस शरण जाऊन जीवीतसाफल्याचे धनी व्हा. 'आलें' धरावयाचें कसें! विवेक वैराग्य हातीं घेऊन आणि सर्वांभूतीं भद्दवद्भाव बाळगुन, पण आल्याबरोबर ढवळाही धरला पाहिजे. हा ढवळा कोण!

निजधर्म जो सोज्वल । त्यासीच बोलिजे शुद्ध ढवळा ॥
जो भागवतीं वाखाणिला । स्वयें रक्षिला परिक्षितीनें ॥

म्हणजे नीच हेतूनें, विपरीत अर्थानें, लौकीक वाढविण्यासाठीं आणि धनार्जन करण्याकरितां धर्माची कास धरूं नये. कायावाचामने करून शुद्ध धर्माचें आचरण करावे. जनीं जनार्दन पहाणें हें या धर्माचें सार आहे. (एकनाथाचा भागवत धर्म—पान २६८)




ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २.

टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण.

होलसेल व रीटेलर्स

# सर्वांभूतीं बंधुभाव

मनुष्यांमनुष्यांमध्यें व राष्ट्रांराष्ट्रांमध्यें दररोज जे व्यवहार घडत असतात त्यांचें सूक्ष्म रीतीनें निरीक्षण केलें असतां आपल्याला एक गोष्ट निरुपायानें व दुःखानें कबूल करणें भाग पडते. ती गोष्ट ही कीं, ह्या व्यवहारांपैकीं बहुधा स्वार्थपरायणता भरलेली असते. मनुष्याचे व्यवहार बहुतकरून धन, मान व सुख ह्यांपैकीं कोणत्यातरी एकाच्या किंवा अनेकांच्या प्राप्तीसाठीं होत असतात. त्याचप्रमाणें राष्ट्रांच्या व्यवहाराच्या बुडाशींही ह्याच गोष्टी विस्तृत प्रमाणावर प्राप्त करून घेण्याची हांव असलेली दृष्टीस पडते. आपण स्वार्थ साधीत असतां दुसऱ्याच्या नुकसानीला कारण होतों हें व्यक्तीला समजत नाहीं असें नाहीं; परंतु स्वार्थाचें महत्त्व विशेष वाटत असल्यामुळें तिकडे दुर्लक्ष करून व्यक्ति आपलें कार्य करून घेत असते. एक राष्ट्र आपलें सुख, दर्जा, वैभव इत्यादि वाढावी म्हणून जेव्हां दुसऱ्याशीं कलह करण्यास सिद्ध होतें तेव्हां आपण आपल्या कृतीनें पुष्कळांच्या जीविताच्या नाशाला कारणीभूत होऊं, हें त्यांतील पुरुषांना पूर्णपणें अवगत असतें; आपल्या कृतीनें हजारों स्त्रियांना वैधव्य प्राप्त होईल, लाखों मुलं पोरकीं होतील, हजारों कुटुंबें धुळीस मिळतील, देशाच्या संपत्तीचा, उद्योगधंद्यांचा ऱ्हास होईल हें ते पूर्णपणें जाणत असतात; परंतु स्वदेशहित, देशाभिमान इत्यादिकांविषयींच्या भलत्यासलत्याच कल्पना करून घेतलेल्या असल्यामुळें त्यांना आपल्या हितापलीकडे इतर सर्व कांहीं तुच्छ आहे, असें वाटून ते अन्यायानें व अमानुषपणें वर्तन करण्याला बेलाशक तयार होतात. आजपर्यंत ह्या जगामध्यें अनेक धर्म होऊन गेले व अद्यापि प्रचलित आहेत. सर्व धर्मसंस्थापकांनीं व अनेक साधुसंतांनीं आपल्या उच्चारानें व आचारानें लोकांच्या नजरेस हेंच आणण्याचा प्रयत्न केला आहे कीं, मनुष्याचें खरें हित स्वार्थसाधनांत नसून परार्थ साधण्यांत आहे. अशा प्रकारचा उपदेश आज हजारों वर्षें होत असूनहि मनुष्यें अद्यापि आपआपसांत लढत आहेत, एकमेकांवर क्रूर व्याघ्रसिंहाप्रमाणें घाले घालीत आहेत; हें पाहिलें म्हणजे सर्व साधुसंतांचा शांततेचा उपदेश व्यर्थ गेला, धर्मांच्या शिक्षणाचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं, सर्व उपड्या घागरीवर पाणी पडावें अशांतला प्रकार झाला असें वाटून मनाला उद्विग्नता व निराशा प्राप्त होते. कलह म्हटला म्हणजे तो किती जरी उत्तम हेतूनें प्रेरित होऊन करण्यांत येत असला तरी वाईटच. कारण, त्यामुळें उन्नतीपेक्षां अवनतिच अधिक होत असते; हे जरी खरें आहे तरी वाईटांतून केव्हां केव्हां चांगलें बाहेर येतें असें जें म्हणतात, त्याप्रमाणें कलहामुळेंसुद्धां केव्हां केव्हां दैवी गुणांचा विकास होत असतो. प्रचलित युद्ध

अत्यंत भयंकर आहे; त्यामुळें जगाचें जितकें नुकसान होत आहे तितकें दुसऱ्या कोणत्याही युद्धामुळें झालेलें नाहीं, परंतु ह्या प्रचंड कलहामुळें मनुष्याच्या बंधुत्वाच्या कल्पनेची वाढ होण्याला मदत केली आहे. आज आम्हांला आमचे बादशाही व युनिअन जॅक निशाण हीं एकीची खूण होऊन बसलीं आहेत. ही जी आमच्या साम्राज्यावर आकस्मिक आपत्ति आली आहे तीमुळें आम्ही आपले बारीकसारीक भेदभाव विसरून, देशाचें, साम्राज्याचें हित तेंच आमचे व्यक्तिशः हित असें मानूं लागलों आहों, व साम्राज्यासाठीं वाटेल तो स्वार्थत्याग करण्याला उद्युक्त झालों आहों. विश्वबंधुत्वाची कल्पना येणें ही अत्यंत साहाय्यभूत व पोषक गोष्ट आहे परंतु बंधुत्वाच्या कल्पनेचा प्रादुर्भाव झाला तरी ती कायमची टिकण्याला तिचा पाया आकस्मिक रीतीनें येणाऱ्या आपत्तीपेक्षां भक्कम व शाश्वत असा पाहिजे. नाहीं तर ग्रीष्मऋतूवर पाऊस पडण्याचें थांबल्याबरोबर डोंगरावरून वहाणारे ओहोळ ज्याप्रमाणें नाहींसे होतात, त्याप्रमाणें आकस्मिक कारण नाहींसें होताच कार्यहि नष्ट होईल. बंधुत्वाची कल्पना कायमची मनांत बाणण्याला ईश्वराविषयींची आमची कल्पना शुद्ध असली पाहिजे. जातिभेदांचा कर्ता, सूड उगवणारा, जो लांच देईल त्याचें कार्य करणारा असा जर आमचा ईश्वर असेल, तर तो बंधुत्वाच्या कल्पनेच्या वाढीला सहाय्यभूत कसा होणार? तो जर मूर्तीमध्यें, दगडाधोंड्यामध्यें, अमूक एका क्षेत्रामध्यें रहाणारा, भूत, समंध इत्यादिकांच्या दर्जाचाच देव असेल, तर त्याचें ह्या कार्याला सहाय्य कसें होईल? देव तसा भक्त ह्या म्हणीप्रमाणें अशा देवांना भजणारी मनुष्येंहि गुणांनीं त्याच्याचप्रमाणें होतील. ह्यासाठीं परमेश्वर एक आहे व तो ज्ञानमय, दयाळू, पवित्र असा असून मनुष्याचें हित चिंतणारा व करणारा आहे, अशी जेव्हां आमची त्याच्याविषयीं खात्री होईल, तेव्हांच सर्व मनुष्यें त्याचींच मुलें आहेत, व म्हणून आम्ही सर्व भावंडें आहोंत, अशाविषयीं आमची खात्री पटेल व बंधुत्वाच्या कल्पनेला स्थायिकत्व प्राप्त होईल. नाहीं तर ही कल्पना म्हणजे अळवावरचें पाणी होऊन बसेल. देवाविषयीं शुद्ध कल्पना झाली म्हणजे दुसरी गोष्ट धर्माविषयीं शुद्ध कल्पना ही होय. कारण, धर्म म्हणजे देवाविषयींच्या आमच्या कल्पनेला व्यवहारामध्यें आणून त्याप्रमाणे वागणें. धर्मासाठीं पुष्कळ लोक नाना प्रकारचे स्वार्थत्याग करण्यास तयार असतात. काशीपासून रामेश्वरापर्यंत नमस्कार घालीत जाणें, एका पायावर वर्षांच्या वर्षें उभें रहाणें, एक हात वर करून उभें रहाणें, पोलादी कांट्यांवर निजणें अगर बसणें इत्यादि शेकडों प्रकारें धर्मासाठीं शरीराला क्लेश देण्याचें कार्य पुष्कळांकडून चालू असतें. परंतु धर्मासंबंधाची शुद्ध कल्पना झालेली नसल्यामुळें अशा माणसांकडून मानवसेवेसारखें पवित्र कार्य कधींहि होत नाहीं. आजाऱ्याची शुश्रूषा करणें, दुःखिताचें दुःख निवारणें अशीं कामें करण्याला असली धार्मिक मंडळी केव्हांहि तयार नसते. हीच जर धर्मासंबंधाची त्यांची कल्पना शुद्ध होईल तर एकानें दुसऱ्याच्या उपयोगी पडणें, हेच आपलें पहिलें व पवित्र कर्तव्य आहे, असें त्यांना वाटल्याशिवाय रहाणार नाहीं, व ते परस्पर साहाय्य करण्यालाहि


तयार होतील. देव व धर्म ह्यांच्यासंबंधानें शुद्ध कल्पना मनुष्याला झाल्याशिवाय त्याच्या ठिकाणीं सर्व मानवजातीसंबंधाचें प्रेम उत्पन्न व्हावें कसें ! ज्या धर्मानुयायांची ह्या दोहोंविषयीं कल्पना योग्य असते, तेच जातीभेदाच्या शृंखला तोडून टाकण्यास समर्थ होतात.

जे कोणी भेदभावाला मूठमाती देऊन समतेच्या गंगेमध्यें स्नान करतात, त्यांचीं मानसिक पापें नष्ट होतात. त्यांच्या ठिकाणीं मानवजातीविषयीं प्रेम उत्पन्न होतें. तेच भेदभाव विसरून दयाधर्माचीं कार्यें करण्याला उद्युक्त होतात. आजपर्यंत आम्हीं राष्ट्र ह्या नात्यानें घोर पापें केलीं आहेत. स्वार्थपरायणतेचा पूर वाहावला आहे. जातीभेदाच्या नांवाखालीं, लाखों लोकांना अज्ञानाच्या दास्यत्वांत ठेवलें आहे, व दुसऱ्याची अवनति करून आपली पण अवनति करून घेतली आहे. ही स्थिति बदलावी अशी जर आपली इच्छा असेल, तर आम्हीं न्यायाच्या, प्रेमाच्या, सत्याच्या मार्गानें प्रवास करावा. इतरांचीं दुःखें कमी करावीं; आपलें व दुसऱ्याचें आयुष्य सुखावह करावें असें जर आपणाला वाटत असेल, तर आपण ह्या महागंगेंत स्नान केलें पाहिजे. देवाधर्माविषयीं योग्य कल्पना होऊन जन्माचें सार्थक करून घेण्याचा हाच एक मार्ग आहे.



दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील
छबिलदास रोड, दादर (W. R.),

# दशरथ, कौसल्या आणि सुमित्रा

लोकांचें असें म्हणणें आहे कीं, "ज्याप्रमाणें लोक त्याप्रमाणें त्यांचे देव किंवा पुढारी." हें म्हणणें अर्धें खरें आहे. कारण कीं वास्तविक "लोकांचे जसे देव किंवा पुढारी असतात त्याप्रमाणेंच लोक असतात." हें ऐतिहासिक सत्य ( Historical fact ) आहे. जर ते देव किंवा पुढारी आदर्श, उत्कृष्ट किंवा अधम असतील, विशुद्ध किंवा कलंकित असतील, तर लोकांचें वर्तनसुद्धां तसेंच असतें आणि त्यांचें जीवनसुद्धां नेहमीं त्या आदर्शाप्रमाणेंच असतें. कोणत्याही समाजाची प्रगति किंवा अधोगति त्याचें ध्येय किंवा आदर्शच निश्चित् करीत असतात, आणि हीं ध्येयें किंवा आदर्श त्याच्या पुढारी लोकांच्या विचारसरणीवर अवलंबून असतात. अर्थात् ज्याप्रमाणें पुढारी किंवा आदर्श किंवा ध्येयें असतील त्याप्रमाणें त्यांचे लोक असतात. म्हणून असें मानण्याचें कारण नाहीं कीं, "जसे लोक तसे त्यांचे पुढारी." मार्क्सचा हा सिद्धांत अशास्त्रीय होय. समाजाच्या बुद्धिरूप आरशांत पुढाऱ्यांच्या विचारांचेंच प्रतिबिंब पडतें आणि त्याप्रमाणें समाजाचें जीवन घडत असतें. समाजाचें नियंत्रण करण्यासाठीं ईशसत्ता स्वीकारण्यांत मानवविकासाचा हा दृष्टिबिंदु समाज शास्त्रज्ञांनीं आमच्या समोर ठेवला होता.

रामायण म्हणजे ज्या कुटुंबांत स्वतःच्या चारित्र्यानें जगाला धडा घालून देणारी अशी आठ आठ पिढीपर्यंत असणारी चांगलीच माणसें—एकापेक्षां एक वरचढ माणसें—जन्माला आलीं त्यांचें वर्णन. दिलीप, रघु अज, दशरथ, राम, प्रत्येकाचें जीवन पहा! त्याच्यांत भव्यता आणि दिव्यता, संस्कारिता आणि सुशीलता, त्याच-प्रमाणें ज्ञान आणि प्रेम आढळेल. त्याचें राज्य सांस्कृतिक मानवतेचें पोषण करील असें होतें.

अयोध्येचा राजा म्हणून ज्याचें वर्णन आहे त्या महाराज दशरथाचे चरित्र कांहींसें निस्तेज भासतें. दाशरथी रामाचें जीवन लोकोत्तर होतें त्यामुळें दशरथ मानवोत्तम असून सुद्धां त्याचें जीवन तेजाच्या प्रगाढपुंज समीप असल्यामुळें साहजिकच निस्तेज वाटतें. आपले नेत्र रामाच्या तेजानें दिपून जातात, आणि या दिपलेल्या डोळ्यांनीं दशरथ थोडासा निस्तेज वाटतो. वास्तविक क्रांतदर्शी कवि वाल्मीकींनीं दशरथासाठीं—वेदवेत्ता, बुद्धिमान्, लोकांचा आवडता, दूरदृष्टि असलेला, सत्यप्रिय, संस्कारी वगैरे विशेषणें वापरलीं आहेत.

त्याच्यांत एक दोष होता—आणि तो म्हणजे "हृदयाची श्रीमंती, आणि त्या

श्रीमंतीच्या पोटीं असलेली सरळता आणि त्याचा परिणाम म्हणजे भोळेपणा! ही त्याची दुर्बलता होती. दशरथ भावनावश होऊन–तात्कालिक प्रमाधीन होऊन कोणाला काय देई? त्याची कल्पना करता येणार नाही. 'वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा' अशी मुत्सद्देगिरी ( Statesmanship ) त्याच्या ठिकाणीं नव्हती. तो मागचा पुढचा विचार करीत नसे, आणि त्याचा परिणाम म्हणून तो कुठल्या खड्डयांत पडेल याचा कांहीं एक विचार न करता वचन देऊन बसत असे. त्याच्या ठिकाणीं राजनीतिज्ञ बुद्धि व मुत्सद्देगिरी नव्हती. खालील प्रसंग वाचल्यावर त्याची कल्पना येईल.

### पहिला प्रसंग विश्वामित्रांचें आगमन

विश्वामित्राला आलेला पाहिल्याबरोबरच दशरथाचें हृदय आनंदानें भरून आले, आणि त्या भरात त्यानें किती वचनें द्यावीत! "तुम्ही सांगाल तें करीन. मागाल तें देईन. मी तुमचा एकमेव सेवक आहे. हें संपूर्ण राज्यसुद्धा तुमचें आहे." विश्वामित्र हळूच दोन राजपुत्रांची मागणी करतो. दशरथ दुःखी होतो आणि सांगतो कीं, 'प्राणासारख्या प्रिय असणाऱ्या या दोन राजपुत्रांना मी दूर करू शकत नाहीं.' परंतु वसिष्ठांनी राज्यनिष्ठा आणि सत्यनिष्ठा टिकविण्यासाठीं राजपुत्रांना देवविलें.

### दुसरा प्रसंग रामचंद्राचा राज्याभिषेक

कोपाविष्ट झालेली कैकेयी दशरथाजवळ बोलेना. दशरथ विव्हळ होऊन तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळीं कैकेयी विचारते कीं, "माझें कोणतें प्रिय करणार?" तत्क्षणीं दशरथ वचन देतो कीं, "माझ्या प्राणांपेक्षां प्रिय असलेल्या रामाची शपथ घेऊन सांगतो कीं, 'तूं सांगशील तें करीन' आणि कैकेयीनें दोन वर मागितले.

### तिसरा प्रसंग कैकेयीशीं लग्न

कैकेयीच्या वडिलांनीं सांगितलें कीं, कैकेयीचा मुलगाच गादीवर आला पाहिजे. दशरथानें सुद्धां चालत आलेल्या कुटुंबाच्या परंपरेचा आणि राजगादीच्या प्रतिष्ठेचा मागचापुढचा कांहींएक विचार न करता वचन दिलें. नंतर तें वचन त्याला सलूं लागलें. स्वतःच्या वचनाकरितां काय रघुकुळाची रीत बदलायची? शेवटीं आत्यंतिक कुलनिष्ठेसाठीं भरत आजोळी असतांना रामाला युवराज करण्याकरितां तयार झाला. स्वतःच्या आत्मनिष्ठेची होळी करून, स्वतःच्या चारित्र्याला डांबर फासून सुद्धां तो कौटुंबिक निष्ठा टिकविण्यासाठीं प्रयत्न करतो–यात केवढा मोठेपणा आहे! रामाला राज्याभिषेक करायला लागल्याबरोबर लोक म्हणूं लागले असते कीं, दशरथानें दिलेलें वचन मोडलें. स्वतःचें जीवन कलंकित करणारा असें लोक बोलतील याची दशरथाला काय कल्पना नव्हती? तें सर्व माहीत असूनसुद्धां सात पिढ्यापासून कुटुंबांत चालत आलेली परंपरा टिकविण्यासाठीं त्यानें रामचंद्राला युवराज करण्याचें धाडस केलें. अर्थात् कुटुंबाच्या आणि

राजगादीच्या चालत आलेल्या निष्ठेसाठीं जो स्वतः कलंकित व्हायला तयार होतो, त्याला हलका कसा म्हणणार ? अर्थात् दशरथ सुद्धां असामान्यच होता.

त्याचप्रमाणें आत्यंतिक सत्यनिष्ठेसाठीं त्यानें मृत्यूलाहि पाचारण केलें. कांहीं एक विचार न करतां कैकेयीला दिलेलें वचन त्याच्या सरळपणाचाच पुरावा होय. सरळपणा राष्ट्रीय किंवा सामाजिक दृष्टीनें कदाचित् अपराध असेल, परंतु हा सरळपणा आणि सत्यनिष्ठा यांमुळें त्याच्या जीवनांत तेजस्विता आली होती. सत्यनिष्ठेसाठीं त्याचे ठिकाणीं खरी करारी वृत्ति होती. त्या निष्ठेसाठीं प्राणार्पण करण्याची सुद्धां त्याची तयारी होती. रामाचें जंगलांत जाणें हें स्वतःचें महाप्रयाण आहे असें दशरथ मानीत असून सुद्धां त्यानें दिलेले शब्द मागें घेण्याचा विचार केला नाहीं. त्यानें तसें करण्याचा प्रयत्न केला असता तर त्याला सुटका करून घेतां आली असती. कैकेयीचा कान पकडून तिला एका बाजूला बसविली असती. विद्वान आणि धुरंधर राजकर्ते आज काय करीत आहेत ? “ आम्हीं असें कांहीं सांगितलेलें नाहीं, वृत्तपत्रांनीं खोटेंच छापलें असेल ! ”

मोहाधीन होऊन कैकेयीला वचन तर दिलें, परंतु तिची अभिलाषा पाहून दशरथाला अतिशय दुःख झालें–वज्राघात झाला असें वाटलें. त्याच्यासमोर “ व्यक्तिगत प्रतिष्ठा कीं राज्यप्रतिष्ठा ” हे दोन प्रश्न येऊन उभे राहिले. या दोन्ही गोष्टींचें पालन होण्यासाठीं राज्यगादी सोडून रामाला जंगलांत जाण्याची आज्ञा केली, परंतु ताबडतोब रामाच्या पायां पडून तो सांगतो कीं, “ मी तुला आज्ञा करीत आहें, परंतु तिचें तूं पालन करूं नकोस. माझी आज्ञा अन्यायाची आहे; परंतु मीं शब्द दिलेला असल्यामुळें मी तो फिरवूं शकणार नाहीं मी रघुवंशाला अयोग्य आहे. मला बांधून ठेवून–कैदेंत ठेवून–तूं राज्य कर. माझी रघुकुळाला न शोभण्यासारखी आज्ञा आहे.” त्या वेळीं सुपुत्र राम तत्क्षणीं नम्रपणें उत्तर देतो कीं, “ बाबा ! तुम्ही तुमच्या तत्त्वाचे पालन करीत आहांत, मग मी माझ्या तत्त्वाचें कां बरें पालन करूं नये ? तुम्ही तत्त्वनिष्ठ आणि मी तत्त्वभ्रष्ट होऊं ! ” राजगादीच्या मोहासाठीं वडिलांवर नालायकीचा शिक्का मारणें हा मुलाचा धर्म नव्हे, ही गोष्ट राम बरोबर जाणत होता. रामाचें दशरथाविषयीं अलौकिक प्रेम आणि आदर होता वडिलांचें मन तो चांगल्या तऱ्हेनें जाणत होता. त्यामुळेंच तर ज्या वेळीं कौसल्या रामाबरोबर वनांत जायला तयार होत त्या वेळीं वडिलांच्या गुणांचें वर्णन करून राम सांगतो कीं, “ कर्तव्यनिष्ठ, सत्यनिष्ठ आणि तत्त्वनिष्ठ अशा दशरथ राजाची तूं पत्नी आहेस, असें असतांना एकाद्या अनाथ विधवेप्रमाणें आपल्या मुलाबराबर वनांत जायला तूं कशा काय तयार झाली आहेस ? ” वडिलांविषयीं केवढी प्रचंड निष्ठा ही ! या निष्ठेमुळेंच असें वाटतें कीं, दशरथाचें चरित्र सुद्धां एक अलौकिक चरित्र होतें.

दशरथाच्या हातून दोन अपराध झालेले आहेत, परंतु त्याकरितां प्रायश्चित्त घेण्याची त्याची जबरदस्त तयारी होती. स्वतःच्या चारित्र्यावर कलंक फांसण्याची त्याची

तयारी होती. राम जर राजा झाला तर त्याच्या चारित्र्याला निश्चित कलंक लागला असता. परंतु दशरथाच्या जीवनाची—त्याच्या मनोभावनेची—जी दुसरी बाजू तिच्याकडे आपण पाहात नाहीं, म्हणून 'दशरथ कामी आणि विषयलंपट होता' असा तावडतोब शेरा आपण मारतों. दशरथ राजा असल्यामुळें त्याची खुशामत करण्यासाठीं ध्येयनिष्ठ आणि तत्त्वनिष्ठ अशीं विशेषणें वाल्मीकींनीं लावलेलीं नाहींत. तो वस्तुतः शांत स्वभावाचाच होता.

राम गेल्यानंतर त्या रात्रीं झोपेंतच दशरथाला मृत्यु येतो. त्याच्या मृत्यूची बातमी अयोध्यावासी लोकांना आणि त्याच्या नातेवाइकांना सकाळीं कळली.

राम हा समुद्रावरचा फेंस होता. लाटा आपटत आपटत किनाऱ्यापर्यंत येतात आणि नंतर त्यांच्यांतून फेंस निर्माण होतो. रामाच्या पूर्वीचे अयोध्येचे राजे आणि लोक विशुद्ध चारित्र्याचे आणि आदर्श जीवन जगणारे होते. कित्येक पिढ्यांपर्यंत विशुद्धता धगधगीत राहते तेव्हां राम येतो. कथानायक रामचंद्राला तत्त्वनिष्ठेसाठीं सर्वस्व अर्पण करण्याचें शिक्षण शालीन कुटुंबांतच मिळालें होतें. रामानें दशरथाच्या जीवनांत तत्त्वनिष्ठेसाठीं जीविताची पर्वा न करण्याचा पाठ आत्मसात् केला होता.

**कौसल्या**

कौसल्येचा सुद्धां रामाला तयार करण्यांत मोठा भाग होता. रामायणांत कौसल्येचें सुंदर वर्णन आहे. ती अतिशय प्रेमळ आणि सरळ अंतःकरणाची सुशील स्त्री होती. ईश्वराला सरळता अतिशय आवडते. चित्तांत छक्केपंजे असणारी व्यक्ति ईश्वराला आवडत नाहीं. सवतीशीं तिचा संबंध सख्ख्या बहिणीप्रमाणें होता. कैकयीला लोकांनीं चढविल्यानंतर ती कौशल्येचा सुद्धां अपमान करी, परंतु तो मनांत न आणतां ती म्हणे कीं, "कुटुंबांत मानापमानाचा संबंध काय म्हणून आणायचा? कुटुंबांत कोणी कोणाचा अपमान कां बरें करावा? कुटुंब हें एक युनिट (Unit) आहे. डावा हात कधीं उजव्या हाताचा अपमान करील? बहिणीला कधीं आपली दुसरी बहीण अपमान करते असें वाटतें काय?" अशा तऱ्हेच्या आदर्श कुटुंब व्यवस्थेची कौसल्या जननी होती.

आज जर वडिलांनीं दोन हिताचे शब्द सांगितले तर मुलाला अपमान वाटतो, आणि ऑफिसांत पंचवीस ठिकाणीं अपमान झाला तर कांहींच वाटत नाहीं! कौसल्येच्या वर्तनांत कधीं फरक पडत नसे. ती अशा तऱ्हेची आदर्श, प्रेमळ, सहनशील आणि थोर मनाची होती म्हणून राम तिच्या पोटीं जन्माला आला. परंतु राम अतिशयच तेजस्वी असल्यामुळें आईबापांचें चरित्र कांहींसें कमी प्रतीचें वाटतें. त्यांचें जीवन जरा निस्तेज वाटतें. म्हणून जर आईबापांचें जीवन ध्यानांत आलें नाहीं, तर रामाचें कसें ध्यानांत येईल? म्हणून अगोदर त्यांच्या चरणांना वंदन केलें पाहिजे. त्यांचें चरित्र मागें राहातां नये. रामाला सुद्धां हीच गोष्ट आवडेल.

भरत बेशुद्ध होतो त्या वेळीं शोकातिरेकामुळें तिला कांहीं एक सुचत नसतांना
सुद्धां ती धांवत धांवत जाते. त्याचें डोकें मांडीवर घेते आणि विलाप करीत असतांना
म्हणते कीं, "तुला काय झालें ? कोणत्या रोगानें तुझी अशी अवस्था झाली आहे ?
राम वनांत गेलेला आहे. आतां आपल्या कुळाचें महत्त्व, राजवंश आणि राजगादीची
निष्ठा, त्याप्रमाणें लोकांची दृष्टि या सर्व गोष्टी तुझ्यावरच अवलंबून आहेत. म्हणून तूं
जागृत हो. राम गेल्यानंतर तुझ्याप्रमाणें मीही दुःखी झालेली आहें, परंतु कुळाची कीर्ति
तू वाढवशील, या आशेनें मी तुझ्याकडे पाहात आहे." हे शब्द कौसल्येच्या मनाची
आणि कौटुंबिक भावनेची भव्यता दर्शवीत आहेत. तिनें सामान्य स्त्रीप्रमाणें विचार
नाहीं केला कीं, 'भरत मरूं दे. तुझ्या आईनें रामाला वनांत पाठविलें त्याचें बरोबर
फळ तुला मिळालें.' तिच्या जीवनांत समंजसपणा, सहनशीलता या गुणांची जोडी
होती म्हणून रामायण झालें.

स्त्रीस्वभावानुसार तिच्या मनांत दोनदां थोडीशी चलबिचल झाली होती.
रामाला राज्याभिषेक व्हावयाचा आहे ही गोष्ट जाणून स्वतः राजमाता होणार या
गोष्टीचा तिला अतिशय आनंद झाला होता. राजमाता होणार या सुखस्वप्नांतच ती
झोंपली आणि सकाळीं लक्ष्मणाने येऊन सांगितलें कीं, "राम वनांत जाणार आहे."
पुढें लक्ष्मण असें म्हणाला कीं-"या सर्व अनर्थाचें मूळ कैकेयी आहे, म्हणून तो
कांटा जर दूर केला तर रामाला राज्याभिषेक होईल. वडिलांनीं तिच्या भाषणानें
मोहित होऊन हें सर्व केलें आहे. म्हणून तिला बांधून तुरुंगांत ठेवली तर आपलें कार्य
निर्भ्रणें पार पडेल व या गोष्टीसाठीं तूं संमति दे." "त्या वेळीं कौसल्येनें लक्ष्मणाला
संमति दिली होती.

लक्ष्मण गेल्यानंतर रडत रडत दशरथ कौसल्येजवळ येतो आणि सुरवातील
कौसल्या दशरथाची निर्भर्त्सना करते. दशरथ तिच्या पायां पडतो आणि दीन होतो
हें करुण आणि हृदयद्रावक दृश्य पाहिल्यानंतर कौशल्येला पश्चात्ताप होतो. तिला
वाटलें कीं, "माझी चूक झाली." शोकाचा आवेग तिला आवरेना. दशरथाच्या
तोंडून सर्व हकीकत ऐकून त्याला त्याच्या कार्यांत आश्वासन देते आणि म्हणते,
"ईश्वराच्या इच्छेप्रमाणें झालें, तुम्हीं कोणतीही चूक केलेली नाहीं." अशा तऱ्हेनें ती
तावडतोब स्वतःचा निर्णय बदलते.

कौसल्येच्या जीवनांत तेजस्विताही दिसते. ती असा विचार करीत नाहीं कीं, राम
वनांत जातो आहे ही गोष्ट खरी, परंतु चौदा वर्षांनंतर रामाला राजगादी पुन्हां मिळणार
आहेच. "भरतानें उपभोगलेल्या गादीवर राम बसणार नाहीं-भरताच्या राज्यासाठीं
राम लोलुप होणार नाहीं. राम आणि भरत हे दोघेही मला सारखेच आहेत." अशा
तऱ्हेनें ती राजगादीसाठीं रडत नाहीं, तिच्यांत राजमाता होण्याची लोलुपता नाहीं.

आशेच्या शिखरावर पोंचल्यानंतर निराशेच्या खोल खड्यांत पडल्यानंतर थोडेंसें लागणारच. त्यामुळें मानसशास्त्रदृष्ट्या कौसल्येची वरील गोष्ट क्षम्य आहे.

कौसल्या विदुषी होती. दशरथाबरोबर धर्मशास्त्र व राजशास्त्रांतल्या शास्त्रार्थाची ती चर्चा करीत असे. तिचेच गुण रामाचे ठिकाणीं होते. आई जर मूर्ख असली, तर मुलें मूर्ख होणारच.

उपदेश करतांना आलेले श्रुतींतील दृष्टांत असें सांगतात कीं, श्रुतींचासुद्धां तिनें अभ्यास केलेला होता. कुटुंबांत पुष्कळ अपमान सहन करून सुद्धां शांतचित्तानें स्वतःचे कर्तव्यनिष्ठ आणि ध्येयनिष्ठ जीवन घालविणें—हें जीवनांतील वैशिष्ट्य कौसल्येच्या जीवनांत दिसतें, आणि रामाच्या संपूर्ण जीवनावर त्याचीच छटा पडलेली दिसते. रामायणांत कौसल्येचें राममाता म्हणून स्थान नाहीं तर त्याच्या आचरणाचे गुरु या स्वरूपांत सुद्धां तिचें स्थान आहे. कौसल्या रामाची आई. प्रभु रामचंद्राला तीन माता होत्या. रामचंद्र सर्व स्त्रियांना आई मानीत असे, परंतु त्यांमध्यें या तीन मुख्य होत्या. केवळ कौसल्याच नव्हती.

रामाची कैकेयीसुद्धां आई होती. त्यामुळेंच भरत कैकेयीला मारीत असतांना थांबतो आणि म्हणतो.

( " मारावें तुज वाटे, माय परि म्हणेचि रामराय तुला " )

## सुमित्रा

सुमित्रेचें पात्र वाल्मीकींनीं एकदांच पडद्यावर आणलें आहे. वनांत जातांना लक्ष्मण वंदन करून अनुज्ञा मागतो, त्यावेळीं तिचें, तिच्या व्यक्तीचें दर्शन होतें. तिची बुद्धि त्वरित निर्णय घेऊं शकत असे. ती अनुज्ञा देण्याच्या वेळीं म्हणते—

**रामं दशरथं विद्धि मां विद्धि जनकात्मजाम् ।**
**अयोध्यामटवीं विद्धि गच्छ तात ! यथासुखम् ॥**

खरोखर, स्वतःच्या पोटचा गोळा, सुखांत वाढलेला, नुकताच विवाहित झालेला विनाकारण जंगलांत जात आहे. त्याला मुळींच विरोध न करतां ताबडतोब अशा तऱ्हेचा उपदेश करणें ही गोष्ट फक्त असामान्य स्त्रीच करूं शकेल !

तिचा उपदेश वाचल्यानंतर असें वाटतें कीं, तिच्यासारखें पात्र एकदांच कां आलें ? दुःखाच्या प्रसंगीहि दिव्य आणि उपदेशात्मक विचार असणाऱ्या तिचें व्यक्तिमत्व कोणत्या प्रकारचें असेल ! खरोखर जर तिचें चरित्रचित्रण आणखी केलें असतें, तर खूपच आनंद मिळाला असता.

राम जंगलांत गेल्यानंतर कौशल्या रडते, त्यावेळीं सुमित्रा ज्या शांतपणानें कौशल्येला आश्वासन देते आणि सांगते, तें दृश्य आपल्या हृदयांत आहे म्हणून आपली मान विशेष उंचावली पाहिजे. दुसऱ्य चें दुःख पाहून सर्वांनाच वाईट वाटतें, वेदांताची भाषा बोलली जाते–परंतु या ठिकाणीं सुमित्रा सुद्धां दुःखी आहे–सुमित्रा तर कौसल्यपेक्षां दुःखी झालेली आहे. मेलेला आणि मृत्यूच्या मुखांत उडी मारणारा या दोहोंत फरक आहे. सुमित्रा कौशल्येला सांगते कीं, 'रडूं नकोस. सूर्यदर्शन सुद्धां जिथें होणार नाहीं अशा राजवाड्यांत राहिलेला राम वनांत जात आहे. परंतु त्याच्या वृत्तीची उदारता, चरित्र्याची निष्कलंकता त्याचप्रमाणें जीवनाची गंभीरता पाहून सूर्य सुद्धां त्याला ताप देणार नाहीं, तर त्याचें रक्षण करील. वायुदेव सुद्धां प्रसंगविशेषीं गरम आणि थंड राहिल, त्याला अनुकूल असा वाहील. मर्यादापुरुषोत्तम राम वनांत ज्या वेळीं झोंपलेला असेल त्या वेळीं पृथ्वी आई होईल आणि त्याला झोंपवील. शीतलचंद्र संतापहारक होऊन रक्षण करील. त्याला कोणीही स्पर्श करणार नाहीं. त्याच्या केंसाला सुद्धां कोणी धक्का लावणार नाहीं. कारण आपल्या पाठीशीं ईशसत्ता उभी आहे ! केवढा दांडगा आत्मविश्वास ! सुमित्रेच्या ठिकाणीं अशा तऱ्हेने प्राप्त परिस्थितित समाधान मानून घेण्याची उत्कृष्ट शक्ति होती.



॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

# रामकालीन शिक्षण व्यवस्था

रामकालीन कुटुंबव्यवस्था मानवी स्थितीची द्योतक होती. या सर्वांना मूळ पाया—तत्कालीन शिक्षणव्यवस्थेंत होता. शिक्षणासाठीं त्या काळची तपोवन-पद्धति सुंदर, निर्दोष आणि आदर्श होती. ती जर आत्मसात् केली तर वानरांचे नर आणि नरांचे नारायण व्हायला वेळ लागणार नाहीं.

आज विचार आणि जीवन ही दोन्ही भिन्न झालेलीं आहेत त्यामुळें विचार निर्जीव आणि विचारशून्य जीवन झालेलें आहे. शेवटीं आपण कुठें जात आहोंत आणि काय करीत आहोंत हें माणसाला कळेनासें झालें आहे, कारण शिक्षण आणि जीवन वेगवेगळीं झालेलीं आहेत—घरीं जगतात आणि शाळेंत शिकतात! हें जीवनाचा आणि शिक्षणाचा पृथक्करणा—भिन्नता सांगत आहे. तें दूर करण्यासाठीं शिक्षण देण्याचे ठिकाणी जीवन जगण्याचें शिक्षण दिलें गेलें पाहिजे आणि घरीं शाळेंत मिळालेले संस्कार आत्मसात् करण्यासाठीं प्रयोगशाळा निर्माण केली पाहिजे. शालीन कुटुंब म्हणजे शाळा ज्यांच्या घरीं आहे तें. आणि कौटुंबिक शाळा म्हणजे कुटुंब जिच्यांत घुसलें आहे ती. तपोवनाची शिक्षण पद्धति—ही उच्च प्रतीची कल्पना आहे. रामकाळांत प्राथमिक शिक्षण शालीन कुटुंबांतून मिळत असे आणि हें शिक्षण मुलाच्या भावी आयुष्याचा पाया होत असे; त्याचप्रमाणें उच्च शिक्षण Higher Education, तपोवनांत मिळत असे. अशा तऱ्हेनें जीवन आणि शिक्षण यांमध्यें जे साम्य असावयास पाहिजे तें रामकालीन पद्धतींत होतें.

## तपोवनांतील शिक्षणक्रम

तपोवनांत कोणत्या प्रकारचें शिक्षण मिळत असे ?

ज्या शिक्षणाची माणसाला नेहमीं गरज आहे तें सर्वच शिक्षण तपोवनांत देण्यांत येत असे. आजच्या एका शिक्षकाला एक गृहस्थ भेटले. त्यांनीं शिक्षकाला विचारलें. "तुम्हीं काय करतां ?" शिक्षक म्हणाला, "मी शाळेंत ( Academic School ) शिक्षण देत असतों." त्या गृहस्थांनीं पुन्हां विचारलें, "तुम्हीं काय शिक्षण देतां ? कपडे शिवायला शिकवतां काय ? स्वयंपाक करायला शिकवतां काय ? कपडे धुवायला शिकवतां काय ? स्वतःचें जीवन स्वावलंबी करायला शिकवतां काय ? आई—बापाशीं कसें वागावें तें शिकवतां काय ? समाजांत समंजसपणानें राहाण्यासाठीं क्षमा, शांति, दया, तितिक्षा, वगैरे शिकवतां काय ? ते गुण जीवनांत कसे आणावे हें शिकवतां काय ? या प्रत्येक प्रश्नाचें उत्तर त्यानें "नाहीं" असेंच दिलें.

अशा तऱ्हेनें आधुनिक शिक्षण एकाही बाबतींत जीवनोपयोगी ठरत नाहीं. त्यामुळें जीवनांतील एकसुद्धां प्रश्न सोडविण्याची शक्ति प्राप्त होत नाहीं. कोणत्याही ठिकाणीं जाऊं शकत नाहीं त्या शिक्षणाचा काय उपयोग ? म्हणून शिक्षक शिक्षणाच्या ऐवजीं दुसरेंच कांहीं देत असतो, आणि इतकें असूनही स्वतः शिक्षणाचार्य असल्याचा दावा करीत असतो ! तपोवनांत "शौचाचारांश्च शिक्षयेत्" शौचविधीसाठीं कसें जावें, तोंड कसें धुवावें, यापासून सुरवात करून सर्वप्रकारचें जीवनोपयोगी शिक्षण देण्यांत येत असे. कपडे कसे धुवावे, स्वयंपाक कसा करावा, धान्य कसें तयार करायचें, इत्यादि प्रत्येक जीवनोपयोगी प्रांतांत तपोवनाचें शिक्षण पोंचलेलें होतें. आज यापेक्षां अगदीं नेमकें उलटें शिक्षण देण्यांत येत आहे आणि शिक्षणशास्त्री मानीत आहे कीं, मी पवित्र कार्य करीत आहें !

## मोफत शिक्षण

रामकाळांत सर्व शिक्षण विनामूल्य देण्यांत येत असे. शिक्षण ही पैशानें घेण्याची गोष्ट आहे हें कोणाच्या स्वप्नांतही नसे. ऋषि म्हणजे बुवा नव्हते, तर त्यांना जीवनाच्या सर्व अंगांचें ज्ञान होतें. ज्ञानाची मशाल समाजांत प्रज्वलित ठेवण्यासाठीं स्वतःच्या उत्कृष्ट जीवनाचें तेल त्यांत घालीत असत. ते तत्त्वज्ञानी होते, विवाहित होते, प्रत्ये-काचा संसार होता; इतकें असूनही निर्धन माणसांप्रमाणें ते तपोवनें चालवीत असत. राजा, महाराजा किंवा श्रीमंत यांकडे भीक मागायला ते जात नसत, तर लोकच त्यांना पैसे देत असत, कारण कीं लोकांत आपणहून देण्याची उच्च भावना होती. त्यामुळें त्यांना फंड, यादी किंवा खुशामत यांची गरज भासत नसे. ही समाजाची उच्च स्थिति होय. जगाच्या इतिहासांत Voluntary Taxatiou कुठेंही पाहायला मिळत नाहीं. रामकाळांत हें होतें म्हणून राम-कालीन लोक उच्च दर्जाचे सुसंस्कृत होते. तपोवनांत कोणाचाहि अधिकार चालत नसे. सर्वांनीं फुकट जेवावें, तेथें श्रीमंतांना प्राधान्य नाहीं. तपोवनांत राजा, महाराजा किंवा श्रीमंत यांची सत्ता चालत नसे. महाराज दुष्यंताचा रथ तपोवनाजवळ आला त्यावेळीं सारथि म्हणतो कीं, या ठिकाणीं कण्वाच्या आश्रमाचें स्थान आहे. दोन मिनिटांत आपण तिथें पोंचू. राजानें एकदम नकार दिला—"विनीतवेषेण प्रवेष्टव्यानि तपोवनानि नाम ।" राजा सर्व भूषणें काढून चालत आश्रमांत गेला. दुष्यंत तेथें एक राजा म्हणून नव्हे तर एक सामान्य माणूस म्हणूनच आश्रमांत गेला होता. तपोवनांत राजसत्ता चालत नसे. शिक्षकसत्ता किंवा ऋषिसत्ताच चालत असे. अगदीं आजपर्यंत शिक्षणसंस्थांच्या हद्दींत पोलिसालासुद्धां अध्यक्षांच्या परवानगीशिवाय जातां येत नसे. तपोवनांत कोणी गर्व करीत नसे; कारण ऋषिमुनि यांना गर्व किंवा वैभव दाखविण्याचे परिणाम लोक समजत होते.

शिक्षण संस्थांचे चालक आणि राजा यांचे संबंध किती प्रेमळ होते तें रघुवंशांत वाचा. तपोवनाला चौदा कोटी रुपयांची गरज होती. ते नेण्यासाठीं वरतंतु ऋषींचा

शिष्य कौत्स रघु राजाकडे आला होता. सर्व दक्षिणादान यज्ञांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या रघुराजाला पाहून कौत्स कांहींच बोलला नाहीं. परंतु रघु त्याच्या येण्याचें कारण जाणून स्वपराक्रमानें अगणित धन कुबेराकडून आणून ते सर्वच्या सर्व कौत्साला आग्रह करून देऊं लागला. ही गोष्ट कदाचित् आपण मानणार नाहीं. अर्धी भाकरी खाणाराला आपले पूर्वज १२ लाडू खात होते हें कसें पटणार? दिडकीत सर्व भागविणाऱ्याला ही गोष्ट खोटी वाटणारच!

**गरीब श्रीमंत भेदभाव नव्हता**

तपोवनांत गरीब आणि श्रीमंत असा भेद नव्हता. त्यांच्याशीं समान वर्तन असल्यामुळें कोणी कोणाचा द्वेष करीत नसे, आणि कोणताही 'Is'm' आश्रमांत शिरलेला नव्हता. गरीब ब्राह्मणाचा मुलगा आणि चक्रवर्ती राजाचा युवराज एके ठिकाणीं बसून अध्ययन करीत असत. किती विलोभनीय दृश्य असेल तें! ज्याना जीवनांत ज्ञानाची जिज्ञासा आणि वर्तनांत नम्रता यावी असें वाटत असे, त्यांनाच आश्रमांत प्रवेश मिळत असे. शालीन कुटुंबांत अशा तऱ्हेची वृत्ति निर्माण करण्यांत येत असे कीं, "केव्हां तपोवनांत जायचें?" भूक लागली असेल आणि जर त्याला जेवायला वाढण्यांत आलें तर त्याला जेवण उत्कृष्ट लागतें. त्याचप्रमाणें घरांत शिक्षणाची भूक जागृत करण्यांत येत असे. जर ज्ञानानें दुसऱ्याविषयीं आत्मीयता, पूर्वजाविषयीं आदर वगैरे गुण येणार नाहींत तर तें ज्ञान कसलें? आणि तें ज्ञान मानवतेचा काय विकास करणार! ज्ञानानें आत्मिक गुणांचा विकास झालाच पाहिजे.

"Education" शब्दाचा अर्थ "To draw out" अव्यक्त आणि सुप्तावस्थेंत असलेले गुण आणि शक्ति यांना जागृत करणें, ज्याप्रकारचें शिक्षण "Education" रामकाळांत देण्यांत येत असे, विद्यार्थ्यांना सुखसोयींनीं युक्त अशीं विद्यार्थी गृहें "Hostels" त्यांचें वर्णन किंवा भोजनाच्या आनंदाचें वर्णन रामायणांत नाहीं. ज्या ठिकाणीं सर्व सुखसोयी असतील तिथें शिक्षण कसें काय प्राप्त होणार? आश्रमांत भोजनाचा आनंद नसे तर ज्ञानाचा आनंद. जास्त सुखसोई झाल्या कीं ज्ञानाचें अस्तित्व रहात नाहीं. लोक असें म्हणतात कीं, "उत्कृष्ट व्यवस्था असलेली खाणावळ आहे. झोंपण्याकरितां मऊ गादीची कॉट्, जेवायला स्वादिष्ट आणि रुचकर जेवण असतांना आमचीं मुलें कां बरें शिकत नाहींत? कितीही धडपड केलीत तरी हें लिहून ठेवा कीं, तुमचीं मुलें शिकणार नाहींत.

> **"सुखार्थी चेत्त्यजेद्विद्यां विद्यार्थी चेत्त्यजेत्सुखम् ।**
> **सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥**

आश्रमांत तर हातानें स्वयंपाक करायचा, हातीं कपडे धुवायचे, भोजन अतिशय प्रमाणांत असायचें आणि योग्य आणि पोषक असा खुराक घ्यायचा आणि हें सगळें दीड

तासांत स्वयंपाक करून, भोजन करून, भांडी घासून अभ्यास करायला बसायचें. अशा तऱ्हेनें त्या भोजनांत अळूच्या वड्या, खमण ढोकळा यांचा आनंद नसे, तर ज्ञान आणि खेळ यांचा आनंद विद्यार्थ्यांना मिळत असे. याचें वर्णन रामायणांत आहे. ब्रिज, रमी, कॅरम वगैरे खेळ त्या काळीं नव्हते. या खेळांमुळें तर परिश्रमांशिवाय नालायकीचे सद्गुण आपणांला प्राप्त होतात! खेळांत शारीरिक परिश्रम असतील असे खेळ खेळावेत. तपोवनांत दोनच गोष्टींवर भर देण्यांत येत असे. एक ब्रह्मचर्य व्रत आणि दुसरी तीव्र बुद्धि. पूर्ण ब्रह्मचर्यव्रत पाळण्यांत येत असे; कारण कीं जर इंद्रियांची शक्ति विखुरली गेली तर बुद्धि तीव्र कशी होणार! आणि मग शास्त्रांतील कठिण सिद्धांत कसे काय आत्मसात् केले जाणार! ब्रह्मचर्यामुळें इंद्रियांची सर्व शक्ति बुद्धीलाच मिळत असे आणि त्यामुळें ते तैलबुद्धीचे होते. सूर्याचे पसरलेले किरण वस्तूला जाळूं शकत नाहींत तर कांचेमध्यें केंद्रित झालेले किरणच वस्तू जाळूं शकतात. अशा तऱ्हेनें इंद्रियांची सर्व शक्ति बुद्धीला दिल्यामुळें कोणतीही गोष्ट अवघड राहात नसे. विखुरलीं, फुकट गेलेली शक्ति जर असेल तर मेंदूला ती कमचि मिळणार, म्हणून ब्रह्मचर्याची अत्यंत जरूरी आहे.

## ब्रह्मचर्याला महत्त्वाचें स्थान

आज ब्रह्मचर्याला स्थान नाहीं म्हणूनच ज्ञानाचेंहि नांव नाहीं. "ब्रह्म वेदाः तदध्ययनार्थं व्रतमपि ब्रह्म तच्चरतीति ब्रह्मचारी।" वेद म्हणजे ज्ञान आणि ब्रह्मचर्य म्हणजे ज्ञानाकरितां घेतलेलें व्रत, आणि हें रेडिओ, सिनेमा फोनोग्राफ यामुळें दूषित होतें. सकाळच्यावेळीं वेदांच्या तेजस्वी घोषांच्याऐवजीं फिल्मी संगीतच जर कानावर येत असेल, स्त्रैण गोष्टींचेंच वाचन होत असेल आणि सिनेमांत आलिंगन आणि चुंबन पाहाण्यांत येत असेल त्या ठिकाणीं ब्रह्मचर्याचें पालन कसें काय शक्य आहे? आणि मग बुद्धीला शक्ति कशी काय मिळणार! प्राचीन काळीं तपोवनांतील विद्यार्थ्यांच्या तोंडून सकाळच्या रम्य स्फूर्तिदायक वातावरणांत "यत्तेऽग्ने तेजस्तेनाहं तेजस्वी भूयासम्" यांचे आल्हाददायक सूर ऐकूं येत असत.

उपभोगाचीं साधनें संसारांत ठेवायचीं नाहींत, मग आमचें जीवन अळणी नाहीं का होणार? मुलांविषयीं जर प्रेम असेल तर मग आईबापांनीं स्वतःच्या जीवनांतील तारुण्याचा आनंद 'Charm' नष्ट का करून टाकायचा! कुटुंबी माणसाला वैभव शोभतें परंतु विद्यार्थ्याला तें शोभत नाहीं. म्हणून मुलगे आठ वर्षांचे झाल्यावर प्राचीन काळीं त्यांना तपोवनांत पाठवून देत असत. खोट्या प्रेमाखातर आईबाप मुलांना आपल्याजवळ ठेवीत नसत; नाहींतर केवळ आईबापांच्या मजेखातर मुलांचें जीवन फुकट जाईल. तपोवनाची कल्पना दिव्य होय. आधुनिक परिभाषेंत तपोवन म्हणजे "Residential Education System" जें इतर देशांत चालू आहे. परंतु आमच्या देशांत मात्र पुन्हां तपोवनपद्धति सुरू करण्याचें कोणाच्या मनांत कांहीं येत

नाहीं ! परंतु ही गोष्ट आपल्या परात्पर गुरूंकडून जेव्हां आपल्याकडे येईल त्यावेळीं आपला दुसरीकडे जाणारा प्रवाह तिकडे वळेल. सरळ स्वीकारली तर 'Orthodox' सनातनी म्हणतील ना !

तपोवनांत साधें आणि स्वस्त जीवन जगण्यांत येत असे-त्या ठिकाणीं विद्यार्थांच्या मनांत नेहमी अभ्यासाचेच विचार येत असायचे-प्रत्येकानें सारखे राहायचें आणि अमुकच खर्च करावयाचा, साधें जीवन जगायचें, परंतु जर श्रीमंत म्हणतील कीं, 'आमच्या चिरंजीवांच्या जीवनांत वैशिष्ट्य तर असलें पाहिजे कीं, नाहीं ? तर सांगायचें कीं तुमचा मुलगा कांहीं आकाशांतुन नाहीं पडलेला. तपोवनांत सर्वच सारखे. तपोवन सोडून तुमच्याजवळ आला कीं मग सात बंगले द्या ना." अशा तऱ्हेनें तपोवनांत क्रूरता, निष्ठुरपणा, वाटेल परंतु त्या निष्ठुरता व कौर्याचे पोटीं खरें प्रेम होतें. त्यामुळेंच प्रत्येक व्यक्तीचें जीवन सार्थक होत होतें.

## गुरुकुलांत सर्व सारखे

गुरुकुलांत मोठा कोण ? मोठेपणा कोणाचा ? राजाचा, श्रीमंताचा कीं राजकीय पुढाऱ्याचा ? छे ! या कोणालाही मोठा मानण्यात येत नसे. शिक्षण संस्थेत तर शिक्षणाधिकारीच "Final Authority." विद्यार्थ्यांचें गुरूवरच एकनिष्ठ प्रेम असे. त्यांचें मन गुरुशिवाय कोणावरही नसे.

"ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥"

ही गुरुशिष्यांची परस्परांची प्रार्थना होती. आईबाप भौतिक शरीर देतात. ते जगाच्या आंगणांत बाहेर पाठवतात. परतु गुरू आध्यात्मिक नैतिक जीवन देतो. तो अणूपासून परमाणुपर्यंत सूक्ष्मतत्त्वांचें ज्ञान करून देऊन आपल्या बुद्धीला जगाच्या अंतःपुरांत घेऊन जातो. गुरूंजवळ ज्ञान आणि तेज होतें, त्यांची दृष्टी प्रेमळ मंगलमय असल्यामुळें त्यांना एक एक मुलगा म्हणजे संपूर्ण मानवजातीचें प्रतीक, अर्थात एक मुलगा जरी बिघडला तरी संपूण मानवजात बिघडेल असें वाटत असे. त्यामुळें देवांची उपासना ज्याप्रमाणें करावी त्याप्रमाणें विद्यार्थ्यांना शिकवीत असत. प्रत्येकासमोर ज्ञानभांडार खुलें करण्यांत येत असे. प्रत्येकजण आपपल्या ग्रहणशक्तीप्रमाणें घेत असे. चिमणी चिमणीच्या वेगानें आणि गरुड गरुडाच्या वेगानें उडणार. प्रत्येकाला उडून जाण्याकरितां आकाश मोकळेंच आहे. तपोवनांत गुरुशिष्य पवित्र भावनेनें रहात असल्यामुळेंच विद्यार्थी संस्कारी आणि सुशील नागरीक होऊन बाहेर पडत असत. प्रत्येकांत मानव्याचे गुण विकसित होत होते, त्यामुळेंच ज्यावेळीं स्नातक ज्ञानमंदिरांतून बाहेर पडत, त्यावेळीं

राक्षस होऊन नव्हे, तर ज्ञानसंपन्न आणि चारित्र्यशील होऊन बाहेर पडत असत. वडिलांना मूर्ख, आईला दीडशहाणी, मनू ग सनातनी Orthodox, असली भाषा तो बोलत नसे. आज गुरूंवर कोणाचें प्रेम आहे, आणि त्यांना कोण भितो आहे ! कॉलेजांत जाणारे म्हणतात कीं, 'आम्हीतर गुरूंना सिगरेट Offer करतों !' सिनेमाप्रमाणेंच शाळाकॉलेजांतले विद्यार्थीसुद्धां फी देऊन Seat reserve करतात. शाळाकॉलेजें सर्व सिनेमागृहें होऊं लागलीं आहेत. शिक्षण अगदीं फारच हीनदशेला येऊन पोंचलें आहे. आईबाप शिक्षकांना भीति घालीत असतात कीं 'आमच्या मुलांना मारूं नका. नापास झालीं तर पुढच्या वर्षी फी भरूं ! अशा नव्हेनें त्यांना फी भरतों याचाच गर्व असतो. प्रत्येक ठिकाणीं रुपये आणि पैस यांचीच गोष्ट, हें ऐकल्यानंतर अशी चीड येते कीं हे रुपये आणे ,पै समुद्रांत बुडवून टाकाल तरच मानवजातीचें कल्याण होईल.

तपोवनांत विद्यार्थ्यांना प्रेमानें जागें करण्यात येत असे प्रभु रामचंद्राला विश्वामित्र सकाळीं अगदी लौकर उठवीत असत, त्या वेळचें वर्णन फारच सुंदर आहे.

" रामेति मधुरां वाणीं विश्वमित्रोऽभ्यभाषत
उत्तिष्ठ नरशार्दूल ! पूर्वा संध्या प्रवर्तते ॥ "

प्रभातकाळच्या रम्य प्रहरीं गुरूचें अशा प्रकारचें प्रेमळ संबोधन शिष्यांच्या जीवनांत किती उत्साह आणि गुरूविषयी केवढी आत्मीयता निर्माण करीत असेल हें अनुभवी माणूसच जाणूं शकेल ! विश्वामित्राला असें वाटत होते कीं मी भगवानाला उठवीत आहे आहे आणि रामचंद्राला असें वाटत कीं मला ईश्वरच जागृत करीत आहे.

भावनेशिवाय असलेलें शिक्षण हें काय शिक्षण आहे ! आज बोर्डिंगमध्यें आणि त्यांत फुकट राहाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतींत वरच्या अधिकाऱ्यांचें वर्तन एकदां जाऊन समक्ष पाहाण्याजोगें आहे. लाथा मारतात, शिव्या देतात आणि उठवतात. माझ्या पूर्वजन्मींच्या पुण्याईमुळें आणि वडिलांच्या आत्यंतिक प्रेमामुळें, आणि ईश्वरी कृपेमुळें या विसाव्या शतकांत सुद्धां मोडकें तोडकें कां होईना पण तपोवनांतील शिक्षण मला मिळालें. पहांटे चार वाजतां अंधकारांत आमचे गुरूजी हातांत कंदील घेऊन मला शोधीत येत व उठवीत. म्हणायचे कीं, " पांडुरंगे ! अजून झोंपून राहिला आहेस ! तुला तर तुझ्या वडिलांसारखें व्हायचें आहे ना ? ही भाषा आणि प्रेम यांचें स्मरण झाल्यावर अजूनही आंगावर रोमांच उभे राहातात. किती लक्ष ! केवढी मेहनत !

रामकाळांत स्त्रियांना शिक्षण देण्यांत येत असे कीं नाहीं ? आजच्या सुशिक्षित स्त्री-समाजापेक्षां त्या काळचा स्त्रीसमाज नीति, भावना आणि संस्कार या बाबतींत खूपच पुढें गेलेला होता. नीतिभावना वाढतील अशा प्रकारचें शिक्षण देण्यांत येते

असे. त्यांना शास्त्रीय विषयांचें शिक्षण नव्हे तर प्रेम, माधुर्य, भक्ति वगैरे ज्यामुळें दृढ होतील आणि वृद्धिंगत होतील असें शिक्षण देण्यांत येत असे. ज्यामुळें त्यांना आपल्या जीवनांत स्त्रीत्वाचा विकास करतां येत असे. "Manly woman and womanly man" होतील असें, आजच्यासारखें शिक्षण देण्यांत येत नसे. भूमिति, त्रिकोणमिति, शिकून मानव्यानें बिलकूल शिक्षण मिळत नाहीं. कोणाशीं कसें वागावें, तें पण कळत नाहीं. त्याकाळीं स्त्रीला असें शिक्षण देण्यांत येत असे कीं ज्यामुळें स्त्रीचे ठिकाणीं तिच्या जीवनकार्याला अनुरूप असे गुण यावेत. तें शिक्षण तिला मानव बनवीत असे आणि आपल्या सहवासांत येणाऱ्या दुसऱ्याला ती मानव मानव बनवीत असे. या सर्व मोठ्या गोष्टी जाऊंद्यात, पण एकानें दुसऱ्याशीं कसें रहावें अशा प्रकारचें अगदीं प्राथमिक शिक्षण सुद्धां आज देण्यांत येत नाहीं !

पुरुष हें स्त्रीच्या हातांतील खेळणें आहे. पुरुषाला बिघडविणें हा ज्याप्रमाणें तिच्या हातचा मळ आहे, त्याप्रमाणें त्याला सुधारणें ही गोष्टसुद्धां अगदीं सहज साध्य आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊन स्त्रियांना असें शिक्षण दिलें जात असे कीं, ज्यामुळें मानवतेची भावना निर्माण व्हावी. त्यांना तत्कालीन वाङ्मय तसेंच राज्यव्यवस्थेचेंसुद्धां शिक्षण देण्यांत येत असे. त्यामुळेंच वसिष्ठ सीतेविषयीं म्हणाले होते कीं, "पालयिष्यति मेदिनी।" राम वनांत खुशाल जावो; सीता राज्य करील. अशा तऱ्हेनें राम कालीन स्त्रीशिक्षणाचा हेतु उच्च आणि उदात्त दृष्टोत्पत्तीला येतो. आज स्त्रीशिक्षण देणाऱ्या लोकांचे हेतु तर पहा! वडील माणसें म्हणतात कीं शिक्षणाच्या भूषणांनीं मुलीला नटवली थटवली कीं लग्नाच्या बाजारांत तिला चांगली किंमत येईल! परंतु हें बाजारी हेतुवाले शिक्षण जीवनांतल्या प्रसंगांत धीर तें काय देणार !

तरुण म्हणतात कीं, आम्ही शिकलेले, तेव्हां आमची पत्नी शिकलेली असलीच पाहिजे. म्हणजे आमच्याबरोबर फिरतांना आम्हांला लाज वाटणार नाहीं. शिकलेली असेल तर कांहीं काम करील, बोव्याचे कपडे टिपून ठेवील, हिशेब ठेवील, आणि वेळ आली तर ताप मोजील ! अशा तऱ्हेनें घरांतील सर्व कारभार चालवील अशी असायला पाहिजे; या प्राथमिक गरजा पुऱ्या व्हाव्यात म्हणून स्त्रीला शिक्षण दिलें पाहिजे. यांत स्त्रीच्या मनाचा—चित्ताचा विचारच कुठें आहे ?

**मानवतेच्या विकासाचें शिक्षण**

या सर्वांपेक्षां पुढें गेलेले आणि दोन तास प्रशंसा करण्याला पात्र असलेले सुशिक्षित बुद्धिमान लोक असें म्हणतात कीं, आमची बौद्धिक भूक शांत करण्यासाठीं आम्हांला अनुरूप अशी सहचारीणी नको काय ? कारण कीं तशी असेल तर काव्यशास्त्रविनोद करतां येतील, म्हणुन स्त्रीनें शिकलें पाहिजे. परंतु खरें पाहिलें तर या सर्वांचीं मतें हा स्त्रीत्वाचा अपमान आहे. काव्यशास्त्रविनोदाच्या मोठमोठ्या

गप्पा करणारेसुद्धां स्त्रीच्या अभिरुचीची मुळींच विचार न करतां स्वतःच्याच अभिरुचीसाठीं स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करीत असतात. स्त्रीच्या आत्म्याचा तर कोणीच विचार करीत नाहीं. क्षुद्र वृत्ति आणि क्षुद्र बुद्धि असलेले शिक्षण घेतलली स्त्री किती ध्येयनिष्ठ असेल ? अशा तऱ्हेचें बाजारी, ध्येयशून्य शिक्षण घेतलेल्या आईबापांचे पोटीं आकाशाला बांधणारे किंवा हिमालयाचें चूर्ण करण्याची दुर्दम्य इच्छा बाळगणारे पुत्र कसे निर्माण होणार ? त्यांचीं मुलें त्यांच्यासारखींच दुबळीं आणि बेकारच होणार नाहीं का ? तेजस्वी, तत्त्वनिष्ठ आणि ज्ञानी कशीं व्हावींत ? रामकाळांत आजच्यासारखी "So Called civilised and cultured" अशी क्षुद्र वृत्ति आणि दृष्टि नव्हतीच.

त्या काळी मानवतेचा विकास करण्यासाठीं शिक्षण देण्यांत येत असे. अशा तऱ्हेचा उदात्त हेतु असल्यामुळें शिक्षण पण उदात्त होतें. त्यामुळेंच समाजामांत उत्कृष्ट पुरुष होते, आणि त्याचाच परिपाक म्हणून नारायणासारखा राम प्राप्त झाला.

तपोवनांत शिक्षण घेऊन बाहेर पडल्यावर शिक्षणावर मालिन्य येतां कामा नये. त्यावर उजळणी होत राहिलीच पाहिजे. अर्थात् हें सर्व करून सुद्धां बुद्धीला धार आणण्याचें काम चालू राहिलें पाहिजे. त्यामुळेंच "स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्" हें तत्त्व मानण्यांत आलें होतें. यामुळें बुद्धि शुद्ध आणि समाजांत उत्कृष्ट अर्थव्यवस्था आणि सामाजिक व्यवस्था राहात असे आणि प्रत्येक व्यक्ति आमरण विद्यार्थी म्हणून आपलें जीवन व्यतीत करीत असे. बुद्धीवर ताबा राहाण्यासाठीं तपोवनांतून बाहेर पडल्यावर वेद, उपनिषदें वगैरे ग्रंथांचा नियमित स्वाध्याय करून जगाच्या प्रांगणांत काय आहे तें पाहात असत. तपोवनांत बीजरूपानें घेतलेल्या भ्रातृभावनेचा विकास गृहस्थाश्रमांत करीत असत. त्यामुळें जीवनांत एकात्मतेचा अनुभव येत असे.

## स्वाध्याय मंदिरें होतीं

ठिकठिकाणीं स्वाध्यायमंदिरें होतीं. त्या काळीं मंदिरांची भावना म्हणजे स्वाध्याय करण्याची जागा. रामकाळांत आजच्यासारखीं मंदिरें फारच थोडीं होतीं. मंदिर म्हणजे ज्ञानाची उपासना करण्याची जागा. मंदिर म्हणजे लग्नगृह, कपडे खरेदी करण्याची जागा, याच्यापुढें जाऊन सांगायचें म्हणजे मंदिर याचा अर्थ विड्या ओढण्याची जागा, चपला चोरायची जागा, गांवांतल्या गटारगप्पा झोकण्याची जागा, अगदीं याच्यापुढें जाऊन सांगायचें झालें तर सुंदर आणि तरुण स्त्रियांचे चेहरे न्याहाळण्याची जागा—ही आजच्या सुधारलेल्या युगाची मंदिराची परिभाषा रामकालीन लोकांना कशी माहीत असणार ?

शालीन कुटुंबांत स्वाध्याय चालत असे. त्यामुळें सुविचारांचें मंथन "Hammering" चालत असे. यामुळें चारित्र्यांत दृढता येत असे. वैशिष्ट्य हें होतें की,

रामकाळांत सामुदायिक स्वाध्याय उत्कृष्ट रीतीनें चालत असत. ' स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् " स्वाध्यायाला पवित्र ठिकाण, शुचिर्भूत गुरु आणि ऋषींसारखे सामर्थ्यसंपन्न अविश्रांत परिश्रम करणारे शिष्य होते म्हणून ब्राह्मण्य तेजस्वी होतें. वेळ पडली तर अधिकारी लोकांनासुद्धां ताब्यांत ठेवण्याची शक्ति त्यांच्यांत होती. त्यामुळें हे रामराज्य होते. ब्राह्मण रामराज्याचे आधारस्तंभ होते. ब्राह्मण रामराज्यात आश्रित नव्हते. ब्राह्मण आश्रित झाले कीं त्यांना वैभवसंपन्न लोक विकत घेणारच. महाभारत-काळीं ब्राह्मण वर्ग आश्रित होता. द्रोणाचार्यांसारखे उत्कृष्ट ब्राह्मणसुद्धां राजाश्रित असल्यामुळें त्यांच्या तेजस्वितेला कलंक लागला होता. सन्मार्गापासून विचलित झालेल्या राजांवर ते वसिष्ठविश्वामित्रांप्रमाणें नियंत्रण ठेवूं शकले नाहींत.


ब्राह्मणांच्या बाबतींत मराठींत एक म्हण आहे ती बरोबर लागू पडते. "झालें लोभाचें मांजर, भीख मागे दारोदार" ब्राह्मण्य बिघडल्यामुळें समाज मृत झाला. ब्राह्मणांना लाडू, दूधपाकपुरी खायला घालून त्यांचें भौतिक शरीर आपण पुष्ट करतों. त्यांच्या डोक्याकडे लक्ष दिलें पाहिजे. त्यांच्या डोक्यांत काय आहे त्याचा विचारच करीत नाहीं. अशा तऱ्हेनें ब्राह्मण्याचा मूळ हेतु तेजस्विता आणि ज्ञानमत्ता निघून गेला आहे. शरीर पुष्ट, परंतु डोकें रिकामें; कसें चालेल? प्रज्ञावान, मेधासंपन्न शीलवान आणि तत्त्वनिष्ठ ब्राह्मण असतील तरच समाज तेजस्वी होईल. ब्राह्मण मृतजीवी नसेल, पगारानें बांधलेलें जीवन जगणार नसेल—तरच तो समाजाला अधोगतीपासून वांचवूं शकेल. ब्राह्मण्य उभे राहिलें तरच समाजाला तरणोपाय आहे. नाहींतर नाहीं. परंतु "Grow more food" प्रमाणें Grow more hearts and grow more Characters" अशा-तऱ्हेच्या घोषणा करण्यानें या गोष्टी निर्माण होतील. ब्राह्मणांनीं बुद्धिजीवी व्हावयास पाहिजे. पगार देऊन हीन, दीन आणि निस्तेज बनवूं नका, तर तेजस्वी, ज्ञानप्रधान बनवा नाहींतर संस्कारांचें अस्तित्वही राहाणार नाहीं, पण आज ब्राह्मण लोक जास्त दीन हीन कसे होतील याचाच प्रयत्न लोक कळत नकळत करीत आहेत! जर या वेगानें आपण पुढें गेलों, तर जीं मुलें आज वडिलांचें मानीत नाहीत तींच उद्यां वृद्ध वडिलांना निरुपयोगी समजून त्यांना वांझ्याच्या कसाईखान्यांत पाठविण्याचा विचार करतील! सुधारणेचें हें युग आहे ना! काळाच्या हिशेबानें शंभर वर्षें म्हणजे उद्यां. पूर्वीं ब्राह्मणा-साठीं हजारों रुपये खर्च करण्यांत येत असत. आज ब्राह्मणाला पुष्ट न करतां ब्राह्मण्य कसें पुष्ट होईल तें पहावयास पाहिजे आणि जर ब्राह्मण्य पुष्ट करावयाचें असेल तर ब्राह्मणाला ( Bread and Butter ) त्याच्या उदरनिर्वाहापुरतें मिळावें.

## ब्राह्मणांची किंमत

ब्राह्मणांच्या कामांत राजसत्तेनें लुडबूड करतां कामा नये. रामकाळांत वसिष्ठ

वगैरेंना राजानें जर कांहीं सांगितलें, तर त्या राजाला तपोवनांत आल्यानंतर कैद करण्याची सत्ता ऋषिवर्गांमध्यें होती. इतकें करून जर त्यानें मानलें नाहीं, तर त्यालाच स्थानभ्रष्ट करण्यांत येत असे. ब्राह्मणाला क्षुद्र भिकारी समजूं नका. सध्यां ईश्वरानें तुम्हांला 'रेशनिंग'ची झोळी घ्यायला लावली आहे. ब्राह्मणाची किंमत कमी केलीत तर तुमची किंमतसुद्धां कमी होईल. ब्राह्मण्याचें रक्षण केलें जावें. तरच घरोघरीं समजवलें जाईल की "मातृदेवो भव। पितृदेवो भव।" आई–बाप हें सर्व शिकवूं शकणार नाहीत. आजची परिस्थिति पहा. राजसत्तेला सर्व मान देतात आणि त्यामुळेंच ज्याच्याजवळ सत्ता असेल त्याला सर्व लोक नमस्कार करतात. ब्राह्मणांजवळ हें नाहीं म्हणून लोक त्यांना वंदन करीत नाहींत. परंतु हें कोणाला माहीत आहे कीं जीवनाचा विकास करावयाचा असेल तर ब्राह्मणांचेच पाय धरावे लागतील.

ब्राह्मण्य म्हणजे शम, दम, तप वगैरे. रामायणाचें मूळ शिक्षणांत आहे आणि त्या शिक्षणाचें मूळ ब्राह्मण्यांत आहे. कोणी असें म्हणेल कीं, ही माझी जात आहे म्हणून मला त्यांच्याविषयीं प्रेम आहे; परंतु ही वस्तुस्थिती नाहीं. एकटा ब्राह्मण दुबळा आहे. त्याचा विकास करण्यासाठीं आणि सामाजिक क्षेत्रांत प्रगति करण्यासाठीं त्याला क्षत्रियांची राजसत्ता आणि वैश्यांचें वैभव यांचें अभयकवच मिळावयास पाहिजे. या दोन्ही जाति आज ब्राह्मणाच्या पाठीमागें उभ्या नाहींत; त्यामुळें ब्राह्मणांची किंमत कमी झाली आहे. म्हणून या दोन्ही जाति ब्राह्मणाची ढाल व्हावयास पाहिजेत. विवेकानंद म्हणत असत कीं,—"Give me a hundred Nachiketas and I shall Change the world" नचिकेता ब्राह्मणाचा आदर्श व्हावयास पाहिजे. ब्राह्मण किती अध्ययन करतो तें पहा. रामकालीन लोक पूर्ण विद्वान होते, त्यामुळें ब्राह्मणांना सुद्धां अध्ययन करावेंच लागत असे. गप्पा चालत नसत. परंतु आज तर स्वाध्यायप्रवचनें गेलीं आणि कथाकीर्तनें आलीं आहेत. त्याचा परिणाम असा झाला कीं, रामायणाची कथा झाली आणि घरोघरीं महाभारत चालू झालें!



## लक्ष्मणाचें असामान्य चरित्र

# राम हेंच सर्वस्व

रामाच्या कीर्तिध्वजाची काठी म्हणजे लक्ष्मण. काठीलाच गंधाक्षता वाहतात. व्यक्तिमत्त्व आणि विभूतिमत्त्व यांची अनुपम प्रतिमा म्हणजे लक्ष्मण. लक्ष्मणाचें व्यक्तिचित्र अतिशय सुंदर आहे. त्याच्या चित्रणाची निर्मिती वाल्मीकीच्या महाप्रभावशाली लेखणींतून झाली नसती, तर वाल्मीकींच्या प्रतिभेला कमीपणा आला असता, लक्ष्मणाला नव्हे. महर्षींनीं रामचंद्राचें चरित्रचित्रण करून मानवासमोर संस्कृतीचें अतिशय उच्च ध्येय ठेवलें आहे, आणि या ध्येयाप्रत पोंचण्यासाठीं लक्ष्मणासारखी उग्र साधना असावयास पाहिजे हें दाखविलें आहे. रामाचें चरित्र ध्येयरूप आहे. लक्ष्मणाचें आचरण तें प्राप्त करण्यासाठीं कोणतें साधन वापरावें याचें निदर्शन करीत आहे.

### साधनेचा महान् आदर्श

साधकाची कठोर साधना, अनुयायाचें असिधाराव्रत त्याचप्रमाणें स्वयंसेवकाचें नेत्यावर असलेलें प्रगाढ प्रेम म्हणजे लक्ष्मण. या उग्र साधनेच्या महान् आदर्शांचें लक्ष्मणानें असें पालन केलें आहे कीं, त्याच्या चरण धूलीच्या कणाजवळ पोंचण्याकरितां कैक जन्म प्रयत्न करावे लागतील.

अशा तऱ्हेची महान् लक्ष्मणाची साधना असूनसुद्धां रामायण वाचतवेळीं सीता, राम, दशरथ, भरत इत्यादि संवादी चरित्रें आणि कैकेयी, रावण वगैरेंची विसंवादी चरित्रें यांचा जेवढा आपल्या मनावर परिणाम होतो, तेवढा लक्ष्मणाच्या चरित्रामुळें घडत नाहीं. लक्ष्मण पडद्यामागें आहे, कारण कीं लक्ष्मण रामाची छाया होता. त्यांच्या जीवनांत रामाबरोबर कोणत्याही ठिकाणीं संघर्ष आलाच नाहीं. जसें एका मोठ्या वृक्षाच्या छायेंत दुसरा वृक्ष वाढूं शकत नाहीं, त्याप्रमाणें लक्ष्मणाचें चरित्र अतिशय भव्य आणि दिव्य अशा रामांत एकरूप झालेलें आहे. लक्ष्मण रामाशिवाय जीवंतच राहूं शकत नसे, त्याला रामाचा कधींही वियोग झाला नाहीं. रामाचा एकदांच वियोग झाला आणि तो झाल्याबरोबर ताबडतोब लक्ष्मणानें इहलोक सोडला! भरतानें रामाच्या वियोग दुःखांत झुरतां झुरतां चौदा वर्षें काढली, सीतासुद्धा वंशाच्या रक्षणासाठीं वियोगांतही जीवंत राहिली, परंतु लक्ष्मणाला रामाचा वियोग म्हणजे त्याच्या जीवनाची इतिश्री!

### भव्य आणि दिव्य चरित्र

लक्ष्मणाचें चरित्र भव्य आणि दिव्य आहे. रामाबरोबर त्या चरित्राचा कधींही संघर्ष झालेला नाहीं, त्यामुळें तें चरित्र पडद्याआड राहिलें आहे. पुष्कळ ठिकाणीं मुख्य चरित्राचा विकास दुसऱ्या चरित्राशीं संघर्ष होण्यांत होत असतो. रामचरित्राचा विकास तशा तऱ्हेचा नाहीं. ज्या वेळीं रामानें वनांत येण्याकरितां लक्ष्मणाला नकार दिला त्यावेळीं लक्ष्मण म्हणाला, "पाण्याशिवाय मासा जसा राहूं शकत नाहीं, त्याप्रमाणें रामाशिवाय लक्ष्मण राहूं शकणार नाहीं." हे शब्द केवळ शिष्टाचार म्हणूनच किंवा रामाला बरें वाटावें म्हणून उच्चारलेले नव्हते, तर लक्ष्मणाच्या अंतःकरणांतील विशुद्ध आवाजाचे उद्‌गार होते आणि म्हणूनच ज्या वेळीं लक्ष्मणाला रामाचा वियोग झाला, त्या वेळीं रामायणाची समाप्तिसुद्धां वाल्मीकींना करावी लागली. लक्ष्मणाचें चरित्र संवादीहि नाहीं आणि विसंवादीसुद्धां नाहीं, म्हणून त्याचा रामाशीं संघर्ष झालेला नाहीं. तो रामाशीं इतका तद्रूप झालेला आहे कीं राम शब्द उच्चारला कीं लक्ष्मण आलाच. ते दोन वेगळे आहेत असें वाटतच नाहीं, लक्ष्मण रामाचा बहिश्चर प्राण होता. लक्ष्मण रामाचा उजवा हात होता. दोघांची जोडी खरी, परंतु रामांत लक्ष्मण आलाच. राम आहे आणि लक्ष्मण नाहीं हें शक्यच नाहीं. रामायणांत राम एकटा नव्हताच. ज्याप्रमाणें मनुष्य आला कीं त्याची सांवली यावयाची, त्याच-प्रमाणें राम आला कीं लक्ष्मण आलाच म्हणून समजा.

दशरथाजवळ विश्वामित्र केवळ रामाचीच मागणी करतो. रामाचें नक्की ठरलें कीं लक्ष्मण बरोबर जाणारच, त्याला वेगळे निमंत्रण देण्याची गरज नाहीं. रामाला आमंत्रण म्हणजे लक्ष्मणाला आलेंच, आईला बोलावलें म्हणजे तिच्या तीन वर्षांच्या मुलाला निराळें बोलावण्याची गरज नसतेंच. मुलाला बरोबर घेऊन या, असें सांगणें म्हणजे अपमान होय. त्याचप्रमाणें रामाला बोलावल्यानंतर लक्ष्मणाला आमंत्रण देणें म्हणजे या दोघांचे संबंध कसे आहेत याचें याथार्थ ज्ञान नाहीं असेंच समजावें। माणसाला बोलावल्यानंतर त्याच्या सावलाला त्याच्याबरोबर आपण अडवू शकत असल तरच रामाबरोबर जाणाऱ्या लक्ष्मणाला अडवितां येईल. दोघांमध्यें अशा तऱ्हेचा अभेद होता. विश्वामित्रानें सुद्धां रामाला उद्देशूनच उपदेश केला होता, कोणतेंही काम करावयाचें असलें तर रामाला उद्देशूनच विश्वामित्र सांगत असत. भावाभावाचा अशा तऱ्हेचा संबंध फक्त रामायणानेंच जगाला दाखविला आहे.

### दोघांचे एकच जीवन

रामाचें सुद्धां लक्ष्मणावर खूपच प्रेम—हृदयापेक्षां जास्त प्रेम होतें. सामान्य मनुष्य नव्हे, परंतु प्रभु राम लक्ष्मणाला म्हणतो कीं, माझा मनुष्य—'यो मद्भक्तः स मे प्रियः। लक्ष्मण माझाच. रामाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं राम लक्ष्मणाला सांगतो,

तें विचार करण्यासारखें आहे. राम असें म्हणत नाहीं कीं, 'मी राजा होणार आहे' उलट राम असें म्हणतो कीं, 'भो लक्ष्मण! मया सार्धं प्रशाधि त्वं वसुंधराम्!' लक्ष्मणा! तुलाच राज्य करावयाचें आहे, असें राम सांगत आहे. किती उच्च भावना आहे! दोघांचें जीवन एकच आहे. लक्ष्मण मूर्च्छित झाला त्यावेळीं राम म्हणतो,

"नहि मे जीवितनार्थः सीतया च जयेन वा ।
को हि मे जीवितेनार्थः त्वयि पञ्चत्वमागते ॥
देशे देशे कलत्राणि देशे देशे च बान्धवाः ।
तं तु देशं न पश्यामि यत्र भ्राता सहोदरः ॥"

हे दोन्ही श्लोक, लक्ष्मणाकडे पाहण्याची रामाची कोणत्या प्रकारची दृष्टि होती तें सांगत आहेत. राम शब्द आणि लक्ष्मण अर्थ. राम शब्दाचा अर्थ लक्ष्मणामुळेंच होता. लक्ष्मण गेला तर रामसुद्धां अर्थरहितच होणार आणि म्हणूनच रामानें शोक केला. राम म्हणतो, "सीता मिळाली नाहीं तरी चालेल, परंतु जर लक्ष्मण गेला तर माझा प्राण जाणारच." "यत्र भ्राता सहोदरः" रामासारखा सत्यवक्ता हे शब्द उच्चारीत आहे! वास्तविक राम कौशल्येचा मुलगा आणि लक्ष्मण सुमित्रेचा मुलगा. असें असूनहि राम 'सहोदरः' एकाच आईच्या पोटीं जन्मलेले, असें म्हणत आहे. हेंच दोघांच्या संबंधाचें वैशिष्ट्य आहे. आपली सहोदर शब्दाची व्याख्या वेगळी असल्यामुळें, राम खोटें बोलला असेल असें म्हणूं नका, तर रामाची परिभाषा तुमच्या परिभाषेपेक्षां दिव्य होती असें समजा.

### रामाचें अमर्याद प्रेम

अशोकवनांत मारुतीजवळ सीता याच्या संबंधासंबंधी पुरावा देते. "पतीला जास्त प्रिय कोण आहे?" ही गोष्ट पत्नीशिवाय कोणाला समजणार? सीता मारुतीला सांगते—

"मत्तः प्रियतरो नित्यं भ्राता रामस्य लक्ष्मणः" अशा प्रकारें सीता मारुतीला कबूलीजबाब देत आहे, यांत रामाचें सीतेपेक्षां लक्ष्मणावर जास्त प्रेम आहे, हें आलेंच. रामाचें त्याच्यावर अमर्याद प्रेम होतें, त्याचप्रमाणें लक्ष्मणाचेंसुद्धां रामावर अमर्याद प्रेम होतें.

कर्तव्य आणि प्रेम यांच्यामध्यें विरोध येई त्या ठिकाणीं राम बुद्धीच्या योगानें भावनेला लाथ मारून कर्तव्याकडे वळत असे. लक्ष्मणाचे सर्व धर्म, कर्तव्य रामच होता लक्ष्मणाकरितां प्रेम आणि कर्तव्य यांचा प्रश्नच नव्हता. त्याच्या जीवनांत हा विचारच कधीं आला नाहीं. रामच त्याचें सर्वस्व होता. "राम म्हणजे उच्चतम नैतिक मूल्य" म्हणूनच विचार करण्याची गरजच नव्हती. ज्यावेळीं रामाबरोबर लक्ष्मण वनांत

जायला निघाला त्यावेळीं स्वतःच्या पत्नीला—उर्मिलेला—फक्त 'मी जात आहे' एवढें बोलूनच चालूं लागला. मी जाऊं कीं जाऊं नको ? हें विचारलेंसुद्धां नाहीं ! पत्नीचें मत घ्यायला हवें होतें तरीसुद्धा घेतलें नाहीं ! पतिकर्तव्याचा विचारच केला नाहीं ! ज्या ठिकाणीं रामाचा संबंध येत असे, त्या ठिकाणीं त्याला दुसरी गोष्ट सुचतच नसे !

त्याच्या मनांत केव्हांही धर्म आणि कर्तव्य यांच्या विचारांचा संघर्ष रामाच्या प्रेमाशीं कधीं झालाच नाहीं. कारण कीं, त्याचा धर्म आणि कर्तव्य एकमेव रामच होता. त्याच्या मनांत रामाशिवाय दुसरें कर्तव्य नव्हतें. रामाशिवाय दुसरा विचार नव्हता. धन्य उर्मिला आणि धन्य लक्ष्मण ! धन्य ती उर्मिला कीं जिणें स्वतःचें व्यक्तित्व पतीचे ठिकाणीं एकरूप केलें होतें. आणि धन्य तो लक्ष्मण कीं ज्याचें स्वतःचें समग्र जीवन रामाची छाया होती !

लक्ष्मण अतिशय पराक्रमी होता. राक्षसांच्या संहारांत त्याचा मोठा भाग होता. रामानें रावणाला मारलें यांत कांहीं विशेष नव्हें. रावणाचा पराभव अनेक वेळा झालेला होता. परंतु लक्ष्मणानें इंद्रजिताला मारलें कीं जो अजिंक्य होता. जीवनांत त्यानें कधीं पराभव पाहिलेलाच नव्हता. संपूर्ण राक्षसांची सत्ता इंद्रजितावर निर्भर होती. अजिंक्य इंद्रजिताचा पराभव महापराक्रमी आणि बुद्धिमान् लक्ष्मणानें केला होता.

## लक्ष्मणाची सूक्ष्म दृष्टि

त्याची बुद्धि सूक्ष्म विषयाचा अचूक निर्णय करीत असे. राजधर्माच्या संबंधींचीं त्याचीं भाषण अतिशयच श्रेष्ठ आहेत. दशरथानें रामाला वनांत जाण्याची आज्ञा केली त्यावेळीं ही आज्ञा रघुकुलाला शोभणारी नाहीं, यामुळें राजगादीच्या प्रतिष्ठेला धक्का बसणार आहे, म्हणून दशरथाला कैद करूनही रामाला राज्याभिषेक करावा ही लक्ष्मणाची मनीषा होती. महाबुद्धिशाली लक्ष्मणानें रामाला दशरथाला कां कैद करावें हें सिद्ध करून दाखविलें होतें. त्या वेळचे त्याचे कोटिक्रम अत्यंत सूक्ष्म बुद्धिमत्ता दर्शवीत आहेत. परंतु रामानें सांगितलें कीं, 'ही गोष्ट योग्य नव्हे !' बस, खलास. त्यानंतर कोटिक्रम नाहीं. नंतर प्रश्न नाहीं-विचार नाहीं. 'Not to question why, but to do or die.'

अशा तऱ्हेनें लक्ष्मण त्याच्या धर्माधर्माची चिकित्सा, सुसूक्ष्मबुद्धि, निःस्वार्थवृत्ति तसेंच असामान्य पौरुष—याच्या सात्विक अहंकारानें चढून न जातां रामांत एकरूप झालेला होता. स्वतंत्रबुद्धि आणि विचार असलेली माणसें अशा तऱ्हेनें स्वतःचें व्यक्तित्व दुसऱ्यामध्यें कधीही एकरूप करूं शकत नाहींत. स्वार्थी, दुर्बळ किंवा निर्बुद्धच दुसऱ्याच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वानें दिपून जाऊन त्यामध्यें एकरूप होतात. आणि त्या व्यक्तीच्या तालावर नाचतात. लक्ष्मण जर स्वार्थी, निर्बुद्ध किंवा दुर्बळ असता आणि दुसऱ्याच्या तालावर नाचणारा असता, तर त्याच्यांत कांहींहि महत्व नव्हतें. स्वार्थ बिलकूल नसून

त्यानें एकेका भोगावर लाथ मारून अथांग बुद्धिमान् अशा लक्ष्मणानें स्वतःचें सर्वस्व रामात मिळवून टाकलें! खरोखर लक्ष्मणाच्या जीवनाचा अवर्णनीय, अद्भुत आणि अनुकरणीय आदर्श मानवजातीसमोर आहे. खरे बुद्धिमान् लोकच लक्ष्मणाला जाणू शकतील.

भरत सैन्यासह वनांत येतो त्यावेळीं धूळ उडते. धूळ कां बरें उडते आहे तें पाहण्यासाठीं लक्ष्मण झाडावर चढतो. रघुकुळाचा ध्वज पाहून त्याला वाटलें कीं, 'हा नक्की भरतच असला पाहिजे. या ठिकाणींसुद्धा रामाला त्रास देण्याकरितां आला आहे असें वाटतें!' झोंपेत आणि जागेपणीं ज्याला रामच दिसतो, अशा लक्ष्मणाला रामाचा विषय आला कीं त्याची बुद्धि रामपक्षपाती होत असे. भरताविषयीं पूर्ण आदर आणि प्रेम असूनसुद्धां रामाचा विषय आल्याबरोबर त्याचें मन शंकित झालें—'अतिस्नेहः पापशंकी,' ठरलेल्या वेळीं घरीं येणाऱ्या मुलाला थोडा उशीर झाला कीं आईच्या मनांत नाना शंका येतात. तावडतोब हॉस्पिटल, रेल्वेचे रूळ, गंभीर परिस्थिति आणि मृत्यु हे सर्व विचार आईच्या मनात येतात. अशा रीतीनें लक्ष्मणाच्या मनांतसुद्धां रामाविषयीं तावडतोब शंका आली. रामाचा विषय मनात आला कीं तावडतोब दुसरे विचार भावना, विवेक, कर्तव्य या गोष्टी लक्ष्मणाजवळून नाहींशा होत. म्हणून भरत रामाला मारायला तर आला नसेल ना! अशा शंकेनें तावडतोब धनुष्यबाण घेऊन भरताला पराक्रम दाखविण्यासाठीं लक्ष्मणानें रामाची आज्ञा मागितली.

## भरताबद्दल संशय कां?

इतर ऋषिमुनींना सुद्धां लक्ष्मणासारखेच वाटलें होते कीं, "भरत रामाला मारायला जात आहे!" लक्ष्मणानें आज्ञा मागितली त्यावेळीं राम म्हणाला, 'लक्ष्मणा! तूं बुद्धिमान आहेस, परंतु माझा विषय आला कीं तुझी बुद्धि कामच करीत नाहीं. भरताला तूं ओळखलेला नाहींस. तो मला नेण्याकरिता आलेला आहे. भरताला राज्य करायचें नाहीं. सांग तुला राज्य हवें का! तुला देऊं का?' हें ऐकताच लक्ष्मण वरमला, रागावला नाहीं. हीच गोष्ट त्याच्या हृदयाची श्रीमंती दाखविते. दुसरा कोणी असता तर रागावला असता आणि म्हणाला असता कीं, माझी तुला कांहींच परवा नाहीं का! लक्ष्मण रागावला असता तर त्याच्या हृदयाची ही क्षुद्रता आहे हें मानलें असतें. परंतु तो वरमला हीच गोष्ट त्याच्या हृदयाची श्रीमती दाखविते. हा अध्यात्मिक विकास वृत्तींचें ऊर्ध्वगमन दाखविते.

दोन कर्तृत्ववान, बुद्धिमान् किंवा पराक्रमी केव्हांही एक दुसऱ्याच्या ताब्यांत राहणार नाहीं. लक्ष्मण निर्बुद्ध किंवा स्वार्थी नव्हता, अगदीं नेमका याच्या विरुद्ध होता इतकेंच नव्हे तर त्याच्यात सात्त्विक अहंकाराचीही भावना नव्हती. एक बुद्धिमान आणि एक निर्बुद्ध या दोहोंमध्यें निर्बुद्ध खेंचला जातो, परंतु या ठिकाणीं दोन्ही बुद्धिमान् एकरूप झालेले आहेत, हें लक्ष्मणाचें वैशिष्ट्य आहे.

लक्ष्मण अतिशय कडक स्वभावाचा होता, त्याचबरोबर त्याचेजवळ अंतःकरणाचें औदार्यही होतें. सुग्रीवानें तहाचा करार केला आणि हे चार महिने जाऊं द्या मग काम करूं, असें तो म्हणाला. परंतु चार महिने गेल्यानंतरही त्यानें कांहीं केलें नाहीं. त्या वेळीं लक्ष्मण संतापला आणि धनुष्याचा टंकार करीत त्याच्याजवळ गेला आणि अतिशयच कडक शब्दांत त्याची हजेरी घेतली. तो म्हणाला, 'सुग्रीवा! मुदत पुरी झाली तरी उत्तर का देत नाहींस? आम्हाला मदत करण्याचें तूं वचन दिलें होतेंस. तें वचन पत्नी मिळाली, वैभव मिळालें, म्हणजे विसरून का जायचें असतें! हें बरोबर आहे का?' सुग्रीव म्हणाला, "सीतेला शोधण्यासाठीं माणसें केव्हांच पाठविलीं आहेत!" हें ऐकतांच लक्ष्मण ताबडतोब आपली चूक कबूल करतो आणि क्षमा मागतो. एका क्षणांत चूक कबूल करणें ही हृदयाची श्रीमंती आहे, उदारता आहे. उदार अंतःकरणाचे महापुरुषच हें करूं शकतात. चुकीचें समर्थन करण्यामुळेंच महाभारत निर्माण होतें.

अलौकिक चारित्र्य हा रघुकुळाचा परिपाक होता, रघुकुलाची प्रतिष्ठा होती. त्याशिवाय त्या कुलांत जन्मच होत नसे. लक्ष्मणाचें चारित्र्य अतिशय देदिप्यमान होतें. चारित्र्याच्या बाबतींत लक्ष्मणाला आव्हान देईल अशी एकही व्यक्ति या जगांत झालेली नाहीं. लक्ष्मणाची ही चारित्र्यवान् भूमिका सुग्रीवाला माहीत होती. त्यामुळेंच लक्ष्मण ज्या वेळीं रागावला त्यावेळीं सुग्रीवाला वाटलें कीं, एकादे वेळेस हा थोबाडींत सुद्धां मारील. यामुळेंच त्यानें बुद्धिचातुर्यानें तारेला पुढें केली. तारेला पाहिल्याबरोबर लक्ष्मण शांत झाला आणि मनांत उत्पन्न झालेला क्रोध त्यानें शांत केला. "मातृवत् परदारेषु" सुग्रीवाला ही गोष्ट माहीत, त्यामुळें ती भावना जागृत करून, विकाराचें शमन केलें आणि नंतर वर सांगितलेलें उत्तर दिलें.

### चारित्र्यसंपन्न लक्ष्मण

लक्ष्मण अतिशय चारित्र्यवान् व्यक्ति होती. सीतेचे दागिने ओळखण्याचा प्रसंग येतो त्यावेळीं दुःखी झालेला राम लक्ष्मणाला दागिने दाखवून विचारतो कीं, "हे सर्व सीतेचेच दागिने आहेत ना?" त्या वेळीं लक्ष्मण जें उत्तर देतो, त्यावरून त्याच्या चारित्र्याची उदात्तता ध्यनांत येते.

> नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुण्डले।
> नूपुरे त्वेव जानामि नित्यं पादाभिवन्दनात्॥

अशा तऱ्हेचे चारित्र्यसंपन्नतेचे प्रसंग ज्या वेळीं आपण वाचतों, त्या वेळीं लक्ष्मणाविषयीं असलेली आपली आदरभावनना द्विगुणित होतें. अशाच तऱ्हेचा एक दुसरा प्रसंग, रामाच्या सांगण्यावरून लक्ष्मण सीतेला वनांत घेऊन गेला त्या वेळेचा

आहे. सीतेला वनांत सोडून, लक्ष्मण परत फिरूं लागतो त्या वेळीं सीता म्हणते कीं, "रामचंद्राचा वंश माझ्या उदरांत आहे—एकदां माझ्याकडे पाहा तर खरा." लक्ष्मण दुसद्देगिरीचें उत्तर देतो कीं, "जें तुझें रूप मी आजपर्यंत कधीं पाहिलें नाहीं, तें राम नसताना मी कसे बरें बंधू ?"

अत्यंत कर्तृत्ववान् आणि पराक्रमी असून सुद्धां रामांत स्वतः मिळून जाणें हा त्याचा मोठेपणाच आहे. कौसल्येसारख्या पतिव्रता स्त्रीनें सुद्धां लक्ष्मणाच्या वक्तृत्वशक्तीमुळें 'दशरथाला कैद केलाच पाहिजे' असें कबूल केलें होतें, परंतु रामानें नाहीं म्हटलें कीं त्याचे कोटिक्रम बंद.

लक्ष्मण रामाच्या हातांतील हत्यार होतें. तो रामाशिवाय अन्य ठिकाणीं स्वतःची बुद्धि चालवीत असे, परंतु रामाजवळ तो कोटिक्रम करूंच शकत नसे. राम जो हुकूम करी, त्याचें तो पालन करीत असे. सीतेला वनांत सोडून येण्याचें कठोर काम सुद्धां रामानें त्याच्याकडून करविलें. लक्ष्मण म्हणत असे, "या शरीराकडून कठोर, चांगलें, मृदु जे काम करून घ्यायचें असेल ते करून घे." लक्ष्मणाचीही भावना स्थितप्रज्ञ अवस्थेचें द्योतक आहे. त्यामुळें तर अमुक काम करायचें आहे या बाबतींत कधीं आग्रह नाहीं किंवा अमुक काम करावयाचें नाहीं असाही त्याचा आग्रह नसे, त्याचप्रमाणें कांहीं करावयाचें नाहीं असाही त्याचा आग्रह नसे.

कोणी असा आक्षेप घेतात कीं, "राम लक्ष्मणापेक्षां मोठा होता, त्यामुळें रामानें लक्ष्मणाचें प्रेम संपादन केलें होतें." हा आक्षेप एक क्षणभर सुद्धां टिकणार नाहीं. वाल्मीकिरामायण उघडून पहा, म्हणजे कळेल कीं राम आणि लक्ष्मण यांच्या वयांत फार अंतर नव्हतें. त्यांनीं बरोबरच शिक्षण घेतलेलें होतें आणि बरोबरच खेळलेलेही होते. असे असूनसुद्धां स्वतःचें कर्तृत्व रामांत विलीन केले होतें, ही गोष्ट लक्ष्मणाचे दास्यत्व दाखवीत आहे. "लक्ष्मीवान् स लक्ष्मणः" असें वाल्मीकि सांगतात. त्याच्या ठिकाणीं उच्च प्रकारची दास्यभक्ति होती. हेंच कैंकर्य—दास्यभक्तीची लक्ष्मी त्याचेजवळ होती.

परंतु नियति ही भयंकर गोष्ट आहे. अशा तऱ्हेच्या आज्ञापालक लक्ष्मणाच्या जीवनांत रामाच्या आज्ञेचें उल्लंघन करण्याचे दोन प्रसंग आले. "अनिच्छन्नपि वार्ष्णेय । बलादिव नियोजितः ।" स्वप्नांत नसलेल्या गोष्टी सुद्धां त्याला कराव्या लागल्या.

## सीतेचे वाग्बाण

लक्ष्मणावर सीतेच्या रक्षणाची कामगिरी सोंपवून राम मारीचाला मारण्याकरितां गेला तो पहिला प्रसंग. मारीचाच्या मायावी आवाजानें सीता बेचैन होते आणि रामावर संकट आले या भीतीनें लक्ष्मणाला रामाच्या मदतीसाठीं जायला सांगते.

लक्ष्मण खूप सांगतो, पण सीतेच्या ध्यानांतच येत नाहीं. सीता दुःखाच्या भरांत त्याला अतिशय कठोर शब्द बोलते. दुःखांत बुद्धिमानाला सुद्धां विवेक रहात नाहीं आणि त्यांत स्त्रिया दुःखी झाल्या आणि त्यांचे ठिकाणीं अविवेक जागृत झाला तर त्यांत विशेष तें काय ? आणि या ठिकाणीं तर स्वतःचें जीवनसर्वस्व जो राम त्यावर संकट ओढवलेलें. म्हणून सीता म्हणते, "तुम्ही ढोंगी आहांत, माझ्या रूपाची तुम्हांला अभिलाषा आहे. निष्ठुर आहांत, तुम्हांला मोठ्या भावाविषयीं बिलकुल प्रेम वाटत नाहीं इत्यादि." सीता अशा तऱ्हेच्या कठोर वाग्बाणांनीं त्याला जर्जर करते. पवित्रांतल्या पवित्र भावनेला धक्का बसलेला माणसाला सहन होत नाहीं, परंतु लक्ष्मणानें हे सर्व आक्षेप सहन केले आणि रामाकडे गेला नाहीं. शेवटीं ज्यावेळीं सीता म्हणाली कीं, 'तुम्ही जाणार नसलांत तर मी जीभ कापून मरून जाईन' त्यावेळीं लक्ष्मणावर धर्मसंकट आलें. जर मी गेलों नाहीं तर सीता-रामानें रक्षण करण्याकरितां दिलेलें धन-नष्ट होईल आणि गेलों तर रामाच्या आज्ञेचे उल्लंघन होत आहे. शेवटीं जड अंतःकरणानें लक्ष्मण निघून जातो.

रामाची शासनपद्धति कडक होती. तो कर्तव्याचरणांत चूक झाली तर कोणालाहि क्षमा करीत नसे. हें लक्ष्मणाला माहीत असूनसुद्धां लक्ष्मण गेला. संकटांत सांपडलेल्या कोणत्याहि व्यक्तीनें लक्ष्मणासारखेंच केलें असतें राम अशा तऱ्हेची व्यक्ति होती कीं, जिच्या अंतःकरणांत स्वतःच्या व्यक्तीविषयींसुद्धां क्षमा नव्हती. राम रस्त्यांत भेटतो लक्ष्मण सर्व हकिकत सांगतो, परंतु राम कठोर शब्दांत त्याला बजावतो कीं, 'लक्ष्मणा! कर्तव्यपालनाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि शहाणपणाची तुझ्यापासून मी अपेक्षा केली नव्हती.' सज्जनाला कठोर बोलणें हें मृत्युसमान होय; राम कर्तव्यनिष्ठुर होता.

दुसरा प्रसंग रामायणाच्या शेवटीं कालपुरुष येतो त्यावेळीं निर्माण होतो. दुर्वासांच्या आगमनामुळें रामायणाचा शेवट होतो. रामाच्या आज्ञाविरुद्ध लक्ष्मणाला आंत जाऊन दुर्वासाच्या आगमनाची बातमी रामाला द्यावी लागते. रामाला तांत्रिक गुन्हा वाटतो. त्यामुळें त्याचा गुन्हा शिक्षेला पात्र नाहीं असे रामाला व नागरिकांनाही वाटतें, परंतु सिंहासनाची प्रतिष्ठा टिकविण्यासाठीं शिक्षा करावी असें वसिष्ठ सांगतात, त्या वेळीं कंठ दाटून येऊन राम सांगतो, "हे लक्ष्मणा ! अयोध्या सोडून जा." त्याला हें माहीत होतें कीं, माझा वियोग म्हणजे लक्ष्मणाचा मृत्यु. प्रसन्न मनानें ती आज्ञा शिरसावंद्य मानुन तो म्हणतो, "ज्याच्या शब्दाकरितां मी जिवंत राहिलों, त्याच्याच शब्दानें मला मृत्यु ! माझें केवढें महद्भाग्य !" असें बोलून लक्ष्मणानें रामाला प्रणाम केला; शरयू नदीच्या तीरावर गेला आणि उडी मारली. रामसुद्धां त्याच्या मागोमाग गेला आणि रामायणाचा अंत झाला.

## असामान्य चरित्र व चारित्र्य

लक्ष्मणाच्या चरित्राचा विचार करीत असतांना तर्क आणि प्रज्ञा कामच करीत नाहींत. तर्क आणि प्रज्ञा यांच्याबरोबर हृदय असेल तर त्यानें चरित्र घांसून पहा. तर्क आणि प्रज्ञा त्या ठिकाणीं उपयोगी नाहीत. तर्क आणि बुद्ध ज्या ठिकाणीं कुंठित होतील असे महान् चरित्र रामायणांत जर कोणतें असेल तर लक्ष्मणाचें होय. लक्ष्मण म्हणजे रामाच्या कीर्तिध्वजाची काठी. लक्ष्मणामुळेंच रामरूपी ध्वज काठीवर फडफडत आहे.

पुष्कळांना लक्ष्मण पडद्यामागें आहे असें वाटतें, परंतु वाल्मीकींनीं त्याची उपेक्षा केलेली नाहीं असें योग्य तऱ्हेनें वाचणाराला वाटेल. कर्तृत्ववान्, बुद्धिमान् आणि असामान्य पराक्रमीच लक्ष्मणाला ओळखूं शकेल, अशा तऱ्हेचें असामान्य, अलौकिक आणि अपूर्व चरित्र जगाच्या इतिहासांत कोणत्याही वाङ्मयात कोणत्याही ठिकाणी पहायला मिळणार नाहीं. स्वार्थी, कर्तव्यहीन, बुद्धीहीन, दुसऱ्याच्या सामर्थ्यावर अवलंबून राहाणारी, दुसऱ्याच्या व्यक्तिमत्वानें दिपून जाऊन त्यामध्यें एकरूप होणारी व्यक्ति अन्यत्र आढळेल, परंतु या ठिकाणीं तीक्ष्ण बुद्धि असूनही स्वतःचें चारित्र्य विलीन केलें हाच लक्ष्मणाचा मोठेपणा आहे.

साध्य राम आणि साधन लक्ष्मण. लक्ष्मणाचें चरित्र अग्नीसारखें आहे. तें सामान्य जनांना सुलभ नाहीं. अग्नीवर प्रेम असूनही त्याला हातात घेऊ शकत नाहीं. अग्नि अतिशय तेजस्वी आहे. लक्ष्मणाचें चरित्र जेवढे तेजस्वी होतें, तितकीच त्याची साधना पण अतिशय कडक होती. परंतु फुलावर प्रेम असेल तर तें आपण हातांत घेऊं शकूं. यानंतर फुलासारखें कोमल आणि सर्वजन सुलभ जें चरित्र आहे तें आपण वाचूं.



# भरताची भूमिका

## (उत्तरार्ध)

**रामायण भरतामुळें सुंदर व शोभायमान झालें आहे; भरत हा केवळ रामायणाचाच अलंकार नाहीं, तर तो साऱ्या जगला शोभविणारा सांस्कृतिक बहुमोल अलंकार आहे. म्हणूनच भरत भेट प्रत्येक हिंदूच्या मनावर कायमची कोरली गेली आहे.**

**—संपादक**

भरत म्हणतो, "सगळें खरें, पण वडील वृद्ध झाले होते, त्यांची बुद्धी स्त्रीच्या आधीन झाल्यामुळें चलित झाली असेल, म्हणून इक्ष्वाकुलाची चालत आलेली प्रणाली व राज्यनिष्ठा नाहींशी होईल असें स्त्रीमोहित होऊन राजाने केलें असेल, म्हणून अशा तऱ्हेनें मोहित झालेल्या राजाचे शब्द मानणें बरोबर आहे का ? राज्यशास्त्राच्या सिद्धातांना हें धरून आहे का ? म्हणून तूं परत येऊन अनाथ प्रजेचें रक्षण कर."

राम सांगतो, "ज्या वेळीं राजानें आज्ञा order केली, त्यावेळीं मी एक सामान्य प्रजाजन होतों आणि सामान्य प्रजाजन म्हणून आज्ञेचें पालन केलें, करितां वडील म्हणून, गुरु म्हणून आणि शासनाधिकारी म्हणून, त्यांच्या आज्ञेनें मी इथें आलों आहे. अरे भरता ! तुझ्यासारखा शासनाधिकारी उभा आहेना ? मग प्रजा अनाथ कशी काय ? तेच वडील, गुरु शासनाधिकारी हे तुझ्याविषयीं नक्की करून गेलेले आहेत. मग भरता ! वडील मोहीत झाले होते हे जे तूं म्हणतोस, ते शब्द तुझ्यासारख्या बुद्धिमान् आणि सुविद्य मुलाच्या तोंडीं शोभत नाहींत. मोठ्या माणसांच्या जीवनावर टीका करणें बरें नव्हे. जर मोहाने आज्ञा केली असती, तर वसिष्ठ थांबले असते कां ? म्हणून तूं वडिलांना दोष देऊं नकोस. दिलेला शब्द इक्ष्वाकुकुलात कधीहि परत घेतलेला नाहीं. यांनी तुझ्या आजोबांना-कैकेयीच्या वडिलांना शब्द दिला होता कीं, तूं गादीवर यावास. म्हणून वसिष्ठ मध्यें पडले नाहींत. वडील तर धर्मरत होते. राम आणखी वर म्हणाला-कीं, 'भरता ! दुसरा कोणी नाहीं. पण तूं कर्तव्यच्युत आहेस, असें असून वडिलांवर खोटा दोषरोप करतोस. वडिलांनीं तुझ्यावर सोंपविलेलें कर्तव्य सोडून तूं इथें कां आलास ! वडिलांविषयीं तुझ्या मनांत आदर असावयास पाहिजे.'

अतिशय बुद्धिवाद अशा तऱ्हेनें आक्रमक वृत्ति 'Offensive attitude, स्वीकारली कीं बुद्धिवाद शांत, परंतु वादविवादपटु आणि प्रकांड बुद्धिमानच अशा तऱ्हेचें बोलू शकतो, प्रतिस्पर्ध्याला चारी मुंड्या चीत करून त्याची दुबळी बाजू त्याला दाखवून त्याला निरुत्तर करून टाकतो. सर्व बौद्धिक हत्यारें खलास झाल्यानंतर शेवटीं हृदयस्पर्शी नम्रवाणीनें आग्रहपूर्वक भरत म्हणतो, 'माझें म्हणणे ऐकलें नाहींस, तर उपवास करून प्राणत्याग करीन.'

राम कांहीं असा तसा मनुष्य नव्हता. तो म्हणाला, "तर मग कर्तव्यच्युति, आज्ञाभंग आणि प्रायोपवेशन ( उपोषण करून मरणें ) हे तीन दोष तुला लागतील. तूं कर्तव्यच्युत झालेला आहेस, तूं आज्ञाभंग आणि आतां मरण्याचें तिसरें पाप करायला तयार झालेला आहेस ! तुला मरण्याचा हक्क आहे कां ? देहत्याग करण्याचा आप त्याला अधिकार नाहीं......वाटेल त्या वेळीं देहत्याग करणें हा उन्मत्तपणा आहे. आत्महत्या करण्याचा तुला अधिकार नाहीं. या शरीरावर तुझा अधिकार नाहीं. देहावर ईश्वराच्या हातांतील अधिकार आहे. म्हणून तूं मरण्याची भाषा सोडून दे. ती भाषा धर्मप्रवृत्त क्षत्रियाच्या मुखांत शोभत नाहीं."

भरत म्हणतो, "तुझें सगळें म्हणणें खरें आहे, परंतु आपल्या दोघांमध्यें एकता आहे. म्हणून रामाला दुःख, तें मला दुःख आणि रामाला सुख तें भरताला सुख म्हणून राज्याधिकार तूं चालव आणि मी इथें चौदा वर्षें राहीन. आपण दोघेही एक असतांना तूं द्वैत निर्माण करीत आहेस. राम आणि भरत एक आहेत आणि वडिलांची आज्ञा म्हणून आपण परस्पर फेरफार करूं या." या ठिकाणीं बुद्धि आणि भावना एकत्र झाल्या आहेत. बुद्धि आणि भावना वेगळ्या असल्या, तरच त्यांना तोडतां येतें. परंतु एकरूप झाल्यानंतर तोडणें कठीण आहे. त्यामुळें राम सुद्धां हंसून म्हणतो, 'भरता ! ही भाषा तूं सोडून दे. ज्याला जें सांगितलें आहे तें त्यानें करावें. कर्तव्यपालनांत प्रतिनिधि चालत नाहीं." There will be no compromise in principles.

भरतानें खूप कोटिक्रम केले. नंतर राम भावनांमुळें ढिला झाला. भरताचें प्रेम पाहून त्याचें हृदय चलित झालें, भरताचा भाव त्याला समजला व तो शेवटीं अशी कबुली देतो कीं, 'चौदा वर्षें पुरी झाल्यावर पंधराव्या वर्षाच्या पहिल्या दिवशीं मी राज्य घेईन.' वस्तुतः भरताला कायमचें राज्य आणि रामाला चौदा वर्षें वनवास ही गोष्ट नक्की झाली होती. परंतु भरताच्या प्रेमाखातर विवश होऊन रामानें राज्य स्वीकारायला होकार दिला; भरतानेंसुद्धां 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः' या न्यायानें तो निर्णय मान्य केला. तो म्हणाला कीं, "मला आईमुळें जो कलंक लागला

आहे, तो धुऊन काढण्यासाठीं मी तपश्चर्या करीन. मी राज्याचा उपभोग घेणार नाहीं. परंतु तुझा प्रतिनिधी म्हणून गांवाच्या बाहेर राहून राज्य चालवीन. तुझा प्रतिनिधी म्हणून मला तुझ्या पादुका दे. त्यांची राजसिंहासनावर प्रतिष्ठापना करून जवळच्या नंदिग्रामांत राहीन. रामाच्या पादुका चौदा वर्षें राज्य चालवतील." अशा तऱ्हेनें राजगादीवर न बसतां झोंपडींत राहून भरत राज्य चालवीत होता !

अशा तऱ्हेचा झगडा कुठेंहि पाहायला मिळणार नाहीं. राज्यासाठीं भावाचें मस्तक उडवणारे आणि वडिलांना तुरुंगांत टाकून राज्य मिळविणारे अनेक दाखले इतिहासांत सांपडतील, परंतु भरत, राम चौदा वर्षांनीं जर आला नाहीं तर अग्निस्नान करणार होता. अशा तऱ्हेचा अनुपम झगडा एकमेव आणि अद्वितीयच आहे आणि तो तसाच राहणार.

चौदा वर्षांनंतर राम ज्या वेळीं येतो त्या वेळीं तो गांवाच्या बाहेर उभा राहतो. राम "बुद्धिमां वरिष्ठम्" हनुमानाला भरताकडे पाठवतो; आणि सांगतो कीं, 'राम आलेला आहे हें वृत्त त्याला जाऊन सांग, आणि त्याच्या चेहऱ्यावर कोणत्या प्रकारचे भाव-विकार निर्माण होतात तें पहा. लक्ष्मीची त्याला इच्छा आहे कीं नाहीं, तें नीट पहा. वस्तुतः भरताविषयीं शंका घेणें योग्य नाहीं. परंतु पुष्कळ वर्षांच्या-राजलक्ष्मीच्या साहचर्यामुळें कदाचित् सातव्या पडद्यांत भरताला राजलक्ष्मीविषयीं इच्छा निर्माण झाली तर मी राजलक्ष्मी न स्वीकारतां परत वनांत जाईन. म्हणून त्याच्या चेहऱ्यावरील भाव पहा आणि मला कळव.'

चौदा वर्षें पुरीं झाल्यावर दोघांची ज्या वेळीं भेट होते त्यावेळीं 'भरत कोणता आणि राम कोणता तें ओळखतां आलें नाहीं, असें वाल्मीकींनीं वर्णन केलें आहे. कारण दोघेही तपस्वी, चारित्र्यनिष्ठ, कुलाभिमानी, संस्कृतीचे उपासक, कर्तव्यनिष्ठ, मानवतेचे पुजारी, दोघे एकच' असें म्हणा. चारित्र्याची भव्यता आणि भ्रातृप्रेम यांच्यापुढें वाल्मीकीसारख्यांची दिव्य लेखणी सुद्धां पोहोंचत नाहीं. तिथें पांडुरंग काय बोलूं शकणार ?

राजर्षि भरत हा भारताच्या सांस्कृतिक वाङ्मयाचा दागिना आहे. अशा तऱ्हेचा भाऊ, अशी निष्ठा, असें चारित्र्य जगांत शोधूनहि मिळणार नाहीं.

भरत तो भरत, भरताविषयीं मला अत्यंत प्रेम आहे. लक्ष्मण आणि भरत अतिशय प्रेमळ आहेत. दोघेहि परम भक्त आहेत. परंतु एकाला संयोगाचें भाग्य, आणि दुसऱ्याला वियोगाचें भाग्य. दुसऱ्याला वियोगांतसुद्धां मानसिक सतत संयोगच होता. लक्ष्मण ही मोठी विभूति आहे. त्याची साधना कठोर-अत्यंत कठोर आहे. चौवीस

दास रामाजवळ राहातो हें ठीक वाटतें, परंतु त्याच्याजवळ जाववत नाहीं. लक्ष्मण तेजस्वी अग्नि आहे. आलिंगन देतांना भीति वाटते. परंतु भरताला भेटण्याची इच्छा होते. भरतानें ईश्वरापासून दूर राहून सुद्धां निष्ठेनें ईश्वराचें काम केलें आहे. त्यानें अतिशय शुद्ध जीवन घालविलें आहे. निष्ठा आणि चारित्र्य यांनीं स्वतःचा कलंक धुवून टाकला आणि अयोध्येतल्या लोकांचें जीवनसुद्धां निर्मल केलें.

ईश्वराजवळ राहाण्याचें भाग्य केव्हां मिळतें तें कोणाला माहीत? Grapes are sour, लक्ष्मणाची भूमिका आपणाला नको, म्हणून त्याची आपण उपेक्षा करूं नये. ती अतिशय उच्च आणि अतिशय दिव्य आहे.

परंतु भरताची भूमिका आपल्याजवळ तयार आहे. लक्ष्मणाची भूमिका दूर आहे. जीव आणि शिव यांमध्यें किती अंतर आहे तें ईश्वरालाच माहीत. भरताचा आदर्श जीवनांत कायम ठेवतां येतो. निष्काम होऊन ईश्वरी कार्यात निर्लोभ अंतःकरणानें वुडून पडूं. निर्लोभ अंतःकरणानें भरतानें जें केलें तें आपण आपल्या संपूर्ण जीवनभर करूं. भरताजवळून ही दीक्षा भारताच्या उद्धारासाठीं आवश्यक आहे. अर्थात् भरत जसा ईश्वरापासून दूर राहून ईश्वराचें कार्य करीत आहे, तसें ईश्वरापासून दूर राहून तुम्ही आम्ही ईश्वरी कार्य करण्याचा प्रयत्न करूं या.

साधनेचें शिखर म्हणजे लक्ष्मण. तें आपल्यासाठीं कदाचित् शक्यही होणार नाहीं. आपल्याला कांहीं घ्यायचें असेल तर तें भरतापासून घेतलें पाहिजे. भारतांत भरताची उपासना होणार नसेल तर तो भारत कसला? भारत हा भौगोलिक प्रांत नाहीं. Geographically खुशाल त्यांत कमीजास्तपणा होत असेल. परंतु भारतांत तीन भरतांचें पूजन व्हावयास पाहिजे, तरच भारताचें महत्त्व कायम राहील. तेव्हां भारत विश्वाचा गुरु होईल, मनु भगवानाचें स्वप्न साकार होईल.

ते तीन भरत म्हणजे—

( १ ) रामायणांतील निःसीम भ्रातृभावना असलेला राजर्षि भरत.

( २ ) महाभारतांतील अत्यंत पराक्रमी आणि बाहुबलशाली दुष्यंताचा मुलगा भरत, कीं ज्यानें एक वर्षाचा असतांना, सिंहाचा कान पकडून तोंड उघडायला लावून दांत मोजायचे आहेत असें सांगितलें होतें. आपण पंचवीस वर्षांचे तरुण कुत्र्याला स्पर्श करायला घाबरतों !

आणि (३) भागवतांतील ज्ञानभक्तीनीं परिपूर्ण असलेला जडभरत. या तीन भरतांची भूमिका ज्याच्या जीवनांत येईल तोच खरा भारतीय. ईश्वराजवळ अशी प्रार्थना आहे कीं, ' आम्हांला भरत होण्याची शक्ती दे. ' लक्ष्मण होण्याची नको. हें तर ईश्वरच

करूं शकेल. पहिल्याप्रथम भरत व्हायचें आहे. नंतर लक्ष्मण व्हायचें आहे. आम्हांला अगोदर भरत होऊं द्या, अंतःकरणें त्यासारखीं शुद्ध आणि शुभ्र करूं कीं, परमेश्वर स्वतःच्या मदतीनें लक्ष्मण बनवील.

राजर्षि भरतामुळें रामायणाला शोभा आली आहे. भरत केवळ रामायणाचाच नाहीं तर जगांतील संपूर्ण सांस्कृतिक वाङ्मयाचा दागिना आहे. त्याच्यासारख्या भावनाशील चरित्राशिवाय सांस्कृतिक वाङ्मय निर्माणच होऊं शकणार नाहीं. वाल्मीकींनीं हा अनुपम आदर्श पुढच्या संस्कृतिपूजकांसाठीं राखून ठेवला आहे. भरताची तुलना रामाबरोबर होऊं शकेल, इतक्या योग्यतेच्या तो आहे. अशा तऱ्हेचा परस्पर समान शक्ति असलेल्या संवादी चित्रांचें चित्रण करणाऱ्या वाल्मीकींची प्रतिभा खरोखरच धन्य होय! आपले त्याला कोट्यावधि प्रणाम आहेत.


## लहान मुलांच्या आंकडीवर

### जुनें आणि प्रसिद्ध औषध

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

# नामदेवांची वाणी

अनु : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

## दर्शनानुभव

झिलिमिलि झिलिमिलि झिलिमिलि तारा ।
सो झिलिमिलि तिहुं लोक पियारा ॥ टेक ॥
रहे अकास, पडे नही दिष्टी,
पकडव्या न जाई, न आवे मुष्टी ।
दीपक पषे तेल बिन बाती;
जोति सरूप बले दिन राती ।
भणत नामदेव अमर पद परस्य
पिंड भया मुकति तया तत दरस्या ॥ २ ॥

अर्थ : झिलमिल झिलमिल अथवा मंद मंद लुकलुकणारा प्रकाशयुक्त तारा म्हणजेच हृदयस्थ परमात्मा असून तो तिन्ही लोकांचा स्वामी आहे. जेथें वायूखेरीज कांहीं नाहीं अशा शून्यांत वा आकाशांत त्याचा निवास आहे. तो दृष्टीस पडत नाहीं, त्याला धरता येत नाहीं आणि तो मुठींत येत नाहीं. तेल व वात नसतांहि हा दीप प्रकाश-किरणें देत आहे. ही रूपवान ज्योत रात्रंदिवस जळत आहे. नामदेव म्हणतात, त्या अमर ज्योतीचा पदस्पर्श होताच शरीर बंधनमुक्त झालें; तेथेंच ईश्वरदर्शनाचा लाभ झाला.

ज्योतिसरूप...तत दरस्या—

हा प्रकाश हृदयांतर्गत परमात्माच असून ह्यापासून आत्मज्ञान होते. छांदोग्योपनिषदांत या संबंधांत उल्लेख आढळतो तो असा :—आत्मानमन्तत उपसृत्य स्तुवीत...१-३-१२ ह्या ज्योतीचे हृदयांत व तमाच्या पलीकडे दर्शन झाले असतां परमात्मरूपी आदित्याचा साक्षात्कार होतो.




## फेब्रुवारी १९६६

या महिन्यांत शिर्डीस भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणेंच होती. कांहीं कलाकारांनीं श्रींचे पुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**

श्री. ह. भ. निरंजनलाल गंधर्व, मु. पथेना, जि. भरतपूर, ( राजस्थान ) श्री. ह. भ. प. रामराव पाटील, मु. पेठ, ता. चिखली, जि. बुल्ढाणा, (वऱ्हाडप्रांत) श्री. ह. भ. प. पोपटबुवा लोहणेकर, मु. लोहणेर, ता. सटाना जिल्हा नाशिक. शिर्डी साई संस्थान गवई श्री. विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें प्रत्येक एकादशीस व श्रीरामदास नवमी या दिवशीं झालीं.

**संगीत गायन भजन**

श्री. स्नेहल भाटकर, मुंबई; श्री. सौ. सुनंदा सुधीर सोहनी मनमाड, जिल्हा नाशिक, श्री. धोंडीराम नरहर माने इन्स्पेक्टर सेंट्रल एक्साईज, ( कल्याण ) जि. ठाणे, श्री. शिवकुमार सदाशिव भिडे मुंबई, श्री. लक्ष्मीप्रसाद जयपुरवाले सायन ( मुंबई ), श्री. गोविंद प्रसाद जयपूरवाले सायन ( मुंबई )

**तबला सोलोवादन**

श्री. गिरधरप्रसाद जयपूरवाले सायन, मुंबई–२२. श्री. नरसू शिवराम भाये, कोळीवाडा वरळी–मुंबई १८.

**साईसंस्थान नोकर भजन मंडळ**

या महिन्यांत भजनाचा एक कार्यक्रम समाधानपूर्वक झाला.

**मोठ्यांच्या भेटी**

मे. करमाळी साहेब ( मिनिस्टर शिक्षण पब्लिक वर्क्स व पब्लिक हेल्थ डिपार्टमेंट, गोवा. ) मे. एस. एस. मोनेसाहेब ( डेपोटी सेक्रेटरी होम डिपार्टमेंट, सचिवालय

मुंबई.) मे. तारके साहेब ( जाईंट डि. अॅ. सेशनजज. अहमदनगर. ) मे. डी. डी. मुलवणीसाहेब अॅडीशनल डिस्ट्रिक्ट अँडसेशन जज, अहमदनगर.

शिर्डी येथें महाशिवरात्रीनिमित्त कीर्तन व साईंच्या पालखीची गांवांतून मिरवणूक निघाली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.

# वर्गणीदारांस विनंती

ज्या वर्गणीदारांची वर्गणी ३१ मार्च अखेर संपते त्या वर्गणीदारांनी ता. १५ एप्रिलपर्यंत आपली पुढील वर्षाची वा. वर्गणी पाठविण्याची कृपा करावी अशी विनंती आहे.

व्यवस्थापक
**श्रीसाईलीला कार्यालय,**
साई निकेतन, ८०४ बी,
दादर, मुंबई १४

---


## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळे. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे. ) ( चार अंकास २१ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह ( स्टॅंप-तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक
**श्री साईलीला मासिक**

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | – by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | **साईबाबा-अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. घोड | २-०० |
| (११) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपीत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | **स्तवन-मंजरी** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | **श्री साई-सुमनांजली** | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone | 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, | 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai | 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां

प्रकाशक : बी. जी. पोतनीस, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते।

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणी मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

श्री साईबाबा संस्थान

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,